# दासबोध माझं माहेर

*

आशालता उर्फ आक्काताई वेलणकर

**दासबोध माझं माहेर**

**प्रथमावृत्ती**
गुरूपौर्णिमा , २० जुलै १९९७

**प्रकाशक**
स्वामी प्रकाशन
कु. सुवर्णा जोशी
राधा-दामोदर निवास, आगरकर पथ,
डोंबिवली (पूर्व) - ४२१ २०१. जि. ठाणे.

**अक्षरजुळणी**
डिझायनर्स,
१५/अ, सत्यम अपार्टमेंट,
सावरकर रोड,
डोंबिवली (पूर्व).

**मुद्रक**
कॉम्पॅक्ट फोटो ऑफसेट
श्री पार्श्व इंडस्ट्रीयल इस्टेट
डोंबिवली (पूर्व).

**मुद्रण व्यवस्था**
प्रा. अनंत वि. कुलकर्णी.
दूरध्वनी : ४८ ६१ ४९

**मुखपृष्ठ**
कु. सुवर्णा जोशी

**मूल्य**
रूपये तीस

**पुस्तक मिळण्याचे ठिकाण**
स्वामी पुस्तकालय,
११, दामले बिल्डींग, फडके पथ,
डोंबिवली (पूर्व) ४२१ २०१.

## दोन शब्द . . . . .

सर्वात्मक सर्वेश्वरानं सृष्टी निर्माण केली, आणि तो स्वतः सृष्टीतील यच्चयावत वस्तूमध्यें अंश-अंशी भावानं स्थिरावला. मानवानं त्याची उपासना सुरू केली. उपासना म्हणजे भक्ती. भावपूर्ण शब्दात केलेली भगवंताची आळवणी. उपासना कशी असावी ? संत म्हणतात

**" उपासनेला दृढ चालवावे, भूदेव संतांसी सदा लवावे**
**सत्कर्म योगे वय घालवावे, सर्वामुखीं मंगल बोलवावे. "**

यातील प्रत्येक चरण आचरणात आणायचा आहे. मनाचा दृढ निश्चय करून भक्ती करावी. आदरणीय, पूजनीय, श्रध्देय अशांसमोर नतमस्तक व्हावे. सत्कर्म करीत आयुष्य कंठावे आणि मंगलमय वाणीचा प्रयोग करावा. भक्तीचे द्वारा ईश्वराशी एकरूप व्हावं. नामदेवाला प्रथमदर्शनी मूर्तीत विठ्ठल दिसला. विसोबानी त्याला तो सर्वत्र असल्याचं दाखविलं. एकनाथानी तहानेल्या गाढवाच्या मुखात गंगा घातली. अतिथीसाठी सर्वस्व समर्पणाची असंख्य उदाहरणे आहेत. समर्पणानं अहंकार नष्ट होतो. समत्वाची भावना निर्माण होते. कर्मामध्ये कौशल्य येते. **" समत्वं योग उच्यते "** आणि **" योगः कर्मसु कौशलम् "** संयमित उपभोग व तदनुकूल कर्म हा सुखाचा मूलमंत्र आहे. **" जे जे भेटेभूत, ते ते मानिजे भगवंत "** अशा भावनेनं केलेलं कर्म हेच सत्कर्म आहे. हाच कर्म योग आहे. श्रीमद्दासबोधाच्या पानोपानी हेच बोधामृत आहे. **" दासबोध माझं माहेर"** या कु. आक्का वेलणकरांच्या ग्रंथाचा विषय हा असा आहे.

ईश्वर भक्तीचे सामान्यपणे नऊ प्रकार मानले गेले आहेत. त्यास नवविधा भक्ती असे म्हणतात. श्रवण, कीर्तन, स्मरण, पादसेवन, अर्चन, वंदन, दास्य, सख्य, व आत्मनिवेदन. या प्रत्येक भक्तीची एक एक पाकळी स्वतंत्र प्रकरणाद्वारा उलगडून दाखवली आहे. कथा ऐकणं व सांगणं हे शैशवापासून प्रौढांपर्यंत सर्वांनाच प्रिय असतं. अशा कथारुपकाद्वारे पात्र योजना करून कु. आक्कांनी संवादाद्वारा रोचक भाषेत वाचकांशी संवाद साधला आहे. पुस्तकातील काकू ह्या सामान्य भक्त असून त्यांची भक्ती ही पारंपारिक भक्ती आहे, तर 'मावशी' या प्रगल्भ व्यक्तीद्वारे त्यांनी भक्तीला सामाजिक आशय प्राप्त करून दिला आहे. वंदना, अर्चना, आरती या नित्योपचारामधूनच ही आशयघनता प्रकट होताना दिसते. म्हणून त्या सहजपणे संदर्भ देतात.

**" दुसऱ्याचे दुःखे दुःखवावे । परसंतोषे सुखी व्हावे ।**
**प्राणिमात्रास मेळवून घ्यावे । बऱ्या शब्दे ॥**

व्यक्तीच्या विचार, आचार आणि उच्चाराचं गमक वरील ओवीत आहे. भक्ताचा व्यवहार कसा असावा, सुख-समाधानाचं स्थान किती, हे कटाक्षानं पण हळुवारपणे

मांडताना त्या म्हणतात, " जन्मापासून मृत्यूपर्यंत जीवनात समाधान किती, याचा शोध घ्यावा. असमाधानात अंत होऊ नये म्हणून वरील ओवी आचरणात आणावी. " शेवटचा क्षण गोऽड व्हावा" 'मी' चं 'मीपण' संपावं. मी म्हणजे देह नव्हे याची जाणीव व्हावी. द्वैत न मोडता हळूच अद्‌वैतात शिरावं यासाठी "दासबोध" असे त्यांचे प्रमेय आहे.

**" तुज सगुण म्हणू की, निर्गुण रे ।**

**सगुण निर्गुण एकू गोविंदू रे ॥**

अशी अनुभूती घ्यावी, असा ग्रंथ.

ग्रंथाचे नांव **" दासबोध माझं माहेर "** असे औचित्यपूर्णच योजिले आहे. कांता भक्तीमध्ये " माहेर " चं स्थान मोलाचं आहे. स्त्रीच्या अंतःकरणात " माहेर " हा एक कोष असतो. तिथं ऋजुता असते. सुरक्षितता असते. अपराधाला क्षमा असते. आनंदाचा फुलोरा असतो. आत्मिक समाधान लाभण्याचं निश्चित, असं हे स्थान असतं. या पार्श्वभूमीवर कु. आक्का सहजपणे लिहून जातात, " दासबोध हाती आला कीं, माहेरी गेल्यासारखं वाटतं. ओव्या वाचताना आई अंगावरून हात फिरवत्येय असं वाटतं. " वात्सल्याच्या स्पर्शानुभूतीचं हे हृद्य वर्णन एक आगळाच आनंद देऊन जातं. भक्तांची भावना किती समान असते नाही ! अगदी हीच भावना प्रकटलीय पहा.

**" माझं माहेर पंढरी । आहे भीवरेच्या तीरी ॥**

अभंग म्हणता म्हणता तल्लीन व्हावं, भगवंताशी एकरूप व्हावं, तादात्म्यता पावावी, ' मी ' पण अलगद गळून पडावं अभंगाचा भंग होऊ नये असं वाटत रहावं. " माहेर " या उच्चारातच हे भावविश्व रहावं आणि अनुभूती घेणही वाचकांवरच सोपवावं.

प्रा. अनंत वि. कुलकर्णी

# आशीर्वाद

समर्थ श्रीरामांच्या कृपेमुळे रामदासांच्या शिरावर ज्ञानऐश्वर्याचा मुकुट विलसत होता. पूर्ण वैराग्य त्यांच्या अंगी बाणलेले होते. आपल्या सामर्थ्य बळाने आणि संघटना कौशल्याने त्यांनी समाज एक संघ बनवला. बलवान राष्ट्राच्या निर्मितीत अहोरात्र झटून कार्य करणारा संत पुरूष म्हणेज श्रीसमर्थ रामदास एकच असावेत. अनेक मठ स्थापून महंत निर्माण केले. प्रपंच न सोडता परमार्थ कसा साधावा, त्यासाठी कोणत्या मार्गाने जावे याची शिकवण समाजातील प्रत्येक थरातील लोकांना त्यांनी दिली. राजापासून रंकापर्यंत सर्वांनाच जीवनाचा मार्ग दाखवला. चांगल्या जीवनक्रमाबरोबरच परमार्थातून परमेश्वर प्राप्ती कशी होईल याचे मौलिक आणि क्रमाक्रमाने मार्गदर्शन केले. त्यासाठी त्यांनी नऊ प्रकारची 'नवविधा भक्ति' सांगितली. ती संवादरुपाने गृहिणींसमोर श्रीसमर्थभक्त आक्काताईंनी मांडली. घराघरात जाऊन प्रत्येक गृहिणीला ती आत्मसात व्हावी आणि भक्ति लाभावी ह्या पुण्यशील भावनेतून कु. सुवर्णा जोशी हिने 'स्वामी प्रकाशन' तर्फे प्रकाशित केली. अशाच तऱ्हेचे भक्तिपूर्ण साहित्य स्वामी प्रकाशन तर्फे पुनः पुनः प्रकाशित होवो ही समर्थ चरणी प्रार्थना.

**-- प्रमोद जोशी**

(वास्तुशिल्पकार)

# मनोगत

दासबोध हाती आला की आईचा प्रेमळ हात अंगावरून फिरतोय असं वाटतं. कोणतंही पान उघडून वाचू लागलं की तिच्या कुशीतच शिरल्याचा आनंद होतो. नवनवीन विचारांची प्रेरणा मिळाली की तिने न्हाऊ घालून गोड घास भरवला असा आनंद होतो. जीवनांत टवटवी येते. म्हणूनच मी म्हणते ''दासबोध माझं माहेर''.

दासबोधच आपल्याला शिकवतो -

श्रवण करी एकचित्त तरीच रे मना
सहज साध्य होईल रे तुला साधना ॥ १ ॥
कीर्तन करी मनोभावे गाई ईशगुणा
दोष नाश होईल तू जाण सगुणा ॥ २ ॥
विष्णूचे स्मरण तुला का न आवडे ?
सोड सोड विषयांचे कोडं थोडे थोडे ॥ ३ ॥
पादसेवन भक्ती भली नित्य जोड अशी
आचरणी आण संतभावना कशी ॥ ४ ॥
अर्चन करी प्रभूचे तू वेच क्षण क्षण
प्रभू मूर्ती नटली रे पाही कण कण ॥ ५ ॥
वंदन करी सभोवार पाही जगदीश
नमनांतचि मनन होते हाच आदेश ॥ ६ ॥
दास्य करी मनी ठेवुनी भाव सेवेचा
सेवा भाव हाच खरा मार्ग मुक्तीचा ॥ ७ ॥
सख्य हवे कोणाशी हेच जाण तू
सखा हो तू देवाचा देवचि की तू ! ॥ ८ ॥
आत्मनिवेदन करण्या हवी अनन्यता
नवविधा भक्तीची हीच सांगता ॥ ९ ॥
प्रभू आपुल्या हृदयीच रे संत सांगती
आशा म्हणे कृपा गुरूंची देई प्रचिती ॥ १० ॥

प्रचिती देणाऱ्या सद्‌गुरूमाऊलीचेच चरणी हे पुष्प अर्पण !

**आशालता वेलणकर**

प्रकरण १

# अभिनव नवरात्र

दिंडी दरवाज्यातून बाहेर येऊन इंदिराकाकूंनी नीलाला अडवलेच. चक्क हात धरून ओढतच घरात नेले.

'बस जरा' असे म्हणून चटई पसरली. आपणही बैठक पक्की करून बसल्या.

'रोज पहाते मी. ठरल्या वेळेला घाईघाईनेच जातेस. इकडे कोणाकडे जातेस ? विचार करून डोक फुटायची पाळी आली. मी आज पाळतीवरच राहिले म्हणेनास का ! सांग. उगाच आढेवेढे घेऊ नकोस. कोणाकडे जातेस ? काकू म्हणाल्या.

नीला नुसतीच हसली. मनातच म्हणाली, 'काय उपयोग सांगून !' पण घरी जायची तर ओढ होती. सांगितल्याशिवाय गत्यंतर नव्हते. नीला म्हणाली, 'वळणापलीकडे स्नेहल सोसायटी आहे. तेथे मावशींच्याकडे मी जाते.'

'अगो ऽ बाई. हो का ! तेथे तर वस्ती आहे टारगटांची, झोपडपट्टी आहे ना जवळ.' काकूंनी विचारले.

'असेनाका झोपडपट्टी सोसायटीच्या जागेजवळ', नीला म्हणाली. 'त्यामुळेच झोपडपट्टीतल्या लोकांना शिस्त व स्वच्छता कळू लागलीय.'

' म्हणजे तू जातेस कोणाकडे ? मी येईन येईन म्हणते पण पायच निघत नाही.' इंदिराकाकू म्हणाल्या.

'स्नेहल सोसायटीत तळमजल्यातच श्री. गोडबोले रहायला आले आहेत. त्यांच्या सौ. त्यांना आम्ही मावशी म्हणतो सगळ्याजणी' नीला म्हणाली.

'सगळ्याजणी? म्हणजे किती जणी असता तुम्ही ? कोण कोण येतात ग ?' काकूंनी विचारले.

नीला - २/३ महिने झाले. १० जणी असतो आम्ही. रोज ज्ञानचर्चा चालते. आजच नव्या कामाचा संकल्प सोडला. मूहुर्तमेढ रोवली. 'आधुनिक नवरात्र'. उद्यापासून काम सुरु.'

'अगोऽबाई' काकू म्हणाल्या, 'आज तर करकरीत आवस की ग ! आणि मुहुर्तमेढ रोवली - काही ताळतंत्र. ती सांगते, तुम्ही ऐकता, अशी ती आहे तरी कोण विदुषी ! पाहिलचं पाहिजे एकदा तिला.'

'काकू त्यांचे पुरोगामी विचार पटायचे नाहीत तुम्हाला.' नीला म्हणाली. 'तुम्ही जुने सोडायला तयार नाही. नवीन विचार पेलत नाहीत.

एकीने तुमच्यासारखीच शंका काढली, त्यावर मावशी म्हणाल्या, ''आवस वाईट कशाने झाली, ज्याने पौर्णिमा निर्माण केली त्यानेच अमावस्या निर्माण केली. त्यातूनही चातुर्मासातील प्रत्येकच आवस किती महत्वाची पहा.

''आषाढी अमावस्या. कोणी गटारी अमावस्या पण म्हणतात. कोळी लोक, मासे

पकडून विकणारे, ते सुध्दा या अवसेला संकल्प सोडून आपापली जाळी गुंडाळून ठेवतात. संबंध श्रावण महिना मत्स्याहार नाही. उपासना करतात. रोज घरे सारवतात. उत्सव करतात. समुद्राची पूजा करतात व श्रावणानंतर त्यांचा धंदा पुन्हा सुरु होतो.

आषाढी अमावस्येला दीपपूजा सांगितली आहे. आम्ही मावशींचे घरी नव्या पध्दतीनेच दीप पूजन केले. कणकेचे दिवे उकडून खाल्ले की दीपपूजा होत नाही. ''

'अगोऽबाई हो का !' काकूंनी मांडीची चाळवाचाळव केली.

'आणि काकू ऽऽ' नीला म्हणाली. 'श्रावण आवसेला काय म्हणतात? पिठोरी अमावस्या. काही भागात त्या दिवशी बैल पोळा असतो. ज्याच्या कष्टावर आपण जगतो त्याचा सुटीचा दिवस तो. त्या दिवशी फक्त त्याचे मानेवर जू नाही. नांगरटीला जोडत नाहीत, किंवा कष्टाचे काम देत नाहीत. त्याची पूजा करतात. सजवतात. मिरवणूक काढतात. ती आवस वाईट कशी म्हणायची ?

भाद्रपदातल्या आवसेला तर सर्वपित्री अमावस्या म्हणतात. सर्व पितरांचे स्मरण करुन त्यांचे नांवे पिंडदान ब्राम्हण भोजनासह दक्षिणा म्हणून द्रव्यदान करतात.

त्यांचे आशीर्वाद घेऊन नवे काम सुरु केले तर बिघडले कोठे ? मावशीनी श्राध्दाची पण नवीन कल्पना आम्हाला सांगितली. ते पण पटले आम्हाला, आणि काकू आश्विन अमावस्येला तर लक्ष्मीची पूजा करतो आपण. लक्ष्मीपूजनाचा दिवस अमंगल कसा म्हणावा !

करकरीत अमावस्या, शिवाय त्यादिवशी ग्रहणही असेल आणि एक तारीख पण येईल तर पगार घ्यायला नाकारतो का आम्ही ?

काकू, आवस श्रेष्ठ का सांगू ? ज्याचेकडून चंद्राला प्रकाश मिळतो त्या सूर्याच्या संगतीत चंद्र २४ तास असतो. नंतर कलेकलेने वाढून अमृत वर्षाव करतो. सूर्यास्तानंतर उशीरा उशीरा मावळतो. त्या चंद्राला आपण उगवला म्हणतो, हे प्रमाण वाढता वाढता तब्बल १२ तासाचा फरक पडतो. पश्चिमेला सूर्यास्त व पूर्वेला चंद्रोदय.

आवस अशुध्द, पौर्णिमा शुध्द आवस अशुभ, पौर्णिमा शुभ असे म्हणता म्हणता काय होईल ?

प्रपंच जाईल सकळ। येथील श्रम तो निर्फळ।
आता काहीं आपुला काळ। सार्थक करूं ॥ ५।८।५॥

मावशी म्हणतात की चांगला विचार डोक्यात आला की तीच शुभ वेळ समजावी. आजपर्यंत त्याच त्याच चाकोरीतून सणवार दानधर्म करीत आलो. फक्त त्याच दिवशी पणती, निरांजन, समई, कंदील इ. घासून पुसून पूजा केली की दीपपूजा होते कां? कणकेचे दिवे करून उकडून खाल्ल्याने ज्ञानात काही भर पडते कां? प्रत्येकाने ज्ञानाचा दिवा उजळायला हवा. आजपर्यंत काय केलं?

भक्ति माता हे बुडविली। शांति विश्रांति मोडिली।
मूर्खपणे म्यां बिघडिली। सद्बुद्धी सद्वासना॥ ५।८।१५॥

'थांब नीला', इंदिराकाकू सरसावून म्हणाल्या, 'तुझ्या ह्या मावशीला विचार. भक्तीमाता बुडवली कशावरुन ? माझंच पहा ना ! दर एकादशीला रामाला जातेच ना ?



जरा लवकर किंवा उशीरा पण फराळाचे आधी जातेच ना ? परवाच्याच एकादशीला दोन वाजले. तरी भर उन्हात जाऊन गाभाऱ्याचे दार बंद होते तरी झरोक्यातून देव दर्शन घेऊन आलेच ना ! मगच फराळ केला. विचार तिलाच. ही भक्ती नव्हे का ?'

नीला म्हणाली, ' काकू देवळात देह नेला. मूठभर तांदूळ ठेवले. रामाच्या दिशेने झरोक्यातून फूल पान फेकले म्हणजे भक्ती केली म्हणतात कां? तुम्ही मावशींच्याच तोंडून भक्तीची व्याख्या ऐका. शुध्द भक्ती कशी करावी हे त्या छान उदाहरणे देऊन सांगतील. कोणी कोणतीही शंका विचारली तरी शांतपणे न रागावता शंका निरसन करतात. दासबोधाचा आधार घेऊन पटवून देतात. '

'देत असतील.' काकूंनी विचारले, 'पण मी म्हणते ती सधवा आहे की विधवा? नुसत्या कुंकवावर जाऊ नकोस. घटस्फोटीत सुध्दा कुंकू लावते. विधवा सुध्दा हल्ली कुंकू पुसत नाहीत.'

नीला म्हणाली, 'काकू ज्ञानाचा नी कुंकवाचा काय संबंध ? नसती उठाठेव करण्यापेक्षा ज्ञानार्जनांत वेळ घालवणे चांगले नाही कां? मघाच मी सांगितलं कीं गोडबोल्यांच्या सौ. नांवात काय मोठंसं. त्याची गरज तरी काय ? आडनावाप्रमाणे गोड बोलतात. नवीनच ओळख झाली तरी मावशी सारखे प्रेमाने वागतात. म्हणून आम्ही सगळ्या मावशीच म्हणतो त्यांना !

'काय ग !' नीलाला मध्येच थांबवून काकू म्हणाल्या, ' झोपडपट्टीत सुधारणा म्हणालीस ते काय ? ती झोपडपट्टीतल्या बायकांना पण घरांत घेते कां? शांतं पापम् गालाला तीनतीनदा हात लावीत काकूंनी नाराजी दाखवली. कोपरापासून हात जोडले.

नीला म्हणाली, 'काकू त्यांत पाप कसलं ? ती पण माणसेच आहेत ना? मावशींच्या बंगल्यासमोर दहाच झोपड्या आहेत. पुरुष सगळे सकाळीच कोठे तरी जातात. उन्हातान्हात कष्टाचे काम करतात. श्रम घालवण्यासाठी दारूच्या आधीन होतात.

मावशींनी त्यांच्याशी सुध्दा श्रीं. गोडबोल्यांमार्फत ओळख करून घेतली. दारूचे परिणाम समजावून सांगितले. थोडी बंधने घातली. अवास्तव पिऊन रस्त्यात पडण्यापेक्षा बाटली घरांत आणून भोजनोत्तर घ्या व स्वस्थ निजा. म्हणजे जगांत तमाशा होणार नाही. क्रोधावर ताबा येईल. चार बाटल्यांचा खर्च एका बाटलीवर भागेल असे सांगितल्यावर ५/६ जण सुधारले.

एक दोन धट्ट्या कट्ट्या बायकांना मोल मजुरीची कामे मिळवून दिली. त्यांचे संसार उभे केले. एका ओल्या बाळंतिणीला प्रथम आपल्या घरचे भांडी घासणे कपडे धुणे ही कामे जरूर नव्हती तरी दिली. आता तिचे मूल मावशी सांभाळतात ती बाहेर दोन वेळ कामाला जाते.

एका गरजू व कामसू बाईला शिवणकामाचा कोर्स पूर्ण करण्यास मदत केली, फी मावशीनीच भरली. कापड पुरवले. आता ती स्वतंत्र रित्या कपडे शिवून विकते. तिला आपलीच मशीन वापरायला दिली आहे.

जाणत्या मुलांना शाळेची गोडी लागेल असे केले. गोडबोले काका संध्याकाळी त्यांचे कडून व्यायाम करवून घेतात. नदीच्या पुराने गांव उध्वस्त झाले, म्हणून निराधार

झालेली ही माणसे. त्यांना केवढा मोठा आधार वाटतो गोडबोल्यांचा.

काकू म्हणाल्या, ''अग पण आपण ब्राह्मण न ! ती माणसे कोण्या जातीची, कोणत्या पातीची, चोर दरोडेखोर शिवाय दारूडे, त्यांच्याशी संगत. आणि तिचं तुम्ही ऐकता. म्हणे अभिनव नवरात्र साजरे करणार ! म्हणजे करणार आहे तरी काय ? ''

नीला म्हणाली, '' हे पहा काकू , मला शंभर प्रश्न विचारण्यापेक्षा तुम्ही स्वत:च तेथे या. प्रत्यक्ष पहा. मग काय बोलायचे ते बोला. मला तरी एक पटतंय -

जैसे मुखे ज्ञान बोले । तैसेचि स्वये क्रिया चाले ।
दीक्षा देखोन चकीत जाले । सुचिष्मंत ॥१२ । ४ ।१३ ॥

शुध्दाचरणी माणसे सुद्धा जेथे चकीत होतात तेथे गोर गरीब आकर्षित झाले, ही ईश्वरी कृपाच. हीच खरी देवपूजा असं दोघा पतिपत्नींचं म्हणणं मला तरी पटलंय. काकू आपलं अर्ध अधिक आयुष्य गेलं तरी आम्हाला घरांत आमच्याच मुलामुलींना वळण लावता येत नाही. ते त्यांना साधलं.

आधी त्यांनी छोट्या मुलांना समजावून सुधारणा केली. मोठी माणसे आपोआप सुधारली, अगदी साधी गोष्ट, अजून आमची सुशिक्षित मुले घरांत 'शी' काढावी लागू नये म्हणून रस्त्याच्या कडेला पाठवतो. पहाताच नं तुम्ही. पण मावशींनी त्यांना चर खणून शी झाल्यावर त्यावर माती लोटावी म्हणून सांगितले. चर भरला की दुसरे ठिकाणी. मुलांना गंमत वाटली, पटले व कांही दिवसातच हे खतासारखी माती उपयोगांत कशी आणावी हे ही सांगितले. मुलांची जागा वेगळी. मुलींची वेगळी. आपोआपच मोठी माणसे बंगल्यापासून झोपडीपासून लांब जाऊ लागली.

सांगा आता. आमच्या हातून समाजसेवा म्हणून असं कांही होतंय कां ?

जयास घडीने घडी । लागे भगवंती आवडी ।
चढती वाढती गोडी । भगवद्भनाची ॥ ४ । ३ । २३ ॥

झोपडपट्टीतील बायका पुरूष गुरूवारी एकत्र जमून भजन म्हणतात. ही मावशींची भक्ती. तीच खरी भक्ती मला वाटते. त्यांना पाहिले की भगवंत दर्शनाचा आनंद होतो.

'काय गं पण त्यांचेकडे हॉल बिल ऐसपैस जागा तरी आहे कां ? येवढ्या सगळ्यांना जमवतात ते. खुर्च्या बिर्च्या सगळ्या सोयी असतील. अभिनव नवरात्र ! म्हणजे देवीची स्थापना. त्याला ऐसपैस जागा नको कां ? काकूंनी मांडी सरसावीतच विचारले.

'काकू', नीला म्हणाली, 'मन मोठे असले की काही कशशाला कमी पडत नाही.

१० x १० च्या दोन खोल्या, पण कशा नेटक्या वस्तूंनी सजवल्या आहेत. पसारा म्हणून कोठे दिसतच नाही. खालची सगळी जागा रिकामी. भिंतीवर मांडणीत सामान लावले आहे. दोन तीनच वळकट्या पण अशा पद्धतशीर ठेवल्या आहेत की जसा काही कोचच. आम्ही दहा जणी अगदी ऐसपैस बसतो.

'काय गं निलू', काकूंनी जरा पडल्या आवाजांत विचारले. 'त्यांच्याकडे कपाटभर पुस्तके आहेत कां ग ? आमच्या घरी पहा. ह्यांना वाचनाची फार आवड, चांगले पुस्तक दिसले की आणलेच घरी.'

'आणि नुसते कपाट भरी' निलूंने वाक्य पूर्ण केले. 'पुस्तके भारंभार असली म्हणजे



खूप ज्ञानी झालो किंवा होतो. असे आहे कां ? काकू, त्यांच्याकडे फक्त दासबोध. अगदी हाताशी असतो यांच्या. समर्थांचेच म्हणणे आहे.

तैसे पारमार्थिक जन । तयास नस्ता आत्मज्ञान ।
ग्रंथ वाचिता समाधान । होणार नाही ॥ ९ । ९ । २५ ॥

ज्यातून आत्मज्ञान होत नाही त्या पुस्तकाला मावशी हात पण लावत नाहीत. त्यांचा एकच निर्धार पक्का. त्या पुन्हा पुन्हा म्हणतात.

जयास वाटे देव पाहावा । तेणे सत्संग धरावा ॥
सत्संगेविण देवाधिदेवा । पाविजेत नाहीं ॥ ५ । १ । २३ ॥

'अगोऽ बाई , हो कां ?' हनुवटीला हात लावूनच काकूंनी विचारले. म्हणजे मी दर एकादशीला रामाला जाते ते देवाला भेटणे नाही कां ? सत्संगाशिवाय भगवंतापर्यंत जाता येत नाही असं म्हणणारी ही मावशी जाळे टाकून तुम्हाला त्यांत अडकवतीय हे नाही लक्षात आलं कां तुमच्या ! स्वत:ला संत म्हणवून घ्यायची हौस फिटतीय. नी तुम्ही भाळलांत. गोऽऽऽ ड बोले म्हणे, हं ! नीला पाहिलंच पाहिजे तिला एकदा. किती वाजता जाता गं ?

नीला उठत उठतच म्हणाली, 'बरोबर तीनला जमतो आम्ही. कोणी आधी नाही कोणी पुढे नाही.

हास्यवदनाने स्वागत होतेच. हात पाय धुवायला झाडापाशीच सोय केलेली असते. अनायसे झाडांना पाणी पुरवले जाते. ही त्यांची दूरदृष्टी. पाय पुसून स्थानापन्न झालो की त्या दासबोध उघडतात. सहज दिसेल त्या ओवीवर सुंदर निरूपण करतात, चर्चा होते. प्रश्नोत्तरे होतात. कोणाची निंदा नाही, कोणाची स्तुती नाही. चर्चेतून योग्य ते उत्तर शोधून आम्ही वहीत लिहून घेतो. ठीक ५ वाजता शेवटची प्रार्थना होते. हसत मुखाने निरोप देतात. फाटकापर्यंत पोहोचवायला म्हणून येतात.

इतके बोलून नीला उठली. म्हणून काकूंना पण उठावे लागले. दारापर्यंत येत त्यांनी विचारलेच. 'मग मी येऊ का ग उद्या ?' मी ही अशी तोंडाळ, आवडलं नाही काही तर मी अडवणार, कांही विचारणार, खरपूस समाचार पण घेईन. हो पण काय गं, तिचा नवरा घरांत नसतो का ? त्यांना आवडतो का हा गोंधळ ? '

'काकू', नीला म्हणाली, 'गोंधळच, पण विचारांचा गोंधळ घालवण्यासाठीच आम्ही तेथे जमतो. काका बाहेर हवेत खुर्ची घालून बसलेले असतात. महत्वाचा कांही भाग असला तर ते उठून दारापर्यंत येतात, चर्चेत सामील होतात. दोघे अगदी एक विचाराने वागतात. जसे कांही कृष्ण रूक्मिणीच. निघते मी आता.

काकूंनी तिला कुंकू लावले. दिंडी दरवाज्यापर्यंत आल्या. 'मला हाक मार हो उद्या जातांना.' त्या म्हणाल्या.

नीलाने स्पष्ट सांगितले, 'ते जमणार नाही. तुम्ही दाराशी तयार रहा. दोघी बरोबर जाऊ. मी हाक मारण्याकरिता घरात येणार नाही. वेळ चुकता उपयोगाची नाही.'

नीलाने पुन्हा मागे वळून न पहाता झपाझप चालायला सुरूवात केली. मनाशी काही पुटपुटतच काकूंनी दिंडी दरवाजा लावला.

卐 卐 卐

प्रकरण २

## सावध सावध

'गोडबोले इथेच राहतात कां ?', इंदिराकाकूंनी फाटकाशी उभे राहून विचारले.

हसत मुखाने बाहेर येत मावशी म्हणाल्या, 'या, आत या. हेच गोडबोल्यांचे घर. मावशींनी सहज घड्याळाकडे पाहिले. पुन्हा एकदा म्हणाल्या, 'या न !'

फाटक बंद न करता पायरीवर चपला काढून काकू आत आल्या. कंबरेवर हात ठेवून खोलीत सगळीकडे नजर फिरवली. मावशींनी फाटक बंद केले. काकूंच्या पायरीवरच्या चपला बाजूला भिंतीशी ठेवल्या. आत आल्या. पुन्हा म्हणाल्या 'बसा नं काकू. कुठेही बसा. इथे भिंतीला टेकून बसलात तर छान वाराही येतो या दाराने.

मावशींची फाटक लावणे, चपला ठेवणे सारे काकूंच्या लक्षात आले. त्यांनी मान मागे पुढे केली. पदराने घाम पुसला, 'अगो ऽ बाई, मला काकू म्हणालात. तुम्हाला कसे कळले माझे नांव ? ती ढालगज भवानी बोलली असेल. अजून आली नाही वाटतं. काय शिष्ट आहे हो !' एका दमांत काकू बोलत बोलत बसल्या, 'तिला म्हटलं. मी आज येते. मला हाक मार तर चक्क नाही म्हणाली. '' दाराशी उभ्या रहा. तीनच्या आत तयार रहा. दोघी बरोबर जाऊ. मी आत येऊन हाक नाही मारणार'' मला का डोळे नाहीत, की हिनेच मला आणावे. म्हणून लवकर लवकर आटोपले आणि जरा लवकरच आले.

'बरं केलंत लवकर आलांत ते'. मावशी म्हणाल्या, 'पण ज्यांच्या बद्दल नाही म्हटलं म्हणून तुम्ही रागावलांत त्यांच काय चुकलं ? एकमेकांत अडकून पडलं की उशीर होतो. मीच सर्वांना तीन म्हणजे तीनलाच यायचं असे सांगितले आहे. उगाच आधीपासून येऊन नको ते बोलणे बरे नाही वाटत.'

'ते खरं पण मी इथे पहिल्यांदाच येतीय. मला काकू म्हणून कसं ओळखलंत ?' काकूंनी विचारले.

मावशी म्हणाल्या,' कांही विशिष्ट वय, विशिष्ट आकार याला साजेशी नांवे हा तर्काचा विषय आहे. बऱ्याच वृध्द असता तर आजी म्हटले असते. अगदी बरोबरीच्या असता तर ताई, आक्का म्हटले असते. आता तर्कानेच तुमचे नांव सांगू ? इंदिरा किंवा लक्ष्मी असावे.'

'अगोऽबाई कसं नेमक ओळखलंत हो' काकू चकित होऊनच म्हणाल्या.

'त्यात अवघड काय ? तुमच्या बंगल्यावरून रोज एक फेरी होते माझी. फाटकापाशीच खांबावर मोठ्या अक्षरांत पाटी आहे. श्री. नारायण माधव साने. होय ना? पतीचं नाव हे असलं की पत्नीचं हेच असावं अशा काळातला तुमचा विवाह. ते नारायण तर तुम्ही लक्ष्मी किंवा इंदिरा. मला इंदिरा हाच तर्क खरा वाटला.

'धन्य आहे हो !' काकू म्हणाल्या. 'आणि काय हो. ही समोर झोपडपट्टी, दारं उघडी ठेवून वावरता. तुम्हाला भीती नाही वाटत ?'

'माणसाला माणसाची भीती ?' मावशी म्हणाल्या. 'त्यांची भीती वाटायला ते काय



राक्षस आहेत? त्यांनाही बायका पोरं आहेत. संकटांत सापडलीत. झोपड्या बांधून राहिली आहेत.

जगाशी असावे जगमित्र । जिव्हेपाशी असे सूत्र ।।

असे समर्थ म्हणतात. आपण गोड तर सारे गोड. वाणी गोड बोलण्यासाठीच दिली आहे.'

इतक्यात नीला आली. तिला पहाताच काकू म्हणाल्या, 'ही पहा आलीच भटक भवानी.'

'या नीलाताई,' मावशी आज काकूंच्या मुखातून तुम्हाला पार्वती मातेची पदवी मिळाली. नवरात्रीचा पहिला दिवस आहे आज. भवांनी माता म्हणजे पार्वती, त्या इंदिरा तू पार्वती. बस त्यांचे शेजारी. मी शकुनाचं कुंकू लावते तुम्हाला. बघा तीन वाजलेच. आल्या सगळ्याजणी.

नवरात्रीचा १ ला दिवस. देवीची पूजा करूनच सुरुवात करू या. सगळ्यांनी पाय धुतले आहेतच. काकूंचे पाय धुवून ओटी भरून पूजन करू या. ही देवीचीच पूजा.

मावशी आत गेल्या. परात, पाणी, पाय पुसायला टॉवेल, हळद कुंकूवाचे करंडे घेऊनच बाहेर आल्या. एकीने काकूंच्या पायावर पाणी घातले. दुसरीने ते हाताने चोळले. तिसरीने परात उचलली व पाणी झाडाच्या मुळाशी घालून आली. चौथीने पाय पुसले. पाचवीने हळद कुंकू लावले.

तोपर्यंत मावशी अत्तरदाणी, गुलाबदाणी घेऊन आल्या. सहावीने अत्तर लावले. सातवीने गुलाब पाणी शिंपडले. आठवीने ओटी भरली. मावशींनी निरांजने लावून आणली. नववीने आरती केली. दहावीने साखरफुटाणे काकूंच्या हातावर ठेवले.

सगळ्यांनी मिळून देवीची पूजा या भावनेनेच काकूंना हळदकूंकू लावले. मावशी दासबोध घेऊन दाराजवळच बसल्या.

'अगोऽबाई, कसं यंत्रासारखं काम झालं, काकू आनंदून म्हणाल्या. 'काही बोलणं नाही. वादविवाद नाही. मी तू नाही. तुम्ही ठरवलंच होतं कां? पण काय हो मावशी, देवीच्या देवळांत जाऊन देवीचे दर्शन घेऊन तिची ओटी भरली की समाधान व पुण्य काही वेगळंच ! नाही कां?'

मालतीबाई म्हणाल्या, 'ते ठराविक चाकोरीतले मूर्ती दर्शन झाले. त्या दर्शनाने प्रसन्नता आल्याचा, खरे खरे समाधान खसखशीइतके तरी होते कां? त्याचा प्रत्यय कधी आलाय कां? पुजारी ओटीचे सामान घेतो. देवीच्या पायाला लावून एका बाजूला खण फेकतो. दुसऱ्या बाजूला नारळ टाकतो. आपल्याला देवीपर्यंत जाऊन तिला हळदकूंकू तरी लावता येते कां? उलट धक्काबुक्कीने करंडा सांडतो. झाकण हरवतं. ढकलाढकली होते. ना दर्शन ना प्रसन्नता. अभिनव नवरात्राची सुरुवात तरी छान झाली. देवी पूजन सगळ्यांनाच घडले. एकदिलाने कार्य पार पाडल्याचा आनंद सर्वांनाच झाला. वेळही वाचला. आनंद लुटता आला.

सुशीलाताई म्हणाल्या, 'मावशीचं ऐकलं म्हणून हे सारं जमलं. कोणी कांही चांगलं मार्गदर्शन केलं की ते जरूर ऐकावं.'

नीला म्हणाली, 'पण जुने तेच सोनं. असं म्हणणाऱ्यांचं मन ठरल्या चाकोरीतून बाहेर पडायलाच तयार होत नाही. त्याचे काय ? ते कसं जमवावं ? त्यांना कसं समजावं ?'

काकू म्हणाल्या, 'कळलं. मी अगदीच अडाणी नाही. हा टोला मला आहे हे समजले मी. दर मंगळवारी, शुक्रवारी देवीला जायचा नियम १२ वर्षे झाली तरी मोडला नाहीय म्हटलं !'

पूर्वा म्हणाली, 'काकू पण या १२ वर्षात कांही परिवर्तन झालंय कां? अगदी मनापासून सांगा. आम्ही देवी समजून तुमचे पाय धुवून पूजन केले. याचा तुम्हाला सुध्दा मनोमन आनंद झाला की नाही? तसा आनंद १२ वर्षात दर्शन घेतांना किंवा घेतल्यावर झाला आहे का? कथा कीर्तनं खूप ऐकलीत पण खरं श्रवण घडलंय कां?

काकू म्हणाल्या, 'खरं म्हणजे काय? राम मंदिरात नेहमी कीर्तनं होतात. मी न चुकता कीर्तनाला जाते. उशीरा गेले तरी अगदी बुआंच्या जवळची जागा पकडते. कीर्तन ऐकून आरतीत पैसा टाकते ते श्रवण नव्हे कां?'

मावशी म्हणाल्या, ' काकू हरिकथा जरूर ऐकावी. त्यांतील अध्यात्म निरूपण ध्यानात ठेवून त्याप्रमाणे आपले आचरण सुधारीत रहावे. तर ते खरं श्रवण. अध्यात्म निरूपण ज्यांत आहे अशा ग्रंथाचे एकाग्र चित्ताने वाचन केले तरी ते श्रवणच. मी जे शब्द वाचले ते अर्थासह खोल अंत:करणात शिरले पाहिजेत.

सुनीताबाई म्हणाल्या, 'ग्रंथ वाचून जर श्रवण घडत असेल तर, म्हणजे श्रवणाचा लाभ होत असेल तर कथा कीर्तनाचे प्रयोजनच काय ? कशाला करायचे हे कार्यक्रम?'

मावशी म्हणाल्या, 'ज्यांना कमी ऐकू येते किंवा अजिबात ऐकूच येत नाही त्यांच्या करता हा मार्ग. एकाग्र चित्ताने वाचनाचा. चांगलं ऐकायला येणाऱ्या व्यक्तीने वाचून ज्ञान मिळवू नये असे नाही. पण ग्रंथातल्या वाचलेल्या शब्दापेक्षा दुसऱ्या व्यक्तीच्या मुखातून तोच भाग श्रवण केला तर मनावर वेगळा परिणाम होतो. हावभाव युक्त भाषण हृदयापर्यत जाऊन भिडतं. प्रत्यक्ष बोलतांना बोलणाराला गहिवर आला तर त्याचा कंठ दाटतो. व नकळत आपल्याही डोळ्यांत पाणी येतं. यालाच हृदयापर्यंत जाऊन भिडणे म्हणतात.

काकू म्हणाल्या, 'पण मी म्हणते श्रवणाला अध्यात्मच पाहिजे हा हट्ट कशाला? परवा मी गेले होते कीर्तनाला. काय विनोद काय ते बुवांचे हातवारे ! कोट्यावर कोट्या. हसता हसता पुरेवाट झाली. दोन तास तरी सारं दु:खं गेलंच. हसणंच हसणं. मला तरी बाई आवडलं ते कीर्तन ! छान करमणूक झाली.'

मावशी म्हणाल्या, 'अशी हजारो कीर्तने ऐकली व आपल्या वागणुकीत कांही चांगली सुधारणा घडलीच नाही तर काय फायदा? समर्थ म्हणतात !

श्रवणें आतुडे भक्ती । श्रवणें उद्‌भवे विरक्ती ।
श्रवणें तुटे आसक्ती । विषयांची ॥ ७ । ८ । २ ॥

हास्य विनोद नसावा असे नाही. पण केवळ करमणुकीचे श्रवण नको. आयुष्य वाया जाते. भक्ती वाढीस लागण्यासाठी श्रवण हवे. निरुपणांत गोष्टी रुपाने विरक्त पुरुषांच्या जीवनांतल्या कांही गोष्टी, प्रसंग ऐकले की त्याचा परिणाम होऊन आपल्यातील एकतरी



दुर्गुण जातोच. विनोद करमणुकीचे श्रवण घडून विषयांची आसक्ती कमी कशी होईल? उलट वाढेल.

श्रवणें विचार कळे । श्रवणें ज्ञान हे प्रबळे ।
श्रवणें वस्तु निवळे । साधकासी ॥ ७ । ८ । ११ ॥

काकू, आपण इथे जमलो आहोत त्या सगळ्याच तिशी ओलांडून गेलेल्याच आहेत.'

मावशींना थांबवत काकू म्हणाल्या, 'अगोऽबाई माझे ! तिशीच काय ग ! चांगली साठी ओलांडली की मी ! केस पांढरे झाले. दात बाकी शाबूत आहेत अजून. तुम्हा सगळ्यांच्यापेक्षा १०/२० तरी पावसाळे मी जास्त पाहिल आहेत.'

नीला म्हणाली, 'देहाचे वय वाढले म्हणजे ज्ञान झाले असे होत नाही. आमच्यापेक्षा जास्तीच्या पाहिलेल्या पावसाळ्यांत साधक व्हायचा प्रयत्न किती केलांत ? त्या १०/२० वर्षात आपल्यांत कांही दुर्गुण आहेत असे तरी ध्यानात आले कां? गहन विचार कळला की ज्ञान शक्ती वाढली? फक्त देह पोसला. संसार केला. आम्ही येथे येतो तो प्रपंच करता करताच. परमार्थ कसा साधावा हे शिकण्याकरिताच येतो.

प्रियंवदा म्हणाली, 'श्रवणाने आत्मज्ञान झाले नाही. अज्ञान, अविद्या कमी झाली नाही. तर काय उपयोग?

मावशी म्हणाल्या, 'आपण सगळ्याजणी वाल्याचा वाल्मीकी कसा झाला हे जाणतोच ना? संतांच्या मुखावाटे पवित्र नाम ऐकले. केवढे मोठे कार्य घडले त्यांचे हातून?

सुशीलाबाई म्हणाल्या, 'श्रवणानेच राजा परिक्षिताचे, मृत्यूचे भयच टळले. भागवत श्रवण केले. हसत मुखाने मृत्यूचा क्षण जिंकला. देहासक्तीच नष्ट झाली. ब्राम्हणरुपाने तक्षक आला. चावला. गेला. शुकमुनींच्या आशिर्वादाने ध्यान लावून बसल्यावर त्याला कांही कळलेच नाही.'

शांता म्हणाली,' नाथांच्या शांतपणाच्या कितीतरी गोष्टी मावशींनी आत्तापर्यंत सांगितल्या, तेव्हापासून चिंतन करता करता माझा क्रोध कमी कमी व्हायला लागलाय. मला पूर्णपणे जाणवतंय. घरांत इतरांच्याही हे लक्षात आलंय. मुले पावणेतीन पासूनच मला जाणीव देतात. घरी गेल्याबरोबर, 'आज काय सांगितलं मावशींनी?' असं आवर्जून विचारतात.

काकू म्हणाल्या, 'अगोऽबाई, हो का ? मग मावशी, आज सांगा ना काहीतरी.

मावशी म्हणाल्या, 'श्रवणाचेच महत्व गाऊ या.'

बोलिल्याचा अर्थ कळे । तरीच समाधान निवळे ।
अकस्मात अंतरी वोळे । नि:संदेहता ॥ ७ । ८ । ४० ॥

मग ते श्रवण कथां कीर्तनाचे असो वा व्यावहारिक उपदेशाचे असो. संशयरहित अवस्था व्हावी व समाधान कायम टिकावे. वयाचा, श्रीमंतीचा, ज्ञानाचा कसलाही गर्व अंगी नको. अगदी सत्य घटना सांगते.

एक सामान्य गरीब बाई. परोपकारी वृत्ती. अडीपडीला कोणाच्याही कार्याला हातभार लावायला तत्पर. त्याच गांवातल्या श्रीमंत मामलेदारबाईंनी त्यांना एकदा मुद्दाम खवचटपणे विचारले. 'मी आजपर्यंत खूप नियम् केले. भला मोठ्ठा पाढा वाचला दानाचा. माझ्या

इभ्रतीला शोभेल असा चार्तुमासाकरिता नियम सांगा. उगाच तुमच्या परिस्थितीचा विचार नको. माझ्या इभ्रतीला शोभेल असा नियम सांगा !

अत्यंत शालीनतेने बाई म्हणाल्या, 'ऐकायला हलका वाटेल पण जड जाईल. सांगा म्हणता म्हणून सांगते. आज जे दान देऊ त्याच्या दुप्पट दान दुसरे दिवशी द्यायचे. उदाहरणार्थ आज तांदळाचा १ दाणा ब्राम्हणाला दान द्यायचा.'

मामलेदारीणबाई फिसकन हसल्या. 'टर उडवताय काय माझी?'

शांतपणे बाई म्हणाल्या, 'ऐका तर खरं. उद्या २ दाणे, परवा ४ दाणे, मग ८, १६, ३२ असे दाणे किती मोजत बसणार म्हणून साधारण पंचामृताची चिमणी वाटी असते ना, तेवढे दाणे झाले की दाणे न मोजता आज १ वाटी, उद्या २ करिता करिता मोठ्या वाटी इतके प्रमाण झाले की मोठ्या वाटीने दान द्या. करिताकरिता मोठे माप भरेल. मग मापाने दुप्पट दुप्पट करा. अर्धाचार्तुमास होत नाही तोपर्यंत पोत्यापर्यंत प्रमाण वाढेल. आज एक पोते दान दिल्यावर उद्या दोन पोती.'

आता मामलेदारीणबाईचे डोळे उघडले. 'नको नको' हा नियम मला झेपणार नाही. चुकले मी. तुमच्या बुध्दीची परीक्षा पहायला गेले. हरवलेत मला.'

बाई समजूतदार होत्या. 'त्यात क्षमा कसली करायची? जगांत उच्च नीच असणारच. दुसऱ्याला न हिणवता आपलं समाधान टिकलं पाहिजे. असे श्रवण रोज घडावे.'

मावशी म्हणाल्या, 'बाईचे म्हणणे पटले कां? दुसऱ्याच्या भाषणाचा अर्थ लक्षात यावा. तो मनात पक्का ठसला की सगळे संशय, शंका संदेह सारे सारे नष्ट होईल. वृत्ती स्वच्छ होईल. पण त्यासाठी नक्की काय करायचे?'

सुमित्रा म्हणाली, 'मी सांगते मावशी, एकाग्र चित्ताने श्रध्देने श्रवण करायचे.

सगुण देवाची चरित्रे। निर्गुणाची तत्वे यंत्रे।
हे दोनी परम पवित्रे। ऐकत जावी ॥ ४ । १ । ३१ ॥

काकू म्हणाल्या, 'अगोऽबाई मग व्याख्यानं, भाषणे, ऐकायची नाहीत का? जाहीर सभांना जायचं नाही कां? मला बाई हे सगळं आवडत ऐकायला !'

मावशी म्हणाल्या, 'काकू, आपण जगातच रहाणार. वावरणार. हे सगळं ऐकलं तरी काय करायचं ? समर्थ स्पष्टपणे सांगतात.

ऐसे हे अवघेचि ऐकावे। परंतु सार शोधून घ्यावे।
असार ते जाणोनि त्यागावे। या नाव श्रवण भक्ती ॥ ४ । २ । २९ ॥

आपण व्यवहारांत काय करतो? सरसकट डब्यातून तांदूळ काढून भात करतो कां ? हवे तेवढेच घेतो. पाखडतो, निवडतो, खडा, भातगोटा दूर करतो. तेच परमार्थात करायचे. अडसरासारखे भक्तीच्या आड येणारे विचार जरी ऐकले तरी खड्यासारखे दूर फेकून द्यायचे, पुन्हा त्याकडे पहायचे नाही. म्हणजे लक्षांत ठेवायच्या मोजक्या विचारांचे चिंतन घडते.

प्रियंवदा म्हणाली, 'मावशी, म्हणजे कोणी ढालगज भवानी म्हटले तरी ढालगज शब्द खड्यासारखा बाजूला करायचा, भवानीचा अर्थ उच्च पातळीतून विचार करून स्वीकारायचा. आनंद तेवढा जवळ करायचा. हीच आजची शिकवण समजते मी !



काकूंचे डोळे मोठे झाले. भिवया उंचावल्या. मान मागे पुढे हलली. साऱ्यांचे त्यांचेकडे लक्ष होते.

मावशी म्हणाल्या, ' अग, कोथिंबीरीची जुडी आणली की त्यात एक तरी गवताचे पाते निघणारच. तिकडे दुर्लक्ष करायचे. त्याचा उच्चार पण करायचा नाही. त्यानें पण दुसऱ्यांचे मन दुखवले जाते. याचा विचार करायचा. दुसऱ्याला दुखवून आपले समाधान टिकणार नाही. कळत न कळत ते छोटेसे पापच केल्यासारखे होईल. सारखं मनाला बजावायचं - बा मना, श्रवणाचा कंटाळा करू नकोस. श्रवणाने बुध्दीला स्नान घडते. ज्ञान वाढते. ते ज्ञान मलीन होऊ नये म्हणून समर्थ म्हणतात,

तैसे ज्ञान होता मळीन। अज्ञान प्रबळे जाण।
याकारणें श्रवण। अखंड असावें ॥ ७ । ५ । ४२ ॥

अखंड श्रवणाने ज्ञान ताजे तवाने नित्य नूतन रहाते. त्यावर बुरशी येत नाही. बुरसलेला पदार्थ रस्त्याच्या कडेला ठेवला तर कुत्रा सुध्दा खात नाही. ज्ञानावर बुरशी येऊ देऊ नये. म्हणून सातत्याने श्रवण.

सावित्रीने विचारले, 'मुख्य श्रवण कशाचे व्हावे ?'

मावशी म्हणाल्या, ' हे बघ -

तें जाणावे परब्रह्म। जें वेदांचे गुह्य परम।
धरिता संत समागम। सर्वही कळे ॥ ६ ।१० ।८ ॥

सत् संगती जर लाभली तर जरूर फायदा उठवावा. वेदांत सांगितलेले परब्रम्हाचे गुह्य ज्ञान ते ऐकावे.

संगतीत चार फायदे सामावतात. श्रवण तर घडतेच. पण नवीन नवीन ओळखी वाढतात. जुन्या नव्यांच्या भेटी गाठी होतात. हवा पाण्याच्या गोष्टी न बोलता अध्यात्म विषयक चर्चा साधावी.

दुसऱ्याच्या दुःखात सामील होऊन त्यांचे दुःख हलके करावे. तसेच सुख प्रसंगांत सामील होऊन सुखाचा प्रमाणात आस्वाद घ्यावा. समरसता वाढते.

ऐकलेल्या गोष्टीचे चिंतन करण्यास वाव मिळतो. खरा फायदा आपल्यातले दुर्गुण स्पष्टपणे कळतात व ते दूर करण्याचा उपाय सापडतो.

सावित्री म्हणाली, 'मला तर वाटते आपण कल्पनेतूनच जास्त दुःख निर्माण करतो. आणि ते पोसतच रहातो.'

मावशी म्हणाल्या, 'अगदी बरोबर. म्हणूनच समर्थ स्पष्ट सांगतात -

श्रवण आणि मनन। निजध्यासें समाधान।
मिथ्या कल्पनेचें भान। उडोन जाये ॥ ७ । ५ । २७ ॥

श्रवणाचे मनन घडले तरच स्वस्वरूप समजून घ्यायचा ध्यास वाढतो. मन चिंतनशील होते. समाधानाचा मार्ग मोकळा होतो. कल्पना देशोधडीला लागतात.

इथ पर्यंत अभ्यास आला की मनाला पुन्हा बजावायचे, बा मना,

मना, सावध सावध। असता बेसावध होईल रे वध मना सावध सावध।

पापाची वासना । भोगवील यातना ।
नको योनी नाना । सावध सावध ॥ १ ॥
सत्य वाट धरी । जीवाला उध्दारी ।
नको येरझारी । सावध सावध ॥ २ ॥
लागता रे चटक । विषयी हो अटक ।
नको कल्पना भटक । सावध सावध ॥ ३ ॥
काम क्रोध लोभ । वाढवितो क्षोभ ।
नरदेह दुर्लभ । सावध सावध ॥ ४ ॥
सद्गुरूंचा बोध । आशा हो सावध ।
प्रपंची ना बाध । सावध सावध ॥ ५ ॥

अशा सावधगिरीने वागलो तर हित का नाही होणार ?

समर्थ म्हणतात -

नरदेहाचे उचित । कांही करावे आत्महित ।
यथानुशक्त्या चित्तवित्त । सर्वोत्तमीं लावावे ॥ २ । ४ ।१३ ॥

हे कसे लावायचे हे कळण्यासाठी श्रवणभक्ती. भक्तीच्या नऊ पायऱ्यातली ही पहिली पायरी.

काकू म्हणाल्या, 'आगो ऽ बाई पंढरपूरची विठ्ठल मंदिराची नामदेवाची पायरी, तशी श्रवण भक्ती पहिली पायरी. मग दुसरीचं नांव काय ?'

मावशी म्हणाल्या, 'आता ते उद्या पाहू. आज नवरात्र पहिला दिवस. श्रवण भक्ती अभ्यासली. सुरूवात छान झाली. पाचही वाजले. आता आरती करूया व प्रसाद घेऊया.

**अंबा माता की जय ।**
**। जय जय रघुवीर समर्थ ।**

卐 卐 卐



प्रकरण ३

## भाबडं कीर्तन

नीलाला खात्री होती आज काकू नक्कीच येणार नाहीत. पण आश्चर्य करायची पाळी तिच्यावर आली. ती फाटकापाशी आली. काकू पायरीवरचचपला काढीत होत्या. नीलाला पाण्याच्या बादलीकडे जातांना त्यांनी पाहिले.

'आगो ऽ बाई, मी पाय धुवायची विसरलेच की ! ' असे म्हणत काकू पायरीवरून खाली आल्या. नीलाने त्यांच्या चपला ओळीत ठेवल्या. हात धुतले, नीलाच्या पाठीवर 'शाब्बास' म्हणून थाप बसली.

'काल तुला मी 'ढालगज' म्हटले, राग नाही ना आला ?' काकूंनी विचारले, 'मला मेलीला संवयच लागलीय, कशी जाईल कोणास ठाऊक'.

पाठोपाठ सावित्री, प्रियंवदा, सुमित्रा, शांता, सुशीला सगळ्या कशा पटकन जमल्या.

हसून सगळ्यांचे 'या' म्हणून स्वागत करून मावशी पण बसल्या. 'आज नवरात्रीचा दुसरा दिवस. सप्तशती वाचूया कां ?'

मावशींनी पृच्छा केली.

सावित्री म्हणाली, 'पण काल सांगितलं असतं तर पुस्तके घेऊन आलो असतो. शिवाय सगळ्यांनाच कुठे संस्कृत येतंय. मला तरी काही बाई भरभर वाचता येत नाही.'

प्रियंवदा म्हणाली, 'अगं संस्कृत येत नसलं तरी अडून बसू नये. मराठी अर्थ मन लावून वाचला तरी सप्तशतीचा पाठ केला असे होईल.

मावशी म्हणाल्या, 'बरोबर, सगळ्यांच्याच जवळ पुस्तके असावीत असे नाही. माझ्याकडे चार प्रती आहेत. दोघी दोघीत एक एक घेऊन भागेल. काकू आणि मी एकाच पुस्तकांत पाहू. तुम्ही ही घ्या.' मावशींनी पुस्तके काढूनच ठेवली होती.

सुशीला म्हणाली, 'मराठी वाचू या की संस्कृत ?'

मावशी म्हणाल्या, 'दोन्ही वाचू या. सर्वांचे समाधान होईल. आपण जे वाचतो त्याचा अर्थ कळला पाहिजे. नाहीतर वाचनाचा काय फायदा ? न कळलेल्या हजार शब्दापेक्षा कळलेले दहाच शब्द अति मोलाचे समजावेत. संस्कृत भाषा बोलण्याइतकी नाही तरी वाचण्याइतकी प्रत्येकीला यायलाच हवी. आपण असं करू या नमन स्वरूपांत प्रथम मी श्रीसूक्त सांगते नंतर मराठी अर्थ एकेकीने वाचू या.

काकू म्हणाल्या, 'मला मेलीला, (जीभ चावून ) असं म्हणायचं नाही हे विसरलेच. मला घडाघड मराठी तरी कुठे वाचता येतंय. पण मावशी मी श्रीसूक्त म्हणू कां ? मला पाठ येतंय, लहानपणीच अथर्वशीर्ष, रामरक्षा, श्रीसूक्त सारं कांही वडिलांनी शिकवलं. मी संकष्टीला अथर्वशीर्ष म्हणते. रामरक्षा रोज म्हणते. मंगळवार, शुक्रवार श्रीसूक्त म्हणते. थांबत, थांबत म्हटले की चुकते. मी एकटीच म्हणू कां ?

सगळ्यांनी होकार दिला. काकूंनी एकटीने श्रीसूक्त स्पष्ट छान पध्दतीने म्हटले. संपल्यावर बसल्या. सर्वांना नमस्कार केला. सर्वांनी टाळ्या वाजवल्या.

नंतर पुस्तकांत पाहून सप्तशतीच्या पाठातला अर्थही सर्वांनी वाचला. प्रत्येक अध्याय संपल्यावर भजनही म्हटले.

कोल्हापूरची अंबाबाई, तुळजापुरची भवानी
गडावरती रेणुका, सप्तशृंगी वरदायिनी ॥

वाचनाचा भजनाचा कार्यक्रम उत्तम पार पडला. काकूंचा चेहरा आनंदाने फुलला होता. 'कसं छान वाचलंत पोरींनो, कानाला गोड लागलं. आमच्या घरीही दरवर्षी पाठ होतो.'

भटजी देवघरांत, हे बाहेरच्या खोलीत. मी स्वयंपाक घरात काम करता करता जेवढे ऐकू येईल तेवढे ऐकायचे असे करते. तेही मराठी नाहीच. संस्कृत ओव्या वाचतात. गुणगुणगुण भराभर वाचतात. त्यांना रोज दूध देते. दक्षिणा देते. शेवटच्या दिवशी अगदीच सव्वा रूपया नाही टेकवत हो. चांगली ११ रु. दक्षिणा देते. आपल्या घरी देवी पुढे पाठ झाला एवढेच समाधान !

सगळ्याजणी एकमेकींकडे पहात होत्या.

प्रियंवदा म्हणाली, 'काकू आपण जो दानधर्म करतो तो बोलून दाखवायचा असतो का? बोलले की पुण्य खलास ! बाकी शून्य !

काकू म्हणाल्या, 'अगो बाई हो कां? कुठे हे असं लिहिलय. सांगितल्याशिवाय जगाला कसे कळेल?

प्रियंवदा म्हणाली, ' दानधर्म, परोपकार हे हाकाटा पिटण्यासाठी करायचा असतो का? जगाला न कळलं तर बिघडलं कुठे ? दासबोध वाचलांत कधी ? समर्थ म्हणतात,

आपल्याची गोही देऊ नये । आपली कीर्ती वर्णू नये ।
आपले आपण हासो नये । गोष्टी सांगोनी ॥ ९ । २ । २४ ॥

मावशी म्हणाल्या, 'प्रियंवदा, तुझं म्हणणं जरी बरोबर असलं तरी थोडा संयम ठेवू या. जुने हाड ! वाटते बोलावेसे. आपण ऐकून ते विसरून जावं. सांगायचंच झालं तर पर्यायाने सांगावे. आता काय होईल बघ. चांगलं देवीचं स्तोत्र म्हटलं. कीर्तन चालू आहे. प्रभूगुण गात आनंद लुटायचा आहे. त्याला फाटा फुटतोय.

हरिकथा सांडूं नये । निरुपण तोडूं नये ।
परमार्थास मोडूं नये । प्रपंचबळें ॥ २ । २ । ३५ ॥

बोल बोलता विषयांतर होते. वाद विवाद वाढतो. मनं तुटतात. मन देहात्मबुध्दीने झाकलेले, लपेटलेले असते.

देहाचेनि योगें संशयो । करी समाधानाचा क्षयो ।
चळो नेदावा निश्चयो । आत्मत्वाचा ॥ ५ । १० । ३५ ॥

एकदा का मने तुटली की संशय घर करते. संशयाचं वारं शरीरांत शिरलं की समाधान पार मावळते, केलेला निश्चय बिघडतो. आपण अभिनव नवरात्राचे निमित्त करून आदिशक्ती आदिमाया तिचे गुणगान गाइले. सुंदर कीर्तन चाललंय आपलं.



मावशींना थांबवीत काकू म्हणाल्या, 'अगोऽबाई, सप्तशती वाचली म्हणजे कीर्तन कां? ना पेटी ना तबला. साधी झांज ही नाही. ना अभंग ना निरुपण. हे कीर्तन कसे हो?

मावशी म्हणाल्या,'काकू, भगवंताची कीर्ती गाणे म्हणजे कीर्तन. त्याला तुम्ही, म्हणालात तो संच बरोबर योग्यच आहे ते. पण तसं कांही नसता गाणं म्हटलं, स्तोत्राने आळवले, त्याची कर्तृत्वाची थोरवी गायली, की ते कीर्तनच ठरते. मग ते एकानेच गावे किंवा समुदायाने, तरी ते कीर्तनच.

दुर्गेचे नवरात्र. भक्तांच्या रक्षणाकरिता सर्व देवांची शक्ती स्त्री रूपाने प्रगटली. राक्षसांचे निर्दाळण केले.

काकू म्हणाल्या, 'मला तिची एक गोष्ट फार आवडते. सांगू का ? पण मला मेलीला जमेल कां ?

सुशीला हळूच म्हणाली, 'मेल्यावर नाही जमायची. आताच जमेल.'

मावशींनी किंचित हसून तिला दटावले.

काकू म्हणाल्या, 'मावशी, मी ऐकलं ती काय म्हणाली ते. पण माझी संवयच जात नाही. आता पुन्हा कधी मी 'मेलीला' म्हटलं की थप्पड मारा मला. म्हणजे पक्कं लक्षात राहील माझ्या.'

नीला म्हणाली,'आज आधी गोष्ट तरी सांगा.'

काकूंनी घसा खाकरला. पदर अंगभर घेतला. नमस्कार करून म्हणाल्या, 'अंबामाताकी जय ! मंगलमूर्ती मोरया. गोपाल कृष्ण महाराज की जय !

'गोष्ट म्हणजे अशी कीं एकदा शंकर पार्वती सारीपाट खेळत होते. दोघेही खेळण्यात तरबेज. बहुतेक वेळी शंकरावरच हरण्याची पाळी येई.

पार्वतीने खेळता खेळताच विचारले, 'इतके हरता तरी न रागावता न चिडता पुन्हा खेळताच. हे कसे ?'

शंकर म्हणाले,'जिंकणाऱ्यावर काय चिडायचे ? आणि रागवायचे कशाला ? जिंकणाऱ्याचे कौतुकच करायचे. आणि खरं सांगू ? तुझ्यावरच्या प्रेमामुळे मला तुझ्यावर रागावताच येत नाही.

पार्वती म्हणाली, 'हे बाकी खोटं हं. सगळेच पुरूष तसं म्हणतात. पण माझ्यापेक्षा दुसरी देखणी स्त्री दिसली की भाळाल तिच्यावर, नी विसराल मला, काय नेम ?

शंकर म्हणाले, 'असं होणं शक्यच नाही. माझं सर्वस्व मी फक्त दोघातच वाटलंय. एक तू व दुसरे रामनाम. बस्स. बाकीचे सारे तुच्छ !

'नारायण नारायण' नारद मुनी अचानकच आले म्हणून बोलणेही थांबले व खेळही थांबला. यावर ८/१० दिवस गेले.

पार्वतीने शंकराची परीक्षाच पहायची ठरवली. सकाळी शंकरजी ध्यानाला बसलेले. सुंदर चांगला एकान्त वेळ. एक भिल्लीण फुलांचा साज चढवलेली त्यांचे दिशेने आली.

केसांचा बुचडा डोक्यावर उभा बांधलेला. भोवती फुलांचा गजरा. हातात फुलांचे गजरे बांधलेले. गळ्यात फुलांचा हार. वक्षस्थळ फुलांनीच झाकलेले. गुडघ्यापर्यंतच येईल असे जाडे भरडे लुगडे. गच्च कासोटा मारलेला. पायात घुंगरे बांधलेली. हातात

तीरकमठा घेतलेला आणि आली की ! अगदी नाचत नाचत आली, पुढचं गाण्यातच सांगू का ? मला गाण येतंय, पण मला 'मेली ....' काकूंनीच जीभ चावली. आपल्याच हाताने आपल्या गालावर दोनचार हळू हळू चापट्या मारल्या.

नीला म्हणाली, 'काकू आपण मेरी म्हणू या. ते पण एक देवीचेच नाव. अमेरिकेतील देवी, सगळ्याजणी हसल्या.

काकू म्हणाल्या, 'हं मी काय म्हणत होते. मला गायला आवाज नाही. पण पद येतंय, म्हणू कां ?'

मावशी म्हणाल्या, 'म्हणा, म्हणा.'

काकूंनी ठेका धरीत पद म्हटले ..

शिवहर शंकर शिवहर शंकर गजरी गजरी ऽऽऽ
नाचत भिल्लीण गौरी ऽऽऽ । शिव हर शंकर
पायी नुपूर फुले मस्तकी । हाती गजरे आली नर्तकी
भाव मनीचे दावी कौतुकी । नाच नाचुनी शिवमन जिंकी ॥ १ ॥
भिल्लीण गौरी ठुमकत ठुमकत । पद लालित्ये नाद निनादित ।
सहजचि शिवमन केले अंकित । रमले जे होते ध्यान समाधीत ॥ २ ॥
आसन सोडीत शंकर वदती । नको मला ती सती पार्वती ।
चल ये करू या नृत्य सांगाती । भुलुनी भिल्लीस आलिंगिती ॥ ३ ॥

भिल्लीणीने केस मोकळे केले. फुलांचा साज उतरवला. पार्वतीचे खरे स्वरुप प्रगट केले. शंकराला खुणेनेच विचारले ' का हो कोणाला आलिंगन दिलेत ?'शंकरजी चांगलेच ओशाळले.' काकूंनी एक मुरका मारला. सगळ्याच हसल्या व टाळ्या वाजवल्या.

'थांबा' काकू म्हणाल्या,'मला आणखी एक आठवलं, ही पार्वती कोण ? माहीत आहे कां ?

नीला म्हणाली, 'शंकराची पत्नी.'

काकू म्हणाल्या, 'ते बरोबर ग. पण ही मागच्या जन्मीची कोण ? विचार मला. मी सांगते. अग भागवत सप्ताहाला २५/३० वेळा बसलेय मी. लक्षात आहे माझ्या. मावशी, सांगू कां एक लहानशी गोष्ट ?

दक्ष नावाचा एक प्रजापती. त्याला बऱ्याच म्हणजे १६ मुली होत्या. मी पोथीत आहे तेच सांगते. सगळ्यात धाकटी जरा धीटच होती. नीलासारखीच म्हणानात. स्पष्ट बोलणारी होती. तिने वडिलांना सांगितले. माझा पती मीच निवडला आहे. म्हणजे 'लव मेरेज'.

प्रियंवदा म्हणाली, 'काकू लव्ह मॅरेज म्हणा.'

काकू म्हणाल्या, 'अगोऽबाई, चुकलंच कां? मला मे..... नाही नाही असं म्हणायचं नाही. अगं मला तसं इंग्रजी ओळखी पुरतंच येतंय ग. २ बुकं फक्त. आपण प्रेम विवाह म्हणतो तसा प्रकार नव्हता. शंकराचे गुणगान नारद मुनींच्या मुखातून तिने ऐकले होते. अखंड नाम घेणारे. अंतर्मुख वृत्तीचे. पूर्णानंदस्वरुप. म्हणूनच तिने शंकराची निवड केली.

लेकीच्या हौसेखातर मोठ्या थाटामाटात दक्षाने विवाह सोहळा केला.

एकदा काय झालं. कसलीशी सभा भरली होती. दक्षराज आल्यावर सर्वांनी उठून



त्यांना नमस्कार केला. पण शंकरजी ध्यानमग्न. ते उठले नाहीत. एक क्षणही वाया घालवीत नसत. इतके नामांत दंग असायचे.

दक्षाला राग आला. त्याने शंकराला लाखो शिव्या दिल्या. खूप टाकून बोलला. 'हा मला जावई शोभत नाही. मी मुलगी देणार नव्हतो. पण तिचा हट्ट ! गारुडी कुठला, अंगावर साप खेळवतो. भूताखेताशी मैत्री याची. अंगाला राख फासून बसतो.'

एक का दोन ! तोंडास येईल ते दक्ष बोलला. शिवगणांना राग आला. ते दक्षाला टाकून बोलले. वादंग माजले. शंकरजी जागे झाले. म्हणजे ते झोपले नव्हते. त्यांचे ध्यान भंग पावले. पण शांत. न रागावता त्यांनी मुकाट्याने सभेचा त्याग केला. घरी परतले.

दक्ष चांगलाच भडकला होता. शंकराने केलेल्या अपमानाचा बदला घ्यायचाच त्याने पक्के ठरवले.

त्याने मोठ्ठा यज्ञ केला. सर्वांना आमंत्रणे दिली. पण शंकराला की सतीला सुध्दा बोलावले नाही. खूप दिवस यज्ञ चालला होता. शंकराला यज्ञात आहुती पण नाहीत. शंकर मनोमन जाणून होते. पण गप्प बसवेना.

तिने एकदा विचारलेच, 'आपल्याला जायचं नाही कां ?' शंकरजी म्हणाले, 'कुठे' ?

'कुठे म्हणजे ? माझ्या माहेरी. यज्ञ चाललाय. सर्वजण जात येत आहेत. आपण पण जाऊया' सती म्हणाली.

'बोलावलं नाही तर कशाला जायचं शोभा करुन घ्यायला ? यज्ञच पहायचा असेल तर आपण इथे करू या.' शंकरजी शांतपणे म्हणाले.

बाईची जात. माहेरचा ओढा. शंकराची मूक संमती घेऊन ती हट्टाने गेलीच. काही शिवगण बरोबर गेले. माहेरी स्वागत छान झाले. पण दक्षाचा राग भडकला. सतीने केलेला नमस्कारही त्याने स्वीकारला नाही.

'शंकराचा अपमान करणारे विश्वात तुम्ही एकटेच आहांत. बाकीच्यांना त्यांचे सामर्थ्य कळले. ते तुम्हाला कसे नाही कळत.' झालं. खूप बोलून झाल्यावर तिने चक्क यज्ञ कुंडात उडी घेतली. बोलबोलता देह जळाला.

सुशीला म्हणाली, 'काकू, थोडं चुकतंय. दुरुस्त करु कां? तिने यज्ञ कुंडांत उडी घेतली नाही. तिने योग सामर्थ्याने स्वत:चे शरीरांतला अग्नी प्रदीप्त केला. सगळे आश्चर्याने पहातच राहिले.'

असेल तसंही असेल. सांगायचं असं की सती नाहीशी झाली. शंकराचे स्मरण करीत प्राण सोडला. ती वासना पुन्हा शंकरालाच मिळण्याकरिता पार्वतीचा देह धारण केला. खरं प्रेम ग बाई. शंकर पार्वती विवाह झाला, ती सुखी झाली.

आता हरहर महादेव म्हणायचं कां ? नाही. आपण का युध्दाला चाललोय ? मग पार्वती पते हरहर महादेव ! नको जेवायला बसतांना तसं म्हणतात. मग काय म्हणायचे ?'

नीला म्हणाली, 'उमापती महादेवकी जय'

काकूंनी तिला शाबासकी दिली.

मावशी म्हणाल्या, ' वा ! वा ! काकू, तुम्ही छान कीर्तनच केलं हं ! मंगलाचरण झालं. गाणं झालं. कथानक म्हणून दोन गोष्टी झाल्या.

भगवंताला कीर्तन भक्ती फार आवडते.

भगवंतास कीर्तन प्रिये । कीर्तनें समाधान होये ।
बहुत जनासी उपाये । हरिकीर्तने कलयुगीं ॥ ४ । २ । ७ ॥

काकूंनी धांरिष्ट्य केले. त्यांना येईल तसे का होईना पण देवीच्या दोन्ही रुपांची सती व पार्वतीची माहिती सांगितली. सराव केला की चांगले बोलता येईल.

समर्थ म्हणतातच,

'कीर्तने वाचा पवित्र । कीर्तने होय सत्पात्र ।
हरिकीर्तने प्राणीमात्र । सुसिळ होती ॥ ४ । २ । २८ ॥

काकूंनी कीर्तन करता करताच चुकीची दुरुस्ती करायचा प्रयत्न केला. शारदा आता त्यांच्या जीभेवर सतत पहारा करील. कारण

मनापासून आवडी । जीवापासून अत्यंत गोडी ।
सदा सर्वदा तांतडी । हरिकीर्तनाची ॥ ४ । २ ।६ ॥

असे भांडवल जवळ असले की काय उणे ? सतत अभ्यास करावा व पथ्य पाळावे. कोणते ? खाण्यापिण्याचे कां ?

ते तर सदासर्वदाच व सर्वांनी पाळायलाच हवे. कीर्तनातले पथ्य म्हणजे करुणा

करूणा कीर्तनाच्या लोटे । कथा करावी धडधडाटे ।
श्रोतयांची श्रवण पुटें । आनंदे भरावी ॥ ४ । २ । १२ ॥

जीवाला आनंद सागरातच डुंबायला अधिक आवडतं. आनंद हेच त्याच मूक स्वरूप आहे. दुसरे पथ्य असे की, कीर्तनाचा अभ्यास करताना लक्षात ठेवावे -

कीर्तन ऐकता संदेह पडे । सत्य समाधान ते उडे ।
नीतीन्यायसाधन मोडे । ऐसें न बोलावें ॥ ४ । २ । २२ ॥

हे पथ्य अगत्याने पाळले की श्रोते खूष होतील. भक्तीचा उदय होईल असे कीर्तन हवे. म्हणजेच विवेक, वैराग्य, शम, दम इ. दैवी संपत्ती ज्याला म्हणतात ती वाढीस लागेल. हे गुण वाढणे यालाच ज्ञानोदय म्हणतात.

जीव एकाएकी शुध्द प्रेमाने भरणार नाही. पण भगवंताच्या आड येणारे दीप हळूहळू लोप पावतील. जीवाला पवित्रता प्राप्त होईल. '

शांता म्हणाली, 'मावशी, समर्थ म्हणतातच -

म्हणोन कीर्तनाचा अगाध महिमा । कीर्तनें संतोषे परमात्मा ।
सकल तीर्थे आणि जगदात्मा । हरिकीर्तनी वसें ॥ ४ । २ ।३१ ॥

काकू म्हणाल्या, 'मावशी मी मनापासून सांगते. खूप वेळा दासबोध ऐकला, वाचला नाही. हे कीर्तनाचे महत्व आज कसे मनांत ठसले तसे कधीच ठसले नाही. कीर्तनं ऐकायचं, ५/१० पैसे आरतीत टाकायचे पुण्य कर्म घडले असे मानयचं बस्स ! मन लावून कधी ऐकलेच नाही. नुसतीच कीर्तने ऐकत राहिले. अर्थाच्या गाभ्यात शिरलेच नाही.

मावशी, अगदी तुमची शपथ सांगते. रोज, थोडं थोडं वाचीन. वाचलेले थोडं थोडं लिहीन. तुम्हाला दाखवीन. पण भोळं भाबडं कीर्तन करायला शिकेन. माझ्या चुका मला सांगा. रागावणार नाही. पण समर्थ सेवा म्हणून कीर्तन करायचे शिकेनच.



येईल ना मला ?
'येईल, येईल. सगळ्या एकदमच म्हणाल्या.
मावशींनी आरतीची तयारी केली. आनंदाने आरती झाली. प्रसाद वाटला.

**। जय जय रघुवीर समर्थ ।**

卐 卐 卐

प्रकरण ४

## नाम गजर

सगळ्या जमल्या, खोलीभर सगळ्यांची नजर फिरली. काकू दिसल्या नाहीत. 'कंटाळल्या बहुतेक' असेच सगळ्यांना वाटले.

मावशींना मात्र खात्री वाटली. त्या म्हणाल्या सुध्दा, 'तुमचा तर्क चुकतोय. दासबोधात समर्थांनी अशी कांही जादू घातलीय कीं, एकदा त्यातली शिकवण पटली कीं, वाचणारा तिकडे खेचलाच जातो. त्यातले शब्द साधे सुधे नाहीत. बारा वर्षाच्या तपश्चर्येचे सामर्थ्य त्या शब्दामागे आहे. काकू नक्की येतील. आल्याशिवाय रहाणार नाहीत. नीला अजून यायची आहे. पण तीन वाजले. कोणाची वाट नाही पहायची.

आज नवरात्राचा तिसरा दिवस. ईश्वराचे स्मरण म्हणजे नाम गजर, भजने म्हणूया आज - नाहीतरी आज गुरुवार म्हणजे नित्याचा भजनाचा वार. फार तर देवीचीच भजने म्हणू या. दुर्गेचे नमन सुमित्राला येतंय. ती सांगेल. आपण म्हणू या.

सुमित्राने गोड आवाजात भजन सांगितले.

हे जय अंबे, श्री जगदंबे वंदन करीते बाऽऽला
नाम महिमा ऐकुनी तुझा, आले दारी तुझिया ।
भाव पुण्यांची ओंजळ भरुनी । वाहीन तुझिया पाया ॥ १ ॥
वरदायिनी म्हणती तुजला । देशी वर तू भक्ताला ।
दूर लोटू नकोस मजला । चरणी माथा ठेवियेला ॥ २ ॥

तिच्या पाठोपाठ सर्वांनी भजन म्हटले. इतक्यांत काकूंचा हात धरून नीला आली. काकूंच्या गुडघ्याला पट्टी बांधली होती. हे ध्यानांत आले सर्वांच्या.

पायऱ्या हळूहळू चढल्या. हुश्श्य करून गुडघा धरून बसल्या. सर्वांनीच नीलाला काय झाले हे खाणाखुणांनी विचारले.

काकू म्हणाल्या, 'तिला कशाला विचारता ? मीच सांगते.काकूंना वाटलं भाग्योदय झाला. घराच्या सावलीला बसली होती कपिला, मनी विचार आला, शेपटी फिरवावी अंगावर. कपिलेने शिंगाने एक ठोसा दिला. काकू पडल्या खाली, इतक्यात नीला आली. गुडघ्याला हात धरून उठवलं. हळद लावली. पट्टी बांधली. हात धरून आणलं मला. म्हणून दोघींना यायला उशीर झाला.

सगळ्या खदखदून हसल्या. 'वा वा वा ! काकूंचं अभिनंदन. त्या काव्यमय-बोलू लागल्या.' कोणाचा तरी आवाज आला.

काकू घाम पुसत होत्या. 'हसा बायांनो, ज्याचं जळतं त्याला कळतं. आई आई ग ! त्यांनी गुडघ्यावरून हात फिरवला.

मावशी म्हणाल्या, 'आपण आता देवीच्या नावाचा गजर करू या. थांबेल दुखायचं !



'अंबा राज राजेश्वरी, अंबा राज राजेश्वरी
अंबा कोल्हापूरवासिनी, अंबा तुळजापूर भवानी
अंबा राज राजेश्वरी.'

भजन छान रंगलं.

काकू म्हणाल्या, 'मावशी कशाला करायचं भजन ? देव देव केला तरी हे असं दुःख भोगावं लागतंच ना ? त्या देवाचं स्मरण करून, नाम घेऊन तरी काय उपयोग ? मी आपला खुळचट प्रश्न विचारते. रागावू नका.'

मावशी म्हणाल्या, 'राग कशाचा ? विचारलेत ते छान केलेत. मनातला मळ धुवून निघेल. समर्थ म्हणतात,

स्मरण देवाचें करावें । नित्य नाम जपत जावें ।
नामस्मरणें पावावे । समाधान ॥ ४ । ३ । २ ॥

भगवंताच्या नामस्मरणाने भक्तीचा अंकूर जोमाने वाढतो. मनावरची दोषयुक्त पटले दूर होतात. अंतर्यामी समाधान वाटू लागते.

काकू म्हणाल्या, ' त्या मनाच्या समाधानाकरिताच ना मी कपिलेची शेपटी उचलायला गेले. मी का तिला मारणार होते ? '

मावशी म्हणाल्या, ' काकू शहाणी सुरती माणसे सुध्दा एकमेकाचं अंत:करण ओळखू शकत नाहीत. दुसऱ्याच्या मनातील नेमके विचार ज्ञानी म्हणणाऱ्या माणसाला तरी कळतात कां ? गाय ! बोलून चालून जनावरच ! माणसापेक्षा बुध्दी कमी ! ती रवंथ करीत विश्रांती घेत होती. तुमच्या मनातला भाव तिला कसा कळणार ? स्वरक्षणाकरिता तिने मान वळवून तुम्हाला दूर लोटले.

तुम्ही तिला पोळी खायला दिली असतीत तर तिची पोळी खाजवायला तिने प्रेमाने मान वर केली असती. मग शेपटीला हात लावला असतात तरी तिने विरोध केला नसता. थोडा विचार करूया, अशी गाईची शेपूट अंगावरून फिरवली म्हणजे देह पवित्र होतो कां ? या जुन्या भ्रामक विचारांना आता दूर लोटा हेच जणू तिने आपल्याला शिकवले.

प्रेमात राम रमतो । प्रेमाला मोल ना जगामाजी ।
हाचि निरोप गुरूंचा । गुरुरायाला तहान प्रेमाची ॥

असं ब्रम्हचैतन्य गोंदवलेकर महाराज आवर्जून सांगतात नं ?

एकमेकांची मने प्रेमाने बांधणे ही एक कलाच आहे. ती हस्तगत करण्यासाठीच एकत्र यायचे. एक दिलाने वागायचे. हे तरी केव्हा साधते ? खऱ्या प्रेमाची ओळख झाली तरच !

भेट भेटों उरी राखणें । हे चातुर्याचीं लक्षणें ।
मनुष्य मात्र उत्तम गुणें । समाधान पावे ॥ १५ । १ । ३५ ॥

या समाधानकरिताच सणवार, चैत्रगौरी उत्सव, गणेशोत्सव, नवरात्र उत्सव. नामाचा महिमाच अगाध, सुनीता, तू एक अभंग सांगतेस कां ?

सुनीताने गोड अभंग सांगितला.

नाम गावे नाम घ्यावे । नामे पायी लीन व्हावे ॥ ध्रु. ॥
नाम उरफाटी गंगा । पावन करी अंग प्रत्यंगा ॥ १ ॥

चित्त नामी असता सार्थ । नाहीतरी होय व्यर्थ ॥ २ ॥
नाम हेचि गुरूकिल्ली । व्दैत कपाटे उघडली ॥ ३ ॥
भक्ताची सद्गुरुमाय । खुष असता उगे काय ? ॥ ४ ॥

तिच्या पाठोपाठ सर्वांनीच अभंग म्हटला. गजरही केला.

सावर सावर अंबाबाई पैठणीचा घोळ ग
पैठणीचा घोळ ग । अंबा माता खेळ ग ॥

'मावशी मी काहीतरीच विचारते म्हणून हसू नका.' काकू म्हणाल्या. मी म्हणते नाम गोड खरं. पण या नामातच रंगलं तर संसाराची होळीच की ! प्रांपचिक बायका, नीट नेटका प्रपंच करायचा की भजनं म्हणत जीवाला रमावायचं ?'

मावशी म्हणाल्या , 'दोन्ही करायचं ! प्रपंच नी परमार्थ दोन्हींचा समन्वय ज्याला घालता येतो तोच धन्य. प्रपंच्यातलं काम करिता करिताच नाम घ्यायचं.

काकू - अगोऽबाई, ते ग कसं जमायचं ?

मावशी - कांकू, तांदूळ निवडतांना नाम घेत निवडता येणार नाहीत कां ? प्रत्येक तांदळाच्या दाण्याला नामाचा स्पर्श झाला की भात पण सत्प्रवृत्ती वाढवणारा होईल. पोळ्या करता करता स्तोत्र म्हटलं तर त्या पोळीला वेगळीच रुची येईल. अजिबात कोणाशी बोलायचं नाही असं नाही. जरूरीपुरते जरूर बोलावे. पण मनाला मोहात पाडणाऱ्या विषयापासून थोडे थोडे बाहेर काढायचे. बाह्य विषय सुखकारक वाटले तरी इंद्रियांची तृप्ती कधी होईल कां ?

काकू म्हणाल्या -तेच मला नेमकं म्हणायचं आहे की नामाने तरी इंद्रिय तृप्ती होईल कां ? इंद्रिय विषय मिळाला नाही तर गप्प रहातील कां ? उलट जास्त चेकाळतील. विषय मिळाले नाहीत म्हणून तडफडतील, त्यांना तडफडत ठेवून काय सुख मिळणार ?

मावशी म्हणाल्या, 'या भ्रमांत राहूनच आजपर्यंत आपलं नुकसान आपणच करून घेतलंय. म्हणून संतांना कळवळा आला. समर्थ म्हणतात, 'नाम घ्यायला वेळ नाही म्हणू नका.

नित्यप्रेम प्रात:काळी । माध्यानकाळीं सायंकाळी ।
नामस्मरण सर्वकाळी । करीत जावे ॥ ४ । ३ । ३ ॥
वैभव पायाशी लोळतंय मग नाम कशाला ? असे म्हणू नये.
आधी अवदसा मग दसा । अथवा दसे उपरी अवदसा ।
प्रसंग असो भलतैसा । परंतु नाम सोडूं नये ॥ ४ ।३ । १० ॥

लक्ष्मी चंचल असते. आहे ही स्थिती कायमची असे समजू नये. देवाचे नाव घेऊ की देवीचे ? विष्णूचे घेऊ की रामाचे ? कृष्णाचे घेऊ की मारुतीचे ? या भ्रमांत , घोटाळ्यात पण पडायचे नाही.

परमेश्वराची अनंत नामें । स्मरतां तरिजे नित्य नेमें ।
नामस्मरण करितां येमें । बाधिजेना ॥ ४ । ३ । १९ ॥

कोणतेही नाम घ्यावे. ते थोरल्या देवाचेच ठरते.

नीला म्हणाली, 'काकू, नारद मुनी तर अखंड म्हणत. काय बरं ?



काकू म्हणाल्या, 'नाराऽयण, नाराऽयण, नाराऽयण !

सगळ्या हळूच हसल्या.

काकू - 'अगो ऽ बाई, मी ह्यांचे नाव मोठ्याने घेतले की ?

'काकू, नामस्मरणाच्या निमित्ताने म्हटले, 'नारायण' तरी चालते. एरव्ही म्हणा 'ऐकलं का ! मी काय म्हणते ते !' असंच ना 'प्रियंवदा काकूंची नक्कल करीतच म्हणाली.

काकूसह सगळ्या हसल्या.

मावशी म्हणाल्या, 'काकू व्यवहारातला तुमचा अनुभव जसा पटला. आनंद झाला. तसेच संतांचे ब्रम्हानंदाचे अनुभवजन्य ज्ञान त्यांनी माप भरभरून वाटले आहे. केवढे उपकार आहेत त्यांचे आपल्यावर ! भगवंतच संत रूपाने अवतरतो.

आजचा ताजा अनुभव. तुम्ही पडलांत. संकटांत सापडलांत. नीलाच्या रुपाने देवीच अवतरली. कधी शिस्त न मोडणारी पण तिने इलाज उपचार करून तुम्हाला इथपर्यंत आणले. देवीच पावली असे का नाही समजत ?

नामाने विषयातला फोलपणा कळू लागतो. इंद्रियांना एकदा का नामाची गोडी लागली की ती आपोआप मुरडतात. नामही साधते व माफक प्रमाणांत विषयही सेवन केले जातात. ईश्वरार्पण बुध्दिने सर्व कर्मे घडतात. पापाकडची प्रवृत्तीच कमी होते.

प्रियंवदा म्हणाली, 'आणि मावशी अद्वातद्वा किंवा बाष्फळ बडबड, कुचाळक्या करण्यात जो वेळ जातो तो सत्कारणी लागतो. हा एक फायदाच पदरांत पडतो.'

काकू म्हणाल्या, 'अगोऽबाई माझे ! कशा साळुंक्या गोऽड बोलता ग ! पण मला असं सांग नाम घेतलं तरी दु:खद घटना घडणार त्या घडतातच. मग नामाचा काय फायदा ?'

मावशी म्हणाल्या, 'आत्ताच आपण भजनांत काय म्हणालो. 'नाम उरफाटी गंगा,' पवित्र गंगा नदी हिमालयातून खाली येते. नाम गंगा उरफाटी, म्हणजे खालून वर जाते. भवाकडून परब्रम्हाकडे नेते. काशीची गंगा फक्त बाह्यांग शुध्द करते. नाम गंगा अंग प्रत्यंगाला शुध्द करते. मनोमल धुवून जातो. आपदा ही संपदा वाटू लागते.

काकू, संतांच्या वचनावर विश्वास हवा. अनुमानाचे बोल व अनुभवाचे बोल यांत फरक असतो. दृश्यावर प्रेम असेपर्यंत तर्कच करत बसतो. त्याचे तर्क, अनुमान चुकते.

संत अनुभवाने सांगतात आपत्ती, संकटे, दु:ख हे सर्व ईश्वरी योजनेतूनच आलेले आहे असे समजावे. त्याकडे पहाण्याची दृष्टीच बदलावी.

संत तुकारामांची पत्नी वारली तर ते 'बरे झाले देवा' असे म्हणाले. ते काय वेडे होते.

भगवंताला स्मरत त्याचेच काम करणे म्हणजे नेटका प्रपंच. प्रपंचातील प्रत्येक काम त्याची सेवा म्हणून करावी.

काकू म्हणाल्या, 'अगोबाई, हो का ? आला गेला पै पाहुणा पहायलाच हवा. त्यावेळी कसे जमायचे सगळ्यांच्या आवडीनिवडी ?

मावशी काकूंना थांबवीत म्हणाल्या, 'युक्ती युक्तीने त्यांना त्यात सामील करून घ्यायला जमेल. आपल्या नेमाशी प्रथम पक्के बांधून घ्यायचे. मगच त्यांची सरबराई करायची. ती देवाची पूजा समजूनच करायची. आज नीलाने घरांत जाऊन हळद आणली पट्टी बांधली.

तुमच्याकरिता हळू हळू चालली. थोडा उशीर झाला. तर क्षम्य. कारण ही देवीची पूजाच केली तिने. या ना त्या रुपानं देवी तिला प्रसाद देणारच. देवावर पूर्ण विश्वास हवा. पूर्वा, तू ते सखीचे गाणे सांगतेस कां ?

पूर्वा 'हो' म्हणाली, व तिने पद सांगितले.

अंबा जीवीची सखी हो माझी। अंबा जीवीची सखी॥
नामामृत सेविता नित्य।
असेन कशी मी दु:खी हो माझी अंबा ...... ॥ १ ॥
मी तू पणाचा भेद घालविता
जीव होतो सुखी हो माझी अंबा ...... ॥ २ ॥
सद्गुरु कृपे आशा पुलकित
नाम अखंडित मुखी हो माझी अंबा ...... ॥ ३ ॥

पूर्वाने पद सांगितले. तिच्या पाठोपाठ सगळ्यांनी म्हटले.

मावशी म्हणाल्या, 'आता थोडीशी गंमत हं. अंबेची कोणाला किती नावे माहीत आहेत बघू या.

धुव्रपद झाले की मी बोट करीन. तिने चटकन नवीन नाव सांगून ध्रुवपद म्हणायचे. ठेक्यातच म्हणायचे. आलं लक्षांत ?

धावत आली धावत आली
अंबा माझी धावत आली ॥ ध्रु.॥
आता मी पूर्वाकडे बोट केले की ..............
सावित्री चटकन म्हणाली, 'मी सांगते ......
धावत आली धावत आली
दुर्गा माझी धावत आली'

असे पूर्वाने पटकन सांगायचे. पुन्हा तिसरीने अंबा, दुर्गा ही नावे सांगायची नाहीत. दुसरेच देवीचे नाव सांगायचे असेच ना ?

मावशी म्हणाल्या, 'हो असंच चालू ठेवायचं. तिला सर्वांनी ध्रुवपदाला साथ द्यायची. सुरु हं.

धावत आली धावत आली
सुमित्रा - जया देवी धावत आली
धावत आली धावत आली
सुनीता - ललितादेवी धावत आली
धावत आली धावत आली
प्रियंवदा - कमला देवी धावत आली
धावत आली धावत आली
मालती - तुळजा भवानी धावत आली
धावत आली धावत आली
नीला - नारायणी धावत आली



धावत आली धावत आली
शांता - रेणुका माय धावत आली
धावत आली धावत आली
काकू - (नीलाकडे बोट दाखवून) नीलांबरी धावत आली
काकूंना स्फुरण चढलं. पदर बांधतच उभ्या राहिल्या.
टाळ्यांच्या तालावर सर्वांच्या मध्ये येऊन नाचत म्हणाल्या
घरांत जाऊन हळद आणली
पायाला ग पट्टी बांधली
लंगडी काकू चालत आली
इंदिरा नाचत नाचत आली। धावत आली ......

सगळ्यांनी टाळ्या वाजवल्या.

मावशी म्हणाल्या, ' बघा काकू, आरशांत तुमचा चेहरा बघा. कसा प्रसन्न नी हसरा देवी सारखा दिसतो आहे. तुम्हाला खरा खरा आनंद झाला आहे. गुडघा झाला बरा. कशा उत्स्फूर्तपणे नाचलांत. देहाची पर्वा नाही. कोणी हसेल का पाहिलं नाहीत.

नामात हेच तर सामर्थ्य आहे. नामाचा खेळ छान रंगला. नामाच्या गजरांत देहभान जात. हेच विष्णूस्मरण भक्तीचं रहस्य. आज थोडीशी का होईना तिसरी भक्ती साधली. आपलं अभिनव नवरात्र साजरं झालं.

याच आनंद भरांत आरती करू या नी प्रसाद घेऊ या.

**। जय जय रघुवीर समर्थ ।**

卐 卐 卐

प्रकरण ५

## हे नव्हतं हो मला माहित !

'अगोऽबाई, मला उशीर होतोय कां ?' म्हणत म्हणतच काकू पायऱ्या चढल्या. प्रियंवदाने त्यांच्या पायाकडे पाहिले. हे काकूंच्या लक्षात आले.

'धुतलेत हो धुतलेत. टाचा नसतील भिजल्या. पाणी थोडं होतं. आता ओल्या करते.' असे म्हणत काकूंनी ओल्या पायावरचा हात टाचेला चोळला. पायही कोरडे झाले.

त्यांची जागा राखूनच ठेवली होती. पटकन बसल्या.

सुशीलाने विचारले, 'गुडघा दुखायचा थांबला नं !' 'म्हणूनच पटकन बसले ना !' काकू म्हणाल्या, 'अगं पोरींनो तुम्ही आरती झाल्यावर परतलात. मावशींनी मला 'थांबा' म्हणून खूण केली. मी थांबले बापडी. तिने नव्हे नव्हे, त्यांनी .......

शांता म्हणाली, 'म्हणा, 'तिनेच' म्हणा. त्या रागावणार नाहीत. तुमचे आमच्यापेक्षा १० पावसाळे वय जास्त आहेच नाहीतरी.'

मावशी म्हणाल्या,'शांताताई, नका त्यांना पुन्हा ऐकवू. बोलून गेल्या परवा चटकन. त्यादिवशी त्यांना वाटलं आपण मोठ्या आहोत म्हणजे वयस्कर आहोत. म्हणजेच अनुभवी आहोत असं सांगावं. तुम्ही सगळ्याजणी आता दासबोध ऐकत आहांत.......

सुमित्रा म्हणाली, 'नाही नाही, मावशी, आम्ही दासबोध अभ्यासत आहोत. दासबोध नुसता वाचण्यासाठी नाही. अभ्यासण्यासाठी आहे. दासबोध वाचतांना माहेरी गेल्यागत वाटतं.

मावशी किंचित हसून म्हणाल्या, 'बरोबर, तसं म्हणू या. ज्यांनी समर्थ वचने आत्मसात केली त्यांना कळलेच आहे की शरीराने मोठा, वयाने मोठा तो मोठा नव्हे. सर्वात वडील अंतरात्मा. समर्थ म्हणतात

सकळांवडिल अंतरात्मा। त्यासि नेणे तो दुरात्मा।
दुरात्मा म्हणजे दुरी आत्मा। अंतरला तया ॥ १५ । ९ । १८ ॥

हे कळलं आहे तुम्हाला. काकूंना काय सांगायचंय ते सांगू द्या. सांगा काकू...

काकू सरसावून म्हणाल्या, ' तिने मला आत नेले. खरं सांगू ? आतली खोली पहावी हे मला परवापासून वाटत होते. दोनच खोल्यात कसा संसार चाललाय त्यांचा ?

हं, तर काय म्हणत होते मी, आंत गेले. त्यांनी 'बसा' म्हणून पाट दिला. मी पाटावर बसले. चारही बाजूला नजर फिरली. तोपर्यंत कपाटातून आंबेहळद काढून, उगाळून, खदखदून लोखंडाच्या पळीतून गरम गरम माझ्या पुंढे घेऊन आल्या. कोठे कशावर उगाळली,चटकन कशी गरम केली मला कळलेच नाही. अशी आंबेहळद पळी चटकन कशी हाती आली ?

माझं एवढं मोठं घर आहे. लोखंडाच्या लहान मोठ्या पळ्या ५/६ तरी असतील.



पण आत्ता हाताशी एकपण मिळणार नाही. थोडं शोधावंच लागेल. मी विचार करतेय तो पर्यंत पायाची पट्टी पण निघाली. हळद लावून झाली. गरम गरम शेक बरा वाटला. पायावरून पण हात फिरला. जरा वाळेपर्यंत बसले, प्रसाद घेतला. खरं सांगते पोरींनो, मला वाटले, 'मला चहा मिळेल.'

सगळ्या हसल्या.

काकू हसल्या,'हसू नका. मी खरंच सांगते. मावशींनी कुंकू लावले. मग उठावेच लागले. मावशींनी माझं मन जाणलं नी उलगडाच केला, 'सारखा येता जाता चहा करायची मी पध्दत ठेवलीच नाही. अगदी आमच्या चहाच्या वेळांत कोणी आले तर त्यांना चहा देते, किंवा फराळाला बोलावले असेल तर चहा देते. बाकी सर्वांना गुरुदेवांचा प्रसाद डब्यांत सदैव तयार ठेवते. तोच देते. पोरींनो, मला नेटकं स्वच्छ घर खरंच आवडलं हं. खूप मोठ्ठं वाटलं.

मावशी म्हणाल्या, 'काकू यांत विशेष कांही केलं नाही. गुरुदेवांची आज्ञा पाळली. दुःखी जीवाला सुखी करणे. अपंगांना आधार देणे, अडलेल्याला मदत करणे ही पादसेवन भक्तीच. समर्थ म्हणतात,

दुसऱ्याच्या दुःखें दुःखवावें। परसंतोषें सुखी व्हावें।
प्राणीमात्रास मेळवून घ्यावें। बऱ्या शब्दे ॥ १२ । १० । ७ ॥

ही कामे करतांना मनांत भाव 'ईश्वराची सेवा करतेय' असाच असावा. याला पादसेवन भक्ती म्हणतात.

काकू म्हणाल्या, 'अगोऽबाई, हो का ! मला नव्हतं हो हे माहीत ! मला वाटत होत पाद सेवन म्हणजे पाय चेपणे, दाबणे, पायाला तूप चोळणे. यांचे पाय चेपून ही भक्ती साधेल, म्हणून एक दिवस, खरंच सांगते पाय दाबायला सुरुवात केली तर म्हणाले 'मला नाही आवडत, मी काही आळशी विष्णू नाही बायकोकडून पाय दाबून घ्यायला !' मी मनात खट्टू झाले. मला पादसेवन भक्ती कशी साधणार ?

प्रियंवदा म्हणाली, 'काकू फक्त पाय दाबणे म्हणजे पादसेवन नव्हे. मावशी मी सांगू कां ? '

मावशी म्हणाल्या,''सांग ना ! अग जे आपल्याला येतं ते दुसऱ्याला सांगून आपल्या ज्ञानांत भर पडते. म्हणून तर श्रवण करायचे ! सांग.

प्रियंवदा म्हणाली - समर्थ म्हणतात,

देव ब्राह्मण महानुभाव। सत्पात्र भजनाचें ठाव।
ऐसिये ठायी सद्भाव। दृढ धरावा ॥ ४ । ४ । २३ ॥

काकू , देवाबद्दल, ब्रह्मज्ञानी संताबद्दल आदर वाटावा, तो वाढावा. सात्विक वृतीने वागणाऱ्या सज्जन मंडळीबद्दल सद्भाव वाढवावा, त्यांचे धोरण व ध्येय समजावून घेऊन आपल्या जीवनांत सुधारणा घडवून आणावी. त्यांची शिकवण आचरणांत आणणे ही पादसेवन भक्तीच होय. आपल्या सद्गुरूंचे चरण सेवन घडले तर उत्तमच. पण २४ तास काय पायच दाबत बसणार ? अगदी शब्दाला शब्द असा अर्थ न घेता, सद्गुरुंच्या चरणाशी लीनपणाने बसून ते जो बोध करतात - कोणता ?

लक्षें जयासी लक्षावें । ध्यानें जयासी ध्यावें ।
तें गे तेंचि आपण व्हावें । त्रिविधा प्रचिती ॥ ४ । ४ । १४ ॥

परमात्मा प्रचितीला येण्यासाठी सत्संग व गुरुसेवा अत्यंत आवश्यक.

ज्याच्या सान्निध्यात आपण रहातो त्याच्या सवयी आपल्यात सहज उतरतात. मग ज्यांनी परमार्थ बोध केला त्यांची सेवा करण्यात पाप कसले ? तरी लौकिक व्यवहारांत मनुष्य बिचकतो. त्याचे कारण एकच. भावना आवरण्याची पूर्ण ताकद आपल्यात आलेली नसते. म्हणून सद्गुरुंची आज्ञा तंतोतंत पालन करून त्यांच्या शब्दावर विश्वास ठेवून त्या प्रभूला आंत पहावे.

सेवाभावाने लीनता घडते. ते रूप आपलेच हे ध्यानांत घेऊन ब्रम्हाचे कर्तृत्व जाणायचे असते. ते रूप आपलेच हे ध्यानांत येण्यासाठी. पदस्पर्श आवश्यक. समजा तशी संधी न मिळाली तरी दृष्टीक्षेपातूनही हे काम सहज घडते.'

काकू म्हणाल्या, 'अगोऽबाई , ते ग कसे ?'

मावशी म्हणाल्या, 'सद्गुरुंचे, सत् प्रवृत्तीच्या व्यक्तीचे बाह्यात्कारी बरेच काम करण्यासारखे असते. ते काम न सांगता करण्याकडे प्रवृत्ती वळली तरी पादसेवन भक्ती घडते.

समजा, त्यांना प्यायला पाणी हवंय, आपण तत्परतेने स्वच्छ तांब्या पाण्याने भरून तांब्या भांडे त्यांच्या हातात देणे हा एक प्रकार. त्यांच्याजवळ खालीच तांब्या ठेवणे हा दुसरा प्रकार. भांड्यात पाणी ओतून पाण्याचे भांडे त्यांचे हाती देऊन आपण तांब्या हातात घेऊन नम्रतेने पुन्हा पाणी देण्यासाठी जवळच उभे रहाणे हा तिसरा प्रकार. यांत खरी भक्ती कोणत्या प्रकारांत साधली ?

शांता म्हणाली, 'तिसरा प्रकार उत्तम'

मावशी म्हणाल्या, 'बरोबर. सद्गुरु किंवा संत पाणी पितात तेव्हा घोटाघोटा बरोबर आपला त्यांचे हृदयात प्रवेश होत असतो. अगदी नकळत होत असतो. 'पुरे' असे म्हणून ते भांडे आपलेकडे देतात. त्यावेळी त्यांची जी सुप्रसन्न सहज नजर आपलेकडे जाते तेव्हा प्रभूदर्शनाचा आनंद आपल्याला लुटता आला पाहिजे. ही पादसेवन भक्ती.

काकू म्हणाल्या, 'अगोऽबाई, सोपंच आहे की गं ! पण तसं तर आपण पाणी सगळ्यांनाच देतो. मग हा अनुभव सर्वच ठिकाणी का नाही येत ? फक्त सद्गुरुकडूनच मिळतो कां ?

सुमित्रा म्हणाली, 'जर आपलं मन व्यापक झालं असेल तर कोणालाही पाणी दिल्यावर आनंद होऊन ब्रह्मदर्शनाचा लाभ होईलच होईल. गाढवाला पाणी पाजतांना काय झालं ? नाथांना रामेश्वर दर्शन तेथेच घडले ना ?

मावशी म्हणाल्या, 'सद्गुरू मुखातून म्हणजे सध्या दासबोधातून शास्त्र विचार कळत आहेत. समर्थ विचार पटत आहेत. अशा विचार श्रवणाने स्वत:च्या विचारांना चालना मिळते. स्वत:ला प्रचिती येते. स्वत:चा अनुभव हा खरा अनुभव.

सद्गुरु कृपेविण कांही । भवतरणोपाय तो नाही ।
याकारणें लवलाहीं । सद्गुरुपाय सेवावे ॥ ४ । ४ । ४ ॥



जन्मापासून सुरू होऊन मृत्यूपर्यंत असणाऱ्या या जीवनांत समाधान किती? असमाधान किती ? असमाधानांत अंत होऊ नये म्हणून ज्ञानी माणसाची संगत लाभावीच. त्यांचे बोल ऐकून आज्ञापालन व्हावेच व्हावे. त्याकरिता सद्गुरुबद्दल नितांत आपलेपणा अंत:करणांत असावा. त्यांनी अंगिकारलेले काम प्रेमाने करावे. त्यांत कष्ट मानू नयेत. म्हणजे पादसेवन भक्ती साधली.

समर्थांना भोळाराम विडा कुटून देत होता. ती पादसेवन भक्तीच होय. कल्याणाने हवेत झेप घेऊन उडून जाणारी छाटी पकडली व परत आणून दिली ही पादसेवन भक्तीच. हनुमंताने खांद्यावरुन राम लक्ष्मण यांना नेले ही पण पादसेवन भक्तीच.

शांता म्हणाली, 'मावशी, कल्याण समर्थांच्याकरिता २ हंडे पाणी आणत असे ती पण पादसेवन भक्तीच. अशा भक्तीने सद्गुरू कृपेचा ओघ आपलेकडे वळतो. त्या शिवाय या भ्रमसागराच्या बाहेर पडायचे कठीणच. जीवाने तर या भवातून बाहेर पडायला हवेच आहे. म्हणून गुरुकृपा संपादावी. सद्गुरूंच्या बोधाप्रमाणे आचरण ठेवले तर ज्ञानमार्ग मोकळा होतो.'

मावशी म्हणाल्या, 'अगदी नेमके तेच सांगितलेस - समर्थ म्हणतात

जे अभ्यासें अभ्यासितां न ये । जें साधने असाध्य होये ।
ते हे सद्गुरुविण काये । उमजों जाणें ॥ ४ । ४ । २० ॥
या कारणे ज्ञानमार्ग । कळाया धरावा सत्संग ।
सत्संगेविण प्रसंग । बोलोचिं नये ॥ ४ । ४ । २१ ॥

परमार्थ मार्ग नुसत्या ग्रंथ वाचनाने साधत नाही.

गृहस्थाश्रमांतच प्रपंच करतानाच तो साध्य कसा करावा हे सत्संगाने सद्गुरू बोधाने कळते. कारण आपला जीव अल्प. शिवाय देहाला मी म्हणत बसल्याने 'मीपणा' वाढतो. मीपणा आहे तोपर्यंत परमार्थ साधत नाही. ही मेख पादसेवन भक्तीने साधते.

'आज्ञापालन' शब्द उच्चारला की बिचकायचे कारण नाही. शास्त्राधारे अनुभवाद्वारे असे करावे असे आपल्याला कळले की त्याप्रमाणे वागणे यालाच आज्ञापालन म्हणतात.

त्यामुळेच आत्मज्ञानाचा अनुभव लवकर येतो -

प्रत्ययज्ञाता सावधान । त्याचे ऐकावें निरुपण ।
आत्मसाक्षात्काराची खूण । तत्काळ बाणे ॥ १७ । ४ । ३० ॥

ती लवकर अंगी बाणावी म्हणून हे अभिनव नवरात्र - आज नवरात्राचा कितवा दिवस बरं ?

शांता म्हणाली, 'चौथा'

पूर्वा म्हणाली, 'नाही शांता, भक्तीचा प्रकार चौथा पण आपल्या अभिनव नवरात्राचा दिवस पाचवा नाही का ?'

सावित्री म्हणाली, 'अग, १ले दिवशी आपण फक्त संकल्प सोडला. तो दिवस नवरात्रांत धरायचा कां ? आपला खरा अभ्यास सोमवार पासून धरतेस की मंगळवार पासून ?

मावशी म्हणाल्या, 'दिवसांच्या संख्येच्या घोळातच रहाणार कां ? माझं म्हणणं,

'तुझं म्हणणं' असं करता करता मतभेद वाढतो. संशय बळावतो. समर्थ काय म्हणतात बघ

वेर्थ संशयाचे व्रत। वेर्थ संशयाचे तीर्थ।
वेर्थ संशयाचा परमार्थ। निश्चयेविण ॥ ५।१०। १७॥

संशय म्हणजेच संभ्रम, शंका संदेह, करु का नको असे वाटणेच व्यर्थ. त्याने हाती घेतलेले काम पूर्ण होत नाही. केलेले काम आनंददायक न होता दुःखांला कारणीभूत होते. आपण हा नवीनच उपक्रम हाती घेतला. सुरुवात ज्या दिवशी झाली तो अमावस्येचा दिवस शुध्द अशुध्द विचार तरी करत बसलो कां ? नवरात्र म्हणून घटस्थापना केली का ? देवीचा फोटो तरी लावून हार घालीत बसलो कां ? आपला कार्यक्रम त्यावाचून अडतोय का ? आपण नवरात्राच्या संधांनात नवविधा भक्तीचा दशक अभ्यासत आहोत. अनायसे नवरात्र दिवस आहेत म्हणून अभिनव नवरात्र नांव दिले. मग सांगा आजचा कितवा दिवस ?

काकू म्हणाल्या, 'अगोबाई, इतकं का अवघड गणित आहे ? आवसेला मुहूर्त मेढ रोवली. काय करायचं ते ठरवलं. तो पहिला दिवस, दुसरा श्रवण, तिसरा कीर्तन, चवथा विष्णू स्मरण, म्हणजे आज पाचवा दिवस चौथी भक्ती पादसेवन अभ्यासली नाही का ?

मावशी म्हणाल्या, 'अगदी बरोबर, या पाच दिवसांतल्या चर्चेने पाच गोष्टींचा तरी अभ्यास पूर्ण व्हावा. तरच उद्याच्या अर्चनाला कांही अर्थ राहील ? अगदी तांत्रिक पूजा करू म्हटले तरी पाच गोष्टींची गरज लागतेच नाही कां ? त्या कोणत्या बरं ! कोण सांगेल ?

प्रियंवदा म्हणाली, 'हळदकुंकू कोयरीत. गंध, फुले, आरती.'

सावित्री म्हणाली, 'प्रिया, आरती करायची म्हणजे निरांजन हवे आणि नैवेद्याची तयारी. अगदी तांत्रिक पूजा म्हटली तरी या पाच गोष्टी हव्यातच.'

मावशी म्हणाल्या, 'अवतारी पुरूषांना (व्यक्तींना) भगवंत समजून आपण प्रतिमेची, मूर्तीची पूजा करतो तरी या पांच गोष्टींची सिद्धता हवीच. आता आपण अंतर्यामी असणाऱ्या भगवंताची पूजा करणार तर सिद्धता जरूर हवीच. आपल्याला जीवन उजळायचं आहे. लक्षांत आहे ना ! वेळ काढूपणासाठी आपण जमत नाही. म्हणून विचार करून अंतःकरण शुद्धीसाठी काय करू या. जे ठरेल ते पक्केच हं. ही बांधीलकी मानणे व तसे आचरण सुधारणे हीच आपली मासिक वर्गणी आहे. होय ना ?

सुनीता म्हणाली, ' अगदी बरोबर. मी सांगते या पांच दिवसाच्या अभ्यासातून मी तरी ठरवलंय की अपशब्द म्हणून बोलायचं नाही.'

मावशी म्हणाल्या, 'चांगला निश्चय केलास.'

सावित्री म्हणाली, 'मी निंदा करायची नाही असं ठरवीन. कारण ती मला फार सवय आहे, नसेल त्याचं नसेल ते भलंबुरं बोलांयचं.'

प्रियंवदा म्हणाली, ' मावशी मी खरं सांगू ? मी व कपडे देह स्वच्छ व नेटकं ठेवायचा जितका प्रयत्न करते तितकं वागणं नेटकं होत नाही. आई बाबा सारखे ओरडतात तरी मद्दच ! अंगातले काढलेले कपडे, घरांतले सामान, साधं माझं टॉयलेटचं सामान सुद्धा नीट नेटक्या पद्धतीने ठेवले जात नाही, जरा अळंटळं केले की आई आवरतेचसारे. आता मी कटाक्षाने लक्ष घालीन.'



सुशीला म्हणाली, ' माझे ठिकाणी थोडा शिस्तीचा अभावच. म्हणून मी या नवरात्राचे स्मरण ठेवून शिस्त पालन काटेकोरपणे करीन, आळस घालवीन.'

पूर्वा म्हणाली, ' माझी चूक माझ्या लक्षांत येते, पण पुन्हा तसंच बोललं जातं, वागलं जातं, म्हणून मी ठरवते की चूक म्हणून होऊच द्यायची नाही. झालीच तर लगेच दुरूस्त करायची.'

मावशी आनंदून म्हणाल्या, ' वाः वाः, प्रत्येकीचा निश्चय छान आहे. केलेला निश्चय पक्का राहो. '' निश्चयाचे बळ, तुका म्हणे तेची फळ ! ''

मालती म्हणाली, 'पण मावशी मी म्हणते, हे पाचं जणींचे पाच निश्चय वेगवेगळे आहेत. ते पाचही नियम सर्वांनीच पाळायचे म्हटले तर बहारच होईल.'

मावशी म्हणाल्या, 'मला नेमके तेच म्हणायचे होते. माझ्या ऐवजी तुम्ही सुचवलेत ते छान. आता तुम्हीच जाहीर करा.'

मालती म्हणाली, 'हा जबरदस्तीचा मामला नाही. या पांच गोष्टी कोणत्या ? १) अपशब्द न बोलणे, २) निंदा न करणे, ३) घर व शरीर स्वच्छ नी नीटनेटके ठेवणे. म्हणजेच हातोहात काम करणे, ४) शिस्त पाळणे, ५) चूक दुरूस्त करणे व पुन्हा तीच चूक होऊ नये ही खबरदारी घेणे.

या पाचही गोष्टी प्रपंचात आवश्यक. तितक्याच परमार्थांत पण आवश्यक. जीवन स्नो, लिपस्टीकने उजळत नाही. हे प्रियंवदाला पण पटलंय. म्हणजे आपणा सर्वांना पटण्यासारखे आहे. प्रपंच परमार्थाचे आड येणार नाही. परमार्थ प्रपंचाचा अडसर होणार नाही. दोन्ही साधेल जीवन उजळेल. सर्वजणी जारीने प्रयत्न करूया. पाचही गोष्टींनी परिपूर्ण होऊ या. मान्य आहे सर्वांना ? सर्वांनी हात वर केले. टाळ्या वाजवल्या.

काकूंनी डोळ्याला पदर लावलेला सगळ्यांच्या लक्षांत आला. नाक डोळे पुसून त्या म्हणाल्या, 'इथं येऊन तुम्ही काय करता ? हे नव्हतं हो मला माहित ! मावशींच्या रूपाने देवीच भेटली मला. मलाही तुमच्यात घ्या. मी खरं सांगते, आज तुम्ही मला पार धुवून काढलीत. कारण या पाचही गोष्टी माझ्यात आहेत. या गुणांची जोपासनाच होत होती ! काकूंना हुंदका आवरेना.

मावशी म्हणाल्या, 'काकू डोळे पुसा. आपण कुठे चुकतोय हे कळलं हीच पायाभरणी अर्चन भक्तीची. आता आरती करूया. उद्या अर्चन भक्तीवर विचार करूया.

**। जय जय रघुवीर समर्थ ।**

卐 卐 卐

प्रकरण ६

# कुंकुमार्चन

आज खोलीचा नूरच बदलेला होता. सगळ्यांच्या बसायच्या जागा पूर्णपणे मोकळ्या होत्या. मध्यभागी एक लहानसा चौरंग ठेवला होता. त्यावर एक रेशमी वस्त्र असल्याने शोभा आली होती. चौरंगावर फुलांची सजावट केली होती. एका वाटग्यांत काय होते कळले नाही. कारण त्यावर झाकण होते. एका चांदीच्या ताटांत फुले, अत्तरदाणी, गुलाबदाणी होती. चांदीचा तांब्या, भांडे, पळी, ताम्हण अगदी कसे आजच आणले असे स्वच्छ नी लख्ख होते. एक छोटासा पाटही मांडला होता.

सगळ्यांनीच हे निरखून पाहिले. सगळ्याच चकीत झाल्या होत्या. सगळ्या बसल्या तोच मावशी आतून चांदीच्या ताम्हणांत देवीची मूर्ती घेऊन आल्या.

फार लहान नाही, फार मोठी नाही. मूर्ती अंबाबाईची अत्यंत सुबक होती. छोटासा परकर नेसवलेली व तोटा लावलेला अंगावर पदरासारखा शेला. पूर्वेकडे तोंड करून ताम्हण चौरंगावर ठेवले. देवीला नमस्कार केला. काकूंना केला. मग सगळ्यांना वंदन करून त्या आपापल्या जागी बसल्या.

'आज आपण कुंकुमार्चन करू या.' त्या म्हणाल्या.

प्रियंवदा म्हणाली, 'काल सांगितले असतेत तर आम्ही कुंकू आणले असते. कुंकवाशिवाय कुंकुमार्चन कसे होईल ? '

मावशी हंसल्या, 'केली आहे सोय. आपण असं करू या देवीची सहस्त्र नामावली म्हणूया व कुंकवाने तिची पूजा करू या.'

काकू म्हणाल्या, ' आगोबाई, कशी कल्पना चांगली आहे गं ? पण कोणी वहायचे कुंकू ? असा दुजाभाव निर्माण होईल ना ? मी आपली सुचवते हो. तुम्ही घरच्या मालकीणबाई. तुम्हीच पूजेला बसा. म्हणजे वेलाला दुःख नको. वालकाला दुःख नको.'

मावशी म्हणाल्या, ' काकू, दुपारी ३ ते ५ या काळांत आपण सर्व जणी समर्थांच्या सेविका आहोत. कोणाचे हे घर, देह हा कोणाचा ?'

सुशीला म्हणाली, 'आत्माराम त्याचा तोचि पाहे ।'

मावशी म्हणाल्या, 'होय ना ? मग असं करू या, मजजवळ देवी सहस्त्रनामावली पुस्तिका आहे. काकू प्रथम पूजा करतील. मग आपण अर्चन करू.'

शांता म्हणाली, ' चालेल, पण मावशी पूजा वेगळी व अर्चन वेगळे कां ? पूजा कशाला म्हणातात ? व अर्चन म्हणजे काय ? फरक सांगाल का ?'

मावशी म्हणाल्या, ' न सांगायला काय झालं ? सामान्यपणे पूजा देवाची करतात. आपण देवघरातल्या मूर्तीनाच देव म्हणतो. मूर्ती प्रतिमा, फोटो, या काल्पनिकच. मग खरा देव कोणता ? समर्थ, म्हणतात -



जेणे निर्मिलें सचराचर । त्याचा करावा विचार ।
शुद्ध विवेक, परमेश्वर । वोळखावा ॥ ५।१०।३०॥

परमेश्वर ! परब्रह्म ! या दिव्य शक्तीला मनुष्य पाहू शकत.नाही. मग पूजा कशी करणार ? म्हणून अवतार पूजा, प्रतिमा पूजा. विधीयुक्त पूजा सोळा उपचारांनी व्हावी. त्याला षोडषोपचारे पूजा म्हणतात.

सुशीला म्हणाली, 'मी सांगते कांही उपचार १) अवाहन, २) आसन, ३) पाद्य, ४) अर्घ्य, ५) आचमन, ६) स्नान, ७) वस्त्र'

सुनीता म्हणाली, ' थांब, पुढचे मी सांगते, वस्त्रानंतर देवाला ८) यज्ञोपवीत, ९) गंध, १०) फुले, ११) धूप, १२) दीप, १३) नैवेद्य, १४) मंत्र पुष्पांजली, १५) प्रदक्षिणा, १६) नमस्कार प्रार्थना.'

मावशी म्हणाल्या, ' रोज या सोळा उपचारांनी पूजा होऊ शकत नाही म्हणून पंचोपचार पूजा. पण पूजा करावीच.

काकू म्हणाल्या, 'मावशी, सोवळ्याने करावी असे का नाही सांगितले ?'

मावशी म्हणाल्या, 'सोवळे ओवळे हा विचार मागे एकदा आम्ही चर्चिला होता. काकू मुकटा, कद, पितांबर, धाबळी नेसून पूजा केली की ते वस्त्र आपण रोजच्या रोज धुतो कां ? सोडून खुंटीला महिना महिना न धूता अडकवून ठेवतो. दुसरे दिवशी तेच मलीन वस्त्र नेसून पूजा केली की देवाला आवडते कां ? ती पूजा सोवळ्याची ठरते कां ? रोज स्वच्छ धूत वस्त्र नेसून पूजा केली तर प्रसन्नता वाटणार नाही कां ? मला तरी असं वाटतं की सोवळ्यापेक्षा देवाला स्वच्छताच आवडेल. मन मालिन्य घालवण्यासाठी पूजा असावी. उपकरणी घासलेली स्वच्छ लख्ख असावीत. साहित्य स्वच्छ निर्मळ असावं. देवाची वस्त्रे सुद्धा रेशमी असली तरी स्वच्छ धुतलेली असावीत. नैवेद्याचे जिन्नस पक्व व चवदार असावेत. भाव शुद्ध असावा. तोच देवाला आवडतो.

प्रियंवदा म्हणाली, 'मावशी आमचे घरी देवघरांतल्या देवाची पूजा ब्राह्मण करून जातो. त्याला पगार देतात. देवघरापाशी जाऊन माझे हे फक्त नमस्कार करतात. पण आला, गेला पहि-पाहुणा यांची त्यांना देव समजून इतकी बडदास्त ठेवतात की बघतच रहावे. अगदी रस्त्यावरच्या झाडूवाल्याला सुद्धा कपबशीतून चहा देतात, बिस्कीटे देतात. नमस्कार करतात. संत आणि सद्‌गुरूंची पूजा तर यांना भुरळच घालते. काय काय आणतील कांही विचारू नका.'

मावशी म्हणाल्या, 'संतपूजा, सद्‌गुरूपूजा हा देवपूजेचाच प्रकार आहे. वाईट नाही. त्यामुळे त्यागाची भावना तयार होते. समर्पणाची वृत्ती तयार होते. आजच्या पूजेचा प्रकार त्यासाठीच.

आपण असं करू या. काकू आचमनादिक करून देवीला स्नान घालतील. देवीची पूजा करतील. मग आपण सहस्त्र नामावली म्हणू या. काकू या वाटग्यातील कुंकू मृगमुखीने देवीच्या पायाशी वहातील.

काकू म्हणाल्या, 'अगोऽबाई, हे मृगमुखी काय ग ! मावशी मला मृगमुखी काय ते नाही समजलं. म्हणजे देवीला कुंकू लावायचं नाही कां ? नुसतंच चिमटीने वहायचं कां?'

शांता म्हणाली, 'काकू हा अंगठा, हे मधलं बोट, हे करंगळी जवळच बोट असं जवळ आणा. बघा ही दोन बोट उभी शिंगासारखी दिसतात व तीन बोटांच हे हरणाचे तोंड वाटते. त्याला मृगमुखी म्हणतात. देवाला फूल, पान, अक्षता, हळदकुंकू वहातांना असे वहावे. हे आम्ही शिकलो. लांबून हळदकुंकू हवेतच उडवले तर काय फायदा ? यज्ञात आहुती टाकतांना अशाच अर्पण कराव्यात. समर्पण वृत्तीने वहाणे यालाच अर्चन म्हणतात.

पूजेनंतर ज्याची पूजा केली त्याची प्रार्थना करून जे आपल्याला जास्त आवडते ते देवाला संतांना अर्पण करणे म्हणजेच अर्चन. पूजेपेक्षा अर्चन जास्त श्रेष्ठ. म्हणून आज हा योग आपला.

काकू म्हणाल्या, 'अग पण मी एकटीनेच पुण्य मिळवायचं कां?' सगळ्या हसल्या. मावशी म्हणाल्या, 'काकू योजना अशी की १०० नावे होईपर्यंत तुम्ही वाट पहा. मग दुसरी पाटावर बसेल. पुन्हा १०० नावे झाली की तिसरी. म्हणजे नामावली पण होईल व सगळ्यांनाच अर्चन भक्ती जमेल. सगळ्यांच जणी देवघरांतल्या देवांची पूजा करतात असे नाही. म्हणून असे सर्वजणी मिळून करु या.

आपुले शक्तीनुसार। भावें पूजावा परमेश्वर
परंतु पूजू नये हा विचार। कोठेचि नाही ॥ १।६।१३ ॥

काकू म्हणाल्या, 'अगोऽबाई कसं ग छान सुचलं हे ? कोणाला राग नको. पण या कुंकवाचं काय करायचं ? प्रसाद म्हणून आपण वापरायचं कां ?

मावशी म्हणाल्या, 'तेच तर आपलं चुकतं. देवाला द्यायचं आणि तेच आपण परत घ्यायचं कां ? मग दिलं असं कसं होईल ?

सावित्री म्हणाली, 'पण मावशी, आपण देवाला नैवेद्य दाखवतो व तो नैवेद्य आपणच खातो ना ? का दान म्हणून दुसऱ्याला देतो. ?'

मावशी म्हणाल्या, 'अर्चन आणि नैवेद्य यांत फरक आहे. अर्चनात देवाला दिले, अर्पण केले हा भाव आहे. नैवेद्य दाखवतांना निवेदन करायचे 'भगवंता, तुझी मंगल दृष्टी या अन्नावर पडू दे. हे पवित्र जिन्नस आम्ही सेवन केले की त्याच अमृत होऊ दे' ही भावना त्यामागे असावी.

आज सगळ्यांनी मिळून कुंकुमार्चन केले की हे कागद हा चमचा. वाहिलेल्या कुंकवाचे सारखे १०/१२ भाग करूया. त्यांची पुडी बांधू या. या पिशव्या. यातून पुड्या घरी न्यायच्या. त्याच्या समान लहान १० पुड्या बांधायच्या. दोन तीन दिवसात ५ पुड्या नातेवाईक स्नेही सोबती यांना प्रसाद म्हणून द्यायच्या व ५ पुड्या नवीन ओळख काढून त्यांना कुंकुमार्चन हकीगत सांगून एकेकीला एकेक पुडी द्यायची.

काकू म्हणाल्या, 'कोणाचं ग डोकं हे ! चांगली शक्कल काढली.

मावशी म्हणाल्या, ' काकू समर्थांचीच शिकवण आहे ही -

वोळखीने वोळखी साधावी। बुध्दीनें बुध्दीं बोधावी।
नीति न्याये वाट रोधावी। पाषांडाची ॥ १५।१।३० ॥

प्रसाद कुंकू पुडी देताना सहजच अभिनव नवरात्र स्मरेल नाही कां ? जुन्या कल्पनांना नवा साज चढवून पण भक्तिमार्ग टिकवता येतो. नव्या नव्या ओळखीने लोकसंग्रह जमतो.



हळूहळू दासबोधासारख्या धर्मग्रंथाचा प्रचार करण्याकरिता बोलण्याचे धैर्य येईल. आपले विचार पटवून देण्याची शक्ती वाढेल.

कोणाला आपलेकडे बोलावूनही काम साधेल. तर कधी आपण कोणाकडे तरी जाऊन काम साधेल. अगदी बगीचा, देऊळ, भाजी बाजार येथे चार चौघींची तोंड ओळख झाली की एक दोन समर्थांच्या ओव्या त्यांना ऐकवून निरूपण थोडक्यांत करावे. प्रसाद पुडी द्यावी.

काकू म्हणाल्या, 'पण हे करायला १०/१२ तरी दिवस लागतील. मग इकडे येणे खाडे पडेल न ?

सुनीती म्हणाली, 'नाही पडणार. ३ ते ५ वेळ तर चुकवायची नाहीच. येता जाता सकाळी संध्याकाळी हे काम करता येईल. मी तर मनोमन ठरवलंय सगळ्याच १० मैत्रिणी जोडीन. अर्चन भक्तीचं महत्व तर पटवीनच पण दासबोध बघू या तरी एकदा असं त्यांना वाटलं पाहिजे.

मावशी म्हणाल्या, 'ते एकाएकी नाही जमणार. कारणाकारणाने ओळख वाढवीत त्यांनाच वाटलं पाहिजे असं कर. जुलमाचा रामराम खरा नव्हे.

काकू म्हणाल्या, 'मी आपला एक खुळचट प्रश्न विचारते. घरचं झालं थोडं नी ओझ्याला घोडं ! कशाला करा हा खटाटोप !

सुमित्रा म्हणाली, 'मी सांगते मावशी. काकू आपण माणूस म्हणून जन्माला आलो ना ? मग त्याचे सार्थक व्हायला हवेच. विवेक वैराग्य दोन्हीनी संपन्न व्हायचं हे ध्येय असावं. पशू सारखं फक्त आहार, निद्रा, भय, मैथून यांतच सारं जीवन वेचून काय फायदा ? ईश्वराकडून फार मोठी देणगी आपल्याला लाभली आहे ? कोणती ?

शांता म्हणाली, 'बुध्दी'.

सुमित्रा म्हणाली, 'बरोबर, त्या विवेक बुध्दीने वागावे. माणसाने जो मीपणा जोपासला आहे तो हद्दपार करायलाच हवा. देहात्म बुध्दीतला मीपणा गेल्याशिवाय परमात्म प्राप्ती होणार कधी ? मानवी जीवनाचे ध्येय ब्रम्हज्ञान मिळवणे हेच असावे.

काकू म्हणाल्या, 'अगोऽबाई माझे ! पूजा अर्चा करून हे ज्ञान मिळत नाही. त्या देवघरांतल्या देवांची पिढ्यानुपिढ्या पूजा चाललीय. काय फरक पडलाय ? सडा सारवण नित्याचं होतं तशी पूजा होते.

पूर्वा म्हणाली, 'काकू पूजा प्रेमभावनेने व अर्चन शुध्द भावनेने घडले तर फळ नक्कीच मिळेल. सडा सारवणासारखं देवकार्य उरकलं तर हजारो वर्षे उलटली तरी देव प्रसन्न होणार नाही.

सुनीता म्हणाली, 'मावशी, एक सत्य गोष्ट सांगते. लहानच मुलगा, बल्लाळ त्याचे नांव, भक्तीभावाने एका दगडालाच गणपती समजून दुर्वा ऐवजी गवतच वाहून पण प्रेमाने पूजा करीत असे. त्याचे वडिलांना ते आवडले नाही. त्यांनी बल्लाळाला झाडाशी बांधून ठेवले व घरी परतले. त्यांच्या अंगाची लाही लाही झाली. गणपती प्रकटला. बल्लाळाला मोकळे केले. 'मी येथे कायमचाच रहातो.' असं गणपती म्हणाला. तो पालीचा, बल्लाळेश्वर. वडिलांना उपरति झाली. तेही गणेश भक्त झाले.

मावशी म्हणाल्या, 'भगवंताच्या भक्तीला वय, रंग, रूप, वर्ण कांही आड येत नाही. फक्त श्रध्दा पक्की हवी. समर्थ म्हणतात,

काया वाचा आणी मनें । चित्तें वित्तें जीवें प्राणें ।
सद्भावे भगवंत अर्चनें । या नाव आर्चन भक्ती ॥ ४ । ५ । २९ ॥

भगवंताच्या मूर्तीची पूजा तर करावीच. पण पूजोपचार मनोभावे अर्पण करणे याला महत्व फार आहे. समर्थांना मानसपूजा फार आवडते.

ऐसी पूजा न घडे बरवी । तरी मानसपूजा करावी ।
मानसपूजा अगत्य व्हावी । परमेश्वरासी ॥ ४ । ५ । ३१ ॥

आपल्या आवडत्या दैवताची प्रतिमा मनात कल्पावी. सर्व उत्तमोत्तम उपचार मनानेच भगवंताला अर्पण करावेत. असे करता करता सर्व दु:खे नाहीशी होतात, मन प्रसन्न होते. खरे समाधान मिळते. समर्थ अगदी सोपा उपाय सांगतात.

मनें भगवंतास पूजावें । कल्पून सर्व हि समर्पावें ।
मानस पूजेचें जाणावें । लक्षण ऐसें ॥ ४ । ५ । ३२ ॥
जें जें आपणास पाहिजे । तें तें कल्पून वाहिजे ।
येणें प्रकारें कीजे । मानस पूजा ॥ ४ । ५ । ३३ ॥

काकू म्हणाल्या, 'अगोबाई, कशांत आहेत ग या ओव्या ?

प्रियंवदा म्हणाली, 'म्हणजे तुम्ही दासबोध वाचलात नाही कां ? काकू म्हणाल्या, अग मला नीट वाचता कुठं येतय. आमच्या लहानपणी शाळा कॉलेजात जायचं पॅड नव्हतं.

सुमित्रा म्हणाली, 'पॅड नव्हे काकू, फॅड !

काकू म्हणाल्या, 'तेच काय म्हणालीस तेच. पण आपली र ट फ करीत वाचायला शिकले. तरी पारायणाला बसले १०/१२ वेळा. पण हातात धरला नाही दासबोध अजून.'

शांता म्हणाली, 'आता नुसता हातात धरुन नाही उपयोग. मावशी ओवी न ओवी उकलून दाखवतात तसे वागू या. काकू, मावशींची इच्छा शुध्द आचाराची एक नवी संघ शक्ती तयार करू या. १० चे १०० व्हायला वेळ नाही लागणार. '

पूर्वा म्हणाली, 'मावशींनी कुंकुम आर्चनाचे निमित्त करून दासबोध आचरणाचा एक नवा धडा शिकवलाय. काय बरं त्याचं नांव ?

काकू म्हणाल्या, 'अग अर्चनभक्ती नव्हे कां ?

मावशी म्हणाल्या, 'काकू तुमचं उत्तर बरोबर. पण नवा लक्षांत ठेवण्याचा भाग म्हणजे मानसपूजा ! मानसपूजेला हवी फक्त एकाग्रता, मग ती पूजा कोठेही केली, केव्हाही केली तरी चालते. प्रत्यक्ष उपचारांची गरज नाही. पण १७ ठिकाणी फिरणाऱ्या मनाला खेचून भगवंताच्या किंवा सद्गुरूंच्या पायापाशी आणायचं व १६ उपचारांची सुंदर पूजा करायची.

शक्यतो पहाटेची वेळ निवडावी. स्नान आटोपून मानस पूजेला बसावे. सहा वाजेपर्यत प्रसन्न चित्ताने पूजा करावी. सगळा दिवस आनंदांत जातो. भगवंताचे चिंतन सदैव चालते. तो सावलीसारखा आपल्या बरोबरच आहे. असा विश्वास पक्का होतो.

काकू म्हणाल्या, 'अगोऽबाई, हे सोपं आहे की ग ! श्रम नाहीत. मुख्य म्हणजे खर्च नाही काही. नाहीतरी झोप कमीच झालीय. पहाटे भुतासारखी तीनलाच जाग येते. उठावं



व बसावं देवापाशी.

नीला म्हणाली, 'काकू करायचं म्हणून करायचं असं नको. वेळ जात नाही, मग काय करायचं ? मानसपूजा करू या. या भावनेतून पूजा होणार नाही. गाजराची पुंगी वाजली तर वाजवायची नाही तर खायची. तसं नाही हे.

मावशींनी मागच्या एका चर्चेच्या वेळी नीट समजावून सांगितलं होतं. त्याप्रमाणे रोज अभ्यास करता करता आता कुठे १०/१५ मिनीटे बसता येतंय. २/३ उपचार अर्पण करी पर्यंत मन भुर्रकन बाहेर जाते. तरी कंटाळायचं नाही. पूर्ण जमेपर्यंत प्रयत्न करीतच रहायचं.

मावशी म्हणाल्या, 'अगदी मनापासून ओढ असेल तर जमेल. सर्वांना जमेल. आता आपण पुड्या बांधून ठेवू या व १० च मिनीटे स्वस्थ बसून बघू या कोणाचे मन कुठे पळते ते !

कसं यंत्रासारखं झटपट काम झालं. कुठे कचरा नाही. कुठे घाणं नाही. १२ पुड्या बांधल्या. हरि ॐ चा उच्चार करून सगळ्या शांत बसल्या.

प्रसन्न चित्ताने १५ मिनिटांनंतर मावशी हळूच म्हणाल्या, 'अंबा माता की जय !'

हळूहळू एकेकीने डोळे उघडले. आनंद ओसंडून निघत होता. आरतीची तयारी होतीच. आनंदाने सर्वांनी आरती केली व एकमेकींचा निरोप घेतला.

**। जय जय रघुवीर समर्थ ।**

卐 卐 卐

प्रकरण ७

## मनंच नाहीसं झालं !

आल्या आल्या काकू म्हणाल्या, 'चालतांना शीण वाटतो पण मावशी, खरं सांगते पाय धुवून पायऱ्या चढून दाराशी आले की सगळा शीण एकदम जातो. हे कसं घडतं ?

प्रियंवदा काकूंच्या मागेच होती. ती चटकन म्हणाली, 'मावशी सुहास्य वदनाने स्वागतास उभ्या असतात. सात्विक नजरेला आपली नजर भिडली की आतपर्यंत एक आनंदाची लाट जाते. कधी कधी त्या दारांत नसल्या तरी आतल्या खोलीतून येणारा उदबत्तीचा वास व मावशींची चाहूल सुध्दा प्रसन्नता वाढवते. आपण बसतो न बसतो तोपर्यंत 'या' असे म्हणतच हातातले काम बाजूला सारून हात पुसतच त्या बाहेर येतात.

वेळेवर सगळ्या जमल्याच. एकमेंकींकडे पाहून एकमेकीने एकमेकीला नमस्कार केला. सर्वजणी आपापल्या जागेवर बसल्या.

मावशींनी काकूंच्या पायाला स्पर्श करून वाकून नमस्कार केला. काकूंनी पण मावशींच्या पाठीवर हात फिरवून 'औक्षवंती (आयुष्यवंती) हो.' असा गोड आशीर्वाद दिला.

नंतर सगळ्यांना नमस्कार करते हं ! असं म्हणून जागेवरूनच पण वाकून नमस्कार केला व बसल्या.

प्रियंवदेने शंका विचारली, 'मावशी, तुम्ही काकूंच्या पायाला हात लावून वाकून नमस्कार केलांत. आम्हांला वाकूनच पण सगळ्यांना मिळून पाच सात वेळा नमस्काराचा हात हलला. आम्ही सगळ्यांनीच उभ्या उभ्याच एकमेकीला छातीशी दोन्ही हात जुळवून नमस्कार केला. त्यातला नमस्काराचा खरा प्रकार कोणता ? एकमेकाला भेटल्यावर नमस्कार कां करतात?

मावशी म्हणाल्या, 'भेटणाऱ्याबद्दल आदर दाखवण्यासाठी नमस्कार करतात. सत्काराचे एक अंग म्हणजे नमस्कार. मनातला आनंद व्यक्त करणे हाही एक भाव नमस्कारामागे असतोच. जितक्या जाती तितक्या रीती, सर्वांचेच नमस्कार एका पध्दतीचे नसतात. पण नमस्कार पध्दत असतेच.

महाराष्ट्रांत बायका वाकून तीनदा वा पाचदा दोन्ही हात जुळवून वाकून नमस्कार करतात. पुरूष वाकतात पण एकदाच जमिनीला पायापाशी हाताने स्पर्श करून नमस्कार करतात.'

काही जमातीत पायावर डोके टेकवतात तर कांही जमातीत बायका डोक्यावर पदर घेऊन नमस्कार करतात. काही ठिकाणी गळाभेट करून नमस्कार करतात. विशेषत: लग्नाकार्यात विहीणी विहिणी, व्याही व्याही असा खांद्याला धरून नमस्कार करतात.

देशादेशाच्या पध्दती भिन्न भिन्न असतात. काही देशांत हस्तांदोलन केले की तो नमस्कारच समजतात. काही देशांत जमिनीला डोकं लागेल इतकं वाकतात. कोठे कोठे डोक्याला डोळे लावतात. तऱ्हा भिन्न भिन्न असल्या तरी नमस्काराला म्हणजेच वंदनाला



महत्त्व आहे.

काकू म्हणाल्या, ' अगोऽबाई, माझे, अग तुम्ही सगळ्या प्रपंच करता नं ? मग नमस्कार असा कां करतात हे कसं विचारतीय ती !

सावित्री म्हणाली, 'काकू, तिचा जन्म अमेरिकेतला. लहानपण सारे तिकडेच गेले. आत्ता २/४ च वर्षे झाली, सारे कुटुंब मायदेशी भारतात आले. ती भारतीय संस्कारात नुकतीच रूळतीय.

काकू म्हणाल्या, 'तिचा बाप कट - सगळ्याजणी हसल्या.

सुनीती म्हणाली, 'काकू बॉब कट म्हणा.'

काकू म्हणाल्या, 'अगोऽबाई, थोडं तुमच्यात मिसळू पहाते ना ! पण चुकलंच कां ? बरं 'बाब कट' तू काय म्हणालीस तेच. आपण नट्टापट्टा म्हणूया. तिचा नट्टापट्टा पाहून मला वाटलचं होतं तसं ! मला पण खरंच विचारायचं होतं - या प्रपंचात देवाला नमस्कार, सूर्याला नमस्कार, गाई ब्राम्हणांना नमस्कार, मुलगी दाखवायला नेली तरी नमस्कार. कशाला हे नमस्कार ?

सावित्री म्हणाली, 'काकू भागवत सप्ताह खूप ऐकले असे म्हणता. मग सतीचं आख्यान विसरलांत कां ? शंकराने भर सभेत उठून प्रगट नमस्कार न केल्यामुळे दक्षाच्या गैरसमजातून केवढा अनर्थ ओढवला ?

तेच शंकरजी ब्रम्हदेवाने अनन्यभावाने नमस्कार केल्यामुळे संतुष्ट कसे झाले ? देव कार्य साधण्यासाठी दक्षाच्या यज्ञ शाळेत आले, समर्थ म्हणतात ते खोटं नाही.

नमस्कारे कृपा उचंबळे । नमस्कारे प्रसन्नता प्रबळे ।
नमस्कारे गुरूदेव वोळे । साधकांवरी ॥ ४ । ६ । १७ ॥

शंकराने कृपा कोणती केली ? दक्ष मेलाच होता. त्याच्या मृतदेहाचे मस्तक काढून बोकडाचे मस्तक चिकटवले. तो जीवंत झाला. यज्ञ सांधवला. पूर्णाहुती झाली. सर्व देवांच्या आहुत्या बंद पडल्या होत्या. सर्व तृप्त झाले. दक्षाला उत्तम गति मिळाली. नवा दक्ष म्हणून तो पुन्हा जन्माला आला.

अखंड नाम घेणारे, समाधिस्थ असणारे शंकरजी ब्रम्हदेवाला गुरूस्थानीच वाटत होते.'

मावशी म्हणाल्या, 'आणखी एक नामस्मरणाचा फायदा. भागवतातीलच कथा डोळ्यापुढे ठेवून समर्थ म्हणतात की काय कोण जाणे !

नमस्कारें लीनता घडे । नमस्कारे विकल्प मोडे ।
नमस्कारें सख्य घडे । नाना सत्पात्रासी ॥ ४ । ६ । १४ ॥

बाल ध्रुवाने नारद मुनींना प्रथमदर्शनीच लीनतेने नमस्कार केला. त्याची नम्रता, लीनता पाहून नारद प्रसन्न झाले. ध्रुवाने प्रार्थना केली, 'मला माझ्या ध्येयापासून दूर करू नका. माझ्यावर कृपा व्हावी. मला योग्य मार्ग दाखवा. मी वंदन करतो.'

किती मधुर गोड भाषण. म्हणून नारद मुनींनी त्याला 'ॐ नमो भगवते वासुदेवाय ।' हा बारा अक्षरी मंत्र सांगितला. हीच भगवंताची कृपा. ध्रुवाची तपस्या सफल झाली ना ?

प्रपंच उत्तम व नेटका करायचा म्हणजे संस्काराची जोपासना व्हायलाच पाहिजें. आपल्याकडे कोणी थोर मंडळी येतात. गंमत काय होते ? आपण मोठ्या कौतुकाने लहान नातवाला किंवा नातीला म्हणतो, 'त्यांना नमस्कार कर.'

हे न ऐकता नात तोंड मुरडून मागे सरकते, किंवा नातू स्पष्ट म्हणतो, 'मी नाही जा, मला नाही आवडत.' त्यावेळी आपली केवढी तोंडफोड होते.'

शांता म्हणाली, 'पण मावशी, आपल्या आळवाची खाज आपल्याला माहीत असतांना आपण सांगूच नये.'

सुशीला म्हणाली, 'ते खरंच. पण या घरांत कांही रीतभात नाहीच हे चाणाक्षांच्या नजरेतून सुटेल कां? खरं सांगू ? हा दोष मुलांचा नाही. पालकच खरे जबाबदार. मुलांना न सांगता मोठी माणसे जर नमस्कार करतील तर ते पाहून मुले स्वत:च नमस्कारास पुढे येतील. आपला अपमानही होणार नाही. कारण सत्प्रवृतींकडे वळण्याचा कल निसर्गाने दिलेलाच आहे. तान्हेपणापासून तो जोपासला की अंकूर फोफावून वाढतो. कोठे आरती किंवा भजन चालू असेल तर लहान मूल निरागसपणे टाळ्या वाजविते. मोठी माणसेच लाजतात.

घराघरांतून हे शुध्द संस्कार जोपासायला हवेत. मातांनीच सकाळ, संध्याकाळचा नमस्कार देवाला, वडील माणसांना सुरू केला तर मुले न सांगता करतील. लहान मुले अनुकरण प्रिय असतात.

मावशी म्हणाल्या, 'अगदी योग्य आहे विचार. समर्थ सुध्दा कोणाला कसा नमस्कार हे आवर्जून सांगतात.

साष्टांग नमस्कारास अधिकारू । नाना प्रतिमा देव गुरु ।
अन्यत्र नमनाचा विचारू । अधिकारे करावा ॥ ४ । ६ । ४ ॥

देवाला, सत्पात्र ब्राम्हणाला, सद्‌गुरूंना साष्टांग नमस्कार घालावा. साष्टांग नमस्कारांत अनन्य भाव असतो. शरणागतीची ती पक्की खूणंच समजावी. वडिलधाऱ्या माणसांना नेहमी सारखाच पण पदस्पर्श करावा.

जेथें दिसती विशेष गुण । ते सद्‌गुरूंचें अधिष्ठान ।
याकारणे तयासी नमन । अत्यादरे करावे ॥ ४ । ६ । ९ ॥

अशा नमस्काराने दृष्टीची व्यापकता वाढते. सर्वत्र सद्‌गुरू स्वरूप दिसू लागल्यावर भेदाची भावना खुंटण्यास मदत होते. प्रत्यक्ष सद्‌गुरूंना वंदन करतांना आपल्या उजव्या हाताने त्यांचे उजव्या पावलास व डाव्या हाताने त्यांचे डाव्या पावलास स्पर्श एकाच वेळी करावा, म्हणजे हाताचा कैची सारखा आकार होतो. पदस्पर्श करून झाल्यावर आपले मस्तक चरणावर टेकवावे. त्यांत प्रेमभाव असावा. अशावेळी गुडघ्यावर टेकून नमस्कार घडतो. साष्टांग नमस्कार घातला तरी पदस्पर्श हवाच.

कोर्ट कचेरी कार्यालये वा रस्त्यावर उभ्या उभ्याच हात जोडून मस्तक किंचित लववून नमस्कार करावा.

निशेष करितां नमस्कार । नासती दोषांचे गिरिवर ।
आणि मुख्य परमेश्वर । कृपा करी ॥ ४ । ६ । १८ ॥



ज्याला आपण नमस्कार करतो, त्याचे बद्दल खसखशी इतकाही विकल्प मनांत आणू नये. तरच सर्व दुष्ट प्रवृतींचा नाश होतो. अंत:करण शुध्दीचा हा सोपा मार्ग !

बाह्य शुध्दता बाह्योपचाराने साधते, अंत:करण शुध्दी नमनाच्या, वंदनाच्या, नमस्काराच्या उपायाने साधते.

आपल्या आवडत्या देवतेला जसा प्रेमाने नमस्कार घडतो, तसा सर्वही देवांना नमन करतांना ही एकाचीच अनेक रूपे भावून नमस्कार करावा. समर्थ म्हणतात,

सर्व देवास नमस्कारिले । ते येका भगवंतास पावलें ।
येदर्थी येक वचन बोलीलें । आहे तें ऐका ॥ ४ । ६ । ११ ॥

एक संस्कृत वचन आहेच.

आकाशात्पतितं तोयं यथा गच्छति सागरम् ।
सर्वदेवनमस्कार: केशवं प्रतिगच्छति ॥

समर्थाचे म्हणणे तेच आहे -

या कारणे सर्व देवांसी । नमस्कारावें अत्यादरें सीं ।
अधिष्टान मानितां, देवांसी । परम सौख्य वाटे ॥ ४ । ६ । १२ ॥

अंत:करण शुध्द असल्यावर ज्याला नमस्कार करतो, त्याच्यावरही त्याचा परिणाम घडतो. त्यासाठी सत्यकथा सांगते -

एका शतकाच्या आसपासचीच गोष्ट. मात्र अगदी सत्य घटना. गोव्यात राणे देसाई बंड माजले. भांडणाचे मूळ सत्ता नी पैसा, श्रीमंता बरोबर गरीब दरिद्रीसुध्दा भरडले गेले. सर्वत्र हाहा:कार . खुद्द 'धाबे' गावांतील गोष्ट.

केवळ नमनाने, मधुर वाणीने भगवंतांची कृपा कशी झाली पहा -

दामोदरपंत व लक्ष्मीबाई दोघेच पतिपत्नी घरांत. दोघेही वृध्द. त्यात दामोदर पंत अर्धांग वायूने अपंगत्व आलेले. गडगंज संपत्ती नसली तरी खाऊन पिऊन सुखी कुटुंब - बागायत खूप मोठी, घरांत दोघांशिवाय तिसरे माणूस नाही. रात्र झाली. एकाएकी आरडाओरडा ऐकू आला. मशालींचा उजेड दिसला.

लक्ष्मीबाई मोठ्या धीराच्या. आपण त्यांना आजी म्हणू या. त्यांनी जाणले. धाड आलीय. पतीदेवांना हाताला धरून देवघरांत बसवलं. ताम्हणांत गणपती ठेवून तांब्यात पाणी पळी पंचपात्र अभिषेक पात्र सर्व तयारी करून दिली. गणपतीवर अभिषेक करीत बसा. घाबरू नका. असा धीर देतच बाहेर आल्या.

तीस चाळीस जणांचा म्होरक्या - चांगला दांडगा दुणगा पुरुष अंगणांत उभा. त्याच्या मागे त्याचे साथीदार - आजींनी कंदिलाची वात मोठी केली. दाराच्या अडसर काढला. अंगणात आल्या. कंदील कट्यावर ठेवला. त्या काळ्याकभिन्न पुरूषाला वाकून नमस्कार केला.

'ये बाबा' प्रेमळ शब्दांत म्हणाल्या, 'बसा सगळी जण बसा. म्हणत सगळ्यांना मिळून पुन्हा एक नमस्कार केला. त्या दणकट म्होरक्याला झोपाळ्यावर 'बैस' म्हणाल्या. मला देवच पावला हं ! आज माझ्या मामंजींची तीथ. पण सकाळ पासून कोणीही अतिथी, अभ्यागत आले नाहीत. साधा एखादा भिकारी तरी यावा, तोही नाही. कामावरचा गडी

पण आजारी. तोही आता नाही. सारखे वाईट वाटत होते. आज अन्नदान घडले नाही. आम्ही दोघच म्हातारे. जेवण केले. पण समाधान वाटेना.

किती जण आहांत. मी पटकन आंबील शिजवते. थोडं थोडं खा, पाणी प्या, मग काय करायचे ते करा. मला रात्रीचं नीट दिसत नाही. पुरेशी केळीची पाने काढून आणतां का ? असं म्हणून तिने कोयता त्याचे हाती दिला.

आत जाऊन चुलीत मोठ्ठा जाळ केला. पातेलं ठेवलं. पाणी घातलं. आंबिलाचं पीठ काढून रटारटा शिजवलं. खोबऱ्याची चटणी व ओघराळ भरभरून आंबीळ सर्वांना पानावर अंगणातच वाढलं. ओरपून ओरपून सगळ्यांनी ताव मारला. पोटभर पाणी प्याले.

सगळे तृप्त झाले. तसा तो म्होरक्या म्हणाला, 'चला, आपण मीठाला जागलं पाहिजे. म्हातारीच्या घरचं मीठ खाल्लं. पोटं टंब भरली. आपल्याला पुढं जायचंय एकजण इथंच रहा. म्हातारा म्हातारीच्या सोबतीला. शंभ्या, तू ये इकडं. तू इथंच न्हा. म्हातारीच्या केसाला धक्का नाही लागता उपयोगी. काम कर. पोटभर जेव माऊलीच्या हातचं, माय माझी.

त्याने आजींना नमस्कार केला व म्हणाला, 'म्हातारे, आम्ही दरोडेखोर. पण देव समजून नमस्कार केलास - खाऊं घातलंस. माय माझी. आता काळजी करु नको. हा शंभ्या गुणी मुलगा हाय. इथंच न्हाइल. काम करील. कामाचा पैसा मी देईन त्याला. तो तुम्हाला सोबत करील मरे पर्यंत. मुलगाच माना त्याला. बेशक आनंदांत न्हा. चलारं म्होरं असं म्हणत टांगा टाकीत सगळे पुढे गेले. शंभ्या आजींना नमस्कार करून तेथेच सेवा करीत राहिला.

आजोबांना प्रचिती आली - भाव तेथे देव. समर्थ म्हणतातच,

सहज देव असताचि असे। सायासे देव कुठे नासे।

भगवंताबद्दलचा शुध्द भाव जोपासला की तो कोणत्या रुपाने येतो. आजोबांनी डोळ्यातल्या आसूंनी गणपतीस अभिषेक केला.

नमस्कारें पतित पावन। नमस्कारें संतांसी शरण।
नमस्कारें जन्ममरण। दुरी दुऱ्हावे ॥ ४ । ६ । १९ ॥

एका नमस्काराने केवढा घोर प्रसंग टळला. नुसता प्रसंग टळला असे नव्हे तर एक जीवंत आधार मिळाला. आजींना जन्मभराचा भाऊ मिळाला. यापेक्षा भगवंताची कृपा ती कोणती ?

काकू म्हणाल्या, 'मला वाटते, श्रवण, कीर्तन, भजन या भक्तीपेक्षा नमन भक्तीच चांगली. धैर्याने केलेल्यां एका नमनांत काय साधले ? तुम्ही गोष्ट सांगत होता मी नमन, नमन म्हणत होते. म्हणजे 'न मन' त्या म्होरक्याचे मनच नाहीसं झालं. त्याच्या मनातले विचार पार बदलले.

कुऱ्हाडच कशाला ? एक थपडी सरशी म्हातारीला लोळवली असती. त्या आजोबांना नाहीसं करायला कितीसा वेळ लागला असता ? पण 'नमन'. एका वंदनाने सारा नूर बदलला.

मावशी मी अगदी खरं तेच सांगते. माझ्याकडे सारखं कोणी ना कोणी येतंच असते.



मी सवाष्ण किंवा मुलगी आली तर कुंकू लावून साखर देते हातावर. पुरूष पण कोणी आले तरी साखर देते. पाणी देते प्यायला. पण नमस्कार नाही करत. मला कमीपणा वाटतो. पण आज डोळे उघडले माझे. तुम्ही सगळ्या एकमेकींना नमस्कार करता, मला खुळेपणा वाटत होता, पण आता न मन. पटलं मला. मी हा नमस्कार देवालाच करते असे समजून नमस्कार करत जाईन. मगच साखर देईन. सोपी आहे ही साधना.

मावशी म्हणाल्या, 'समर्थ म्हणतात त्याची प्रचिती आली.'

याकारणे नमस्कारापरते। आणीक नाही अनुसरतें।
नमस्कारें प्राणीयातें। सद्‌बध्दि लागे ॥ ४ । ६ । २१ ॥

अशी सद्‌बुध्दी तयार होत होत प्रपंच केला तर प्रपंच हाच परमार्थ होईल. परमार्थ म्हणून वेगळा करावाच लागणार नाही. हळूहळू प्रयत्नाला लागू या. १० तरी घरं सुधारूया. मनातून मी पणा गेला की त्यालाच म्हणतात मनच नाहीसं झालं. म्हणजेच शुध्द झालं. शुध्द भावानेच आता आरती करू या.

**। जय जय रघुवीर समर्थ ।**

卐 卐 卐

प्रकरण ८

## श्रेष्ठ व्रत सेवा

नीला, सुशीला, सावित्री, सुनीता तर्कावर तर्क करीत होत्या. पण निर्णय लागतच नव्हता. सर्वानुमते ठरले. आपण काकूंना पुढाकार देऊ या. त्या मोकळेपणी कोणताही प्रश्न विचारतात. मावशी न रागावता उत्तर देतात. आपली पण शंका मिटेल.

शांता व काकू बरोबरच आल्या. आल्या आल्याच काकू म्हणाल्या, 'तुम्ही आधी येऊन तयारी करून ठेवता होय ग ? मी रोज विचारीन म्हणते. एकमेकींना विचारतेच आहे. आज शांताला विचारले. ती नाही म्हणाली. त्या प्रियंवदेला विचारायलाच नको. ती नकटीच्या नाकाएवढा,रुमाल सांभाळील की कामाला मदत करील ?' असे म्हणत काकूंनी हुश्श ऽ करून बैठक मारली.

मावशी हात पुसतच बाहेर आल्या. 'बैठकी कोण घालतो ?' कोणाची शंका आहे ही ?' मावशींनी विचारले.

'म्हटलं तर काकूंची. नाहीतर सगळ्यांचीच ' नीलाने उलगडा केला.

मावशी वंदन करून खाली बसल्या, 'हे पहा. हे सेवाभावी काम. तुम्ही नियमितपणे येता. तुम्हा सर्वांची सेवा ही त्या भगवंताचीच सेवा. सेवाभावाने काम करणारी माणसे भेटणे हे भाग्याचेच लक्षण. बाई केर काढते. गडी भरून बाहेर टाकतो. बाई बादली तांब्या घासून भरून आणते. गडी पायऱ्या झाडून बादलीवर झाकण ठेवून झाडापाशी ठेवतो. बाई बैठकी काढते. गडी व्यवस्थित ठेवतात. बाई स्वयंपाक करतात. गडी माणसं सगळं आवरतात.'

काकू म्हणाल्या, 'बाई व गडी येतात तरी केव्हा आणि जातात तरी केव्हा ? त्यांना पगार तरी किती ? आणि सारं गड्या माणसांनीच काम केलं की मावशींना कामच काय राहिलं मग ? ती दोघं रहातात तरी कुठे ? आम्हाला तर कधी दिसलीच नाहीत.'

मावशी गालातल्या गालात हसल्या. त्या म्हणाल्या, 'बाई व गडी माणूस येथेच रहातात. त्याचंच घर हे.'

काकू म्हणाल्या,' अगोबाई माझे. म्हणजे सगळं तुम्ही दोघेच करता म्हणा की ! अगदी भांड्याकुंड्या पासून तुम्हाला ते मदत करतात. धन्य आहे बाई !

मावशी म्हणाल्या,'काय हरकत आहे ? सेवाच घडते ही. तुम्हाला आश्चर्य वाटतं नं ? पण लग्न झाल्या दिवसापासून मी हे सेवा व्रत त्यांचेच कडून घेतले. दोघांनी आनंदाने हे व्रत पत्करले आहे. बदलीच्या गावी गेलो तरी स्थिर स्थावर व्हायला २ दिवस सुध्दा लागत नाहीत. लगेच कार्याला सुरुवात. त्यांच्या आवडीचं काम वाचन व बागकाम. माझ्या आवडीचं काम तुम्ही पहाताच आहात. १५/२० तरी गावे फिरलो असू. जाऊ तेथे लगेच संच जमवायच्या मागे लागतो. पत्र मैत्री वाढते. नात्यापेक्षासुध्दा अधिक प्रेमाची माणसे जवळ होतात. प्रत्येक ठिकाणी २/४ तरी मंडळे स्थापून कार्य चालू करून पुढचे गांव



गाठायचे असे चालले आहे. जाऊ ते आपलेच गांव. दासबोध हाती असला की माहेरी गेल्यागत वाटते. दासबोधातील ओव्या वाचतांना आई अंगावरून हात फिरवतीय असं वाटतं. ओवीचा अर्थ छान उकलला की आईने गोड खाऊ मुखांत घातलाय, घास भरवलाय असे वाटते. दासबोध हे माझं माहेरच आहे. दासबोधाने माझे खूप लाड पुरवले आहेत.

दासबोधामुळे माझा दास्यभाव वाढला. सेवाभावाने काम ही दास्यभक्तीच. जो आदर्श डोळ्यापुढे ठेवला त्याचं पडेल ते काम काया वाचा मने करणे म्हणजेच दास्य भक्ती.

सातवें भजन ते दास्य जाणावें। पडिलें कार्य तितुकें करावें।
सदा सन्निधचि असावें। देव द्वारी ॥ ४।७।२॥

सावित्री म्हणाली,' दास्य भक्ती भगवंताच्या म्हणजेच मंदिराच्या आसपास, आवारांत राहूनच करायची ना ? ती सगळ्यांना कशी साधेल ?

मावशी म्हणाल्या, 'सगळ्यांना जमेल. न जमायला काय झालं ? मंदिराचा अर्थ संकुचितपणे न घेता व्यापकपणे घ्यावा.'

आपण गावात लहान वा मोठ्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा करून लहान मोठी मंदिरे बांधलेली पहातो. प्रत्येक मंदिरांत वेगवेगळी प्रतिमा. म्हणून हे रामाचे देऊळ, हे कृष्णाचे, हे देवीचे, हे मारुतीचे, हे शनीचे . पण असं पहा,

'मंदिरातल्या मूर्तीतून का कधी रहातो राम ?
तुझ्या रे अंतरी त्याचे धाम ॥'

असं एका काव्यात म्हटलं आहे. याचा खरंच विचार करायला हवा. मनाचं मनपण नाहीसं व्हायला हवं. मनाला अंतर्मुख करायला हवं.

आता तर सर्व देवांचे संमेलन मोठ्या मंदिरातून आढळते. नाव गणपती मंदिर, मुख्य गाभाऱ्यात भव्य गणपती. पण बाजूच्या प्रांगणांत वा सभा मंडपांत सर्व देवांच्या मूर्ती आढळतात. संतांच्या प्रतिमा स्थापन केलेल्या असतात. एका देवळांत गेलात की दहा मिनीटांत सर्व देवांचे दर्शन होते. त्या दर्शनातून आम्ही काय मिळवतो ?

शांता म्हणाली, 'देवांचं दर्शन घेतल्याचं समाधान नाही कां मिळत ? वेगवेगळ्या देवळांत जायलाच नको.

मावशी म्हणाल्या, 'खरं सांगा, दहा मिनीटांत सतरा देवांना वंदन केलं. चित्त कोठे स्थिर झालं ? कोणतं ध्यान हृदयांत ठसलं ? देवदर्शन हे एक सदर भरलं. हे समाधान वरवरचं की अंतरंगातलं ? म्हणून समर्थ म्हणतात –

ऐक निश्चय तो ऐसा। मुख्य देव तो आहे कैसा।
नाना देवचा वळसा। करूचि नये ॥ ५। १०। २९ ॥

मनाच्या धावाधावीत जीवाची होरपळ होते. 'ना हे, ना ते ' असे होते. म्हणून प्रापंचिकांनी प्रथम काय करावे ?

सन्मार्ग तो जीवीं धरणें। अनमार्गाचा त्याग करणे।
संसारिका त्याग, येणें । प्रकारें ऐसा ॥ ५। १०। २॥

सन्मार्ग धरण्याकरिता सत् संगती हवी, सत् संगतीतच सद्ग्रंथ वाचन वा श्रवण घडते व सहजच पटते.

कुबुद्धीत्यागेंविण कांही। सुबुद्धी लागणार नाही।
संसारिका त्याग पाहीं। ऐसा असे ॥ ५।१०।३॥

सुशीला म्हणाली, 'या कुबुद्धीतील काही लक्षणे आपण सोडलीच. नाही कां ? एकदम सुटणार नाही. कुबुद्धी सोडायचीच. हा निश्चय पक्का करायचा. महिनाभरांत सुबुद्धीकडे वळलो की त्याग कशाचा केला हे ध्यानी येईल. पण तेवढ्याने दास्य भक्ती साधली असे होईल कां ?

मावशी म्हणाल्या,'दास भक्ती म्हणजे केवळ सद्गुणांचा पुतळा होणे नव्हे. केवळ चाकरी करणे नव्हे. नोकरासारखे अमुक ते अमुक वेळांत आखून दिलेले काम करणे म्हणजे दास्य नव्हे. कांही कार्यापुरते बांधून घेणे व कार्य पार पाडणे म्हणजे दास्य नव्हे. दास्य म्हणजे सेवा, पडेल ते काम, जरूर त्यावेळी, पण मोबदल्याची इच्छा न करता करणे म्हणजे दास्य भक्ती.

दास्य भक्ती करावी तर हनुमंतानेच. तुम्हाला एक गंमत सांगते -

अयोध्येच्या श्रीरामचंद्राच्या राज्याभिषेकाच्या नंतरची गोष्ट. सीतामाईंनी सर्व वानर गणांना जमवून श्रीरामचंद्र महाराजांची सेवा करण्याची कामे वाटून दिली. हेतू हा की रामाभोवती वानरांचा मला काम मिळावे म्हणून घोळका नको.

पहाटे भूपाळ्या म्हणून उठवणे, इथपासून काम वाटणी सुरु केली. एकाने तोंड धुण्याची व्यवस्था पहायची, तर दुसऱ्याने स्नानाची तयारी जय्यद ठेवायची. एकाने देवपूजेची तयारी तर दुसऱ्याने नास्त्याची सोय पहायची. अगदी पाण्याचे भांडे रामरायांचे हातात द्यायचे. प्यायचे काम, खायचे काम फक्त रामाने करायचे. हात धुणे, दुपारची विश्रांती, दरबारात जाणे, अगदी रात्री झोपेपर्यंत सर्व कामे बऱ्याच वानरांना वाटून दिली.

मारुतीच्या वाटणीला एकही काम शिल्लक ठेवले नाही. त्याला मुद्दाम बोलावून ती यादी वाचायला दिली. त्याने निरखून यादी वाचली. त्याच्या चाणाक्ष नजरेत तेव्हाच आले की आपल्या वाटणीला एकही काम नाही. म्हणजे प्रभू रामचंद्रांची सेवा तर राहोच पण स्वामींचे दर्शनही होणार नाही.

किंचित मान हलवून मारुती म्हणाला, 'मी एक सुचवू ? कामाची वाटणी छान झालीय, पर अगदी क्षुल्लक एक काम रहातंय. तेव्हढच माझ्या वाटणीला आलं तर ? आपली परवानगी असेल तर ते मी करीन म्हणतो.

सीतेच्या पण लक्षात नाही आलं. लहानसं कोणतं काम राहिलंय ?

मारुतीने उलगडा केला. 'राज्याच्या राजकारणाच्या कामाच्या व्यापात प्रभूला जर आळसावल्यासारखं वाटलं तर जांभई येईल. जांभई आली तर काय स्वामींनी चुटकी वाजवून तिला घालवायची कां ? त्यांची त्यांनी चुटकी वाजवण्यापेक्षा मी ती वाजवीन.'

राम जांभई देणार ! तेव्हा हा चुटकी वाजवायला येणार ! सीतेसह सर्वांनाच हसू आले. वेडपट म्हणून जो तो आपापल्या कामाला गेला, मारुती तडक रामचंद्राचे आसपास त्यांना जांभई येते कां हे पहाण्यासाठी अगदी सन्मुख चुटकीचा हात तयार ठेवून उभा राहिला. रामाची सावलीच बनला. रात्रंदिवस राम दर्शन घेत मागे पुढे बाजूला उभा. तहान नाही. भूक नाही. सेवा अंतरू नये म्हणून तत्पर, असे दोन दिवस गेले. राम सर्व जाणून होतेच.



तिसऱ्या दिवशी दुपारीच आपण झोपलो आहोत असे रामाने भासवले. त्यांच्या झोपण्याची व्यवस्था करून वानर परतले. मारुती पलंगासान्निध्यात त्या निद्रीस्त शांत मुद्रेकडे पहात मांडा ठोकून बसला. चर्मचक्षूंनी रूप पहाता पहाता हृदयांत ती मूर्ती विराजमान झाली. परावाचेतून भजन सुरु झाले. मारुती इतका तल्लीन झाला की टाळ्यांचे ऐवजी दोन्ही हाताच्या चुटक्या वाजवीत मधूर आवाजांत डोळे मिटून भजन सुरू झाले.

आ ऽऽ ! काय झाले ? सारी गडबडच. धावपळ सुरू झाली. सीतामाई पण घाबरल्या. कोणी पाणी आणले. कोणी डोक्यावर पाणी शिंपडले. कोणी बळेच रामाचा तोंडाचा आ ऽऽ बंद करायचा प्रयत्न केला छे ! आऽऽ तसाच.

शेवटी वशिष्ठांना बोलावले. वशिष्ठ मुनींनी लांबूनच सर्व प्रकार पाहिला. मनांत जाणायचे ते जाणले.

सेव्य सेवक भावच नष्ट झाला होता. सेव्य सेवक एकरूप झालेले दिव्यत्व वशिष्ठांच्या लक्षात आले. सेवकाच्या अधिन सेव्य झाला.

वशिष्ठांनी रामावर उपचार करण्याऐवजी मारुतीचे चुटकीचे हात धरले व नमस्कारासारखे जुळवले. चुटक्या थांबल्या. जांभई थांबली. म्हणजे काय झाले होते ? जांभई नंतर चुटकी वाजवायची ती चुटकी ऐकून जांभई आली व भजनांत चुटक्यावर चुटक्या वाजू लागल्याने जांभईचा आऽऽ तसाच राहिला. चुटकी थांबली तशी आ मिटला.

मारुतीच्या हृदयातलीच मूर्ती मंचकावर सुहास्य वदनाची पाहून मारुतीने जयजयकार केला. रामचंद्र महाराज की जय ! डोळे उघडले. माणसांची गर्दी पाहून हे सारे येथे कां जमले ? त्याला कळलेच नाही. त्याला वाटले सगळे दर्शनालाच आले. खरं दर्शन नतमस्तक हनुमंतालाच झाले.

दास्य भावात सर्वस्व अर्पण केले जाते. सहजी त्याग घडतो. दान व त्याग त्यांत फार फरक आहे.

सुनीती म्हणाली, 'दानाने अहंभाव वाढतो. बळीराजा दानशूर होता. पण गर्विष्ट झाला. दानाच्या पायांतच त्याला रसातळाला जावे लागले. त्यागाने भक्त आसक्तीतून मोकळा होतो.

मावशी म्हणाल्या,'अगदी बरोबर, भक्तीचे खरे शिखर गाठले की -

मी देवाचा, देवही माझा

विश्वचि कृष्ण दिसावे, निशिदिनी हरिभजनी रमावे ॥
मन हे सुंदर व्हावे, निशिदिनी हरि भजनी रमावे ॥ १ ॥

असेच होऊन जाते.

आता सांगा. ज्या गोष्टीचे तुम्हाला कुतुहल वाटतंय, कौतुक करतां ती गोष्ट इष्टच आहे की नाही ? सर्वत्र भगवंतभाव प्रगट झाला की घडेल ते काम दास्य भक्तीत मोडते. मग केर काढणे, पाणी भरून ठेवणे, कोणतेही काम असो, ती दास्य भक्तीच.

नीला म्हणाली, 'श्री संत ज्ञानेश्वर महाराज स्वत:ला निवृत्तीदास म्हणवीत होते. त्यांनी असे कोणते दास्य केले ?'

मावशी म्हणाल्या, 'निवृत्तीनाथ त्यांचे वडीलबंधू , आई वडलांच्या पश्चात दोन्ही

भूमिका त्यांनी पार पाडल्या.

ज्ञानेश्वरांची अध्यात्मिक बैठक पक्की झाली. ग्रंथरचना होऊ लागली. ज्ञानदेवाला अनुग्रह दिला. भाऊ या नात्याने नव्हे. आता पिता सद्गुरु या नात्याने निवृत्तीनाथांची ते सेवा करू लागले. आज्ञापालन ही सेवाच. त्यांच्या आज्ञेनेच व कृपाप्रसादाने ज्ञानेश्वर माऊलीने अवघ्या १५/१६ वर्षाचे वयाला भावार्थदीपिका रचली. प्रवचन रुपाने संस्कृत गीता अर्थ मराठीत काव्यबध्द केला. आज भावार्थदीपिका जगाचे पाठीवर ज्ञानेश्वरी या नावाने गाजली. हे फळ कशाचे ?' दास्य भक्तीचेच हे फळ.

सुमित्रा म्हणाली, ' संत शिरोमणी तुकाराम महाराज स्पष्टच सांगतात. 'तरीच जन्मा यावे। दास विठ्ठलाचे व्हावे। सर्वच संत भगवंताचे दास बनण्यांत आनंद मानतात.

मावशी म्हणाल्या,'आपल्या भारतात नावातच दास्य भक्तीचा भाव असलेले संत अनेक होऊन गेले. कबीरदास, तुळशीदास, पुरंदरदास. सर्वच संतांनी भगवंताचे दास्यत्व श्रेष्ठ मानले. स्वत: कष्टी, दीन, दु:खी न समजता भगवत् कार्य करण्याकरिताच हा देह मिळाला आहे असे जाणूनच सर्व आयुष्य ईश्वराच्या सेवेत घालवले.

दास मारुतीचा आदर्श डोळ्यापुढे ठेवून श्रीसमर्थ रामदास स्वामी झाले. एकाच वेळी दासही व स्वामीही ! कसे होता आले ? आधी ते गोसावी झाले. गो म्हणजे इंद्रिये व सावी म्हणजे स्वामी. इंद्रियांचे स्वामी म्हणजेच इंद्रिय निग्रह साधणारे झाले. इंद्रिये ताब्यांत राहिली की मनोजय साधतो. मन एकदा कां ताब्यांत आले की समर्थांच्या सारखे प्रखर वैराग्य साधते. समर्थांचे वैराग्य शुकाचार्यांचे सारखे.

पूर्वा म्हणाली,'मी श्लोक म्हणू कां ?

शुकासारिखे पूर्ण वैराग्य ज्याचे
वशिष्ठापरि ज्ञान योगेश्वराचे
कवि वाल्मिका सारिखा मान्य ऐसा
नमस्कार माझा सद्गुरू रामदासा ॥

मावशी म्हणाल्या, 'श्लोकाचा पूर्ण अर्थ ध्यानी आला की सर्वस्वी भगवंताचे व्हायचे म्हणजे काय ? ते कळते.

भगवंताचे कार्य सेवाभावाने केले की जगताचा स्वामी असणाऱ्या भगवंताची प्रचिती येऊ लागते. समर्थ स्पष्ट सांगतात -

कामनेनें फळ घडे। निःकाम भजने भगवंत जोडे।
फळभगवंत कोणीकडे। महदंतर ॥ १०। ७। २० ॥

चराचराला व्यापून असणारा भगवंत प्रचितीला यावा असे तर सर्वानाच वाटते पण साधना अपुरी पडते. एकच लक्षात ठेवावे

भावधरी गुरुपाई। मग काळ करी काई
तुझी चिंता सर्व त्यास। विघ्ने जाती विलयास

पंचवटीत मारुतीरायाकडून संदेश मिळाला. मी बघ कसा दास म्हणून उभा आहे. तसा दास हो. मग राम तुझाच ! झाले. नारायण रामदास झाला.

भक्ताकरिताच भगवंत सगुण रूप म्हणजे सद्गुरुरूप धारण करून येतो. त्यांची मनाने



द्रव्याने वाचेने जितकी सेवा करता येईल तितकी करावी की वृत्ती प्रेममय होईलच. होतेच. म्हणून या नवीन अभिनव नवरात्रापासून आपण काय शिकू या ?

काकू म्हणाल्या, 'दास्य भक्तीची सातवी माळ गळ्यात घालू या.

प्रियवंदा म्हणाली, 'खरंच ती माळ गळी उतरली तर आयुष्य कमालीचं सुखी होईल. ती माळ माझ्या गळ्यातल्या मोत्याच्या माळेसारखी शोभेची नाही. प्रत्यक्ष कामाला सुरुवात करायची. कसा छान सत्संग घडतोय. आपण आपल्या घरापासूनच दास्य भक्तीचा अभ्यास सुरू करु या. आज धडा छान मिळाला. आनंद वाटला.

मावशी म्हणाल्या,'दासबोधाची शिकवण खरंच कल्याणकारी आहे. आनंददायी आहे. त्या आनंदातच आरती करू या.

**। जय जय रघुवीर समर्थ ।**

卐 卐 卐

प्रकरण ९

## सख्य हवे कोणाशी ?

आज सगळ्यांच्याच हातात लहान मोठ्या पिशव्या होत्या. काकूंना काहीच कल्पना नव्हती. तरी त्यांचे मनात सकाळी विचार आला. आज अष्टमी आहे. देवीच्या देवळांत जाऊन ओटी भरायची ती आज मावशीनांच हळदकुंकू लावून ओटी भरावी. म्हणून त्यांनी खण बरोबर आणला. ' हे काय आहे हातात ?' असं कोणी विचारतील म्हणून त्यांनी ओच्यातूनच आणली.

मावशी बाहेर आल्या. एक स्टीलचा डबा व एक पत्र्याचा चौकोनी डबा घेऊनच आल्या. मध्यभागी डबे ठेवले.

गोंधळ न करता एकेकीने आणलेल्या पिशव्या योग्य त्या डब्यात रिकाम्या केल्या. स्टीलच्या डब्यात साखर साठली व दुसऱ्या डब्यांत तांदूळ साठले.

काकू नुसत्या बघतच राहिल्या. अगदी रहावेचना म्हणून कपाळावर हात मारून म्हणाल्या, 'अगोऽबाई मला माहित असते तर थोडी थोडकी कशाला ? चांगली १ किलो साखर व २ किलो तांदूळ आणून टाकले असते.

प्रियंवदा म्हणाली, 'काकू या टाकायच्या वस्तू नाहीत. आणि किलो दोन किलो प्रमाण पण नाही. पैसा गडगंज असणारी पोतंभर सुध्दा साखर देईल, त्यांत नवल कांहीच नाही. हे जे आम्ही साऱ्यांनी आणलयं व जमवलंय ......'

प्रियंवदेला थांबवीत सुमित्रा म्हणाली, 'काकू, मावशींनी आम्हाला एक व्रत करायला सांगितलं आहे. त्याला किंचित दान म्हणतात.

'म्हणजे ग काय ?' काकू म्हणाल्या, 'बोलताबोलता डबा भरला आणि म्हणे किंचित !

सुमित्रा म्हणाली, 'ऐका तर खरं ! मी सगळचं सांगते. चातुर्मासाच्या सुरुवातीपासूनच आम्ही हे व्रत सुरू केलं. रोज आपण चहा करतो ना ? ४/५ कप चहाकरिता जी साखर घालायची ती एका बशीत काढून घ्यायची. त्यातून मृगमुखीत येईल तेवढीच साखर उचलून एका डब्यांत रोज साठवायची. बाकीची चहाच्या पाण्याला उकळी फुटली की घालायची. त्याने चहा मुळीसुध्दा अगोड लागणार नाही. तस्संच तांदळाचं.!

सुशीला म्हणाली, ' मी सांगते तांदळांचं. काकू रोज आपण भाताकरिता तांदूळ घेतो ना ? मग तो भात दोन जणांचा असो वा दहा जणांचा असो. तांदूळ रोवळीत किंवा पातेल्यात घेतले की ते धुण्यापूर्वी पाच बोटांनी जितके तांदूळ उचलता येतील तेवढे उचलायचे व एका डब्यात साठवायचे. तेवढे तांदूळ कमी झाले म्हणून भात कमी पडत नाही. नकळत इकडे शिल्लक मात्र वाढत रहाते. याला म्हणतात किंचित दान. कोणाच्या डोळ्यात येत नाही. खर्चही वाढत नाही. पण दानाचं काम सहज होऊन जाते. प्रपंच्यातच हा असा परमार्थ साधता येतो.



काकू म्हणाल्या, 'हे सगळं मावशींना द्यायचं नं ? त्या दासबोध सांगतात. आपण हक्काने जागा वापरतो. जातांना सतरंज्या तरी आवरतो कां ?

शांता म्हणाली, 'हं काकू, तुम्ही अजून मावशींनी पुरतं ओळखलं नाहीत. त्यांच्याकरिता नाही हे गोळा केलं ! डबे बाहेर आणले त्यांत त्यांचा पण भाग घालूनच आणले. त्याही किंचित दान म्हणून बाराही महिने या दोन जिनसा काढीत असतात. 'आधी केले मग सांगितले.' असं आहे हे तंत्र. आम्ही चातुर्मासापासून सुरूवात केली आहे.

प्रियंवदा म्हणाली, 'आणि आज दुर्गाष्टमी ना ? देवीची ओटी भरायचा कार्यक्रम होणार आहे.

काकू म्हणाल्या, 'अगोऽबाई माझे ! थांब, दाखवतेच !

काकू उभ्या राहिल्या व ओच्यातून खण काढला. पुन्हा बसल्या. अग पोरींनो, तुम्हाला कळू नये म्हणून मी हा खण ओच्यातून आणला तुम्ही सगळ्या जमलांत की खरं तेच सांगते - तुम्हाला लाजवायचे म्हणून प्रथम मावशींना कुंकू लावून खण देणार होते. ओटी भरणार होते. दरवर्षी मी देवीची ओटी भरते. म्हटलं यंदा याच देवीची भरू. मावशी कुंकवाची कोयरी आणा. कुंकू लावते.

जवळच कोनाड्यात हळदकुंकवाचा दोन वाट्या होत्या. त्या पूर्वेने काकूंच्या हाती दिल्या.

काकूंनी डोळ्याला पदर लावला. डोळे पुसले. मावशींना खण देणार, तर मावशी लगेच म्हणाल्या,' राहू दे तो खण. चांगला जरीचा आहे. उत्तम आहे. आम्ही हे जिन्नस जिला देणार आहोत ना तिलाच हा खण देऊ या. मी भारी किमतीची वस्तू वापरायची नाही हे व्रत घेतलंय. मी घेणार व लगेच दुसऱ्याला देणार. त्यापेक्षा आज दुर्गेची ओटी तुम्हीच भरा. आणि हे पाणी का आलं डोळ्याला ?

काकू म्हणाल्या, 'अग तासभर लागला खण शोधायला. खरं ते सांगते. हा आज किंचित दानाचा विषय ऐकल्यावर माझ्या हीन बुध्दीची मला लाज वाटली. सगळ्यांना हिणवून उंची भारी किंमतीचा खण मी मावशींना दिला हा मोठेपणा घेण्याच्या उद्देशाने ओच्यातून खण आणला. मावशी रागावू नका. माझा भाव संमिश्र होता. ओटी भरायची हा भाव शुध्द होता, पण हलका सलका नको, सगळ्यांचे डोळे दिपवावेत, मोठेपणा मिरवावा या कुत्सित विचाराची झालर त्याला होती. माझं चुकलं हे माझं मला पटलं. मावशी, मी खरं सांगते. या दोघी तिघी किंचित दानाच बोलत होत्या. तेव्हा मी मधून मधून तुमच्याकडे पहात होते. मला तुमच्या निगर्वी प्रेमळ डोळ्यांनी पूर्ण न्हाऊ घातलेच. जय अंबे, माझ्या नेत्रांत अंजन घातलेस.'

काकूंनी मावशींचे दोन्ही पाय धरले. अश्रूंना मोकळी वाट करून दिली. क्षणभर सगळ्याच विस्मित झाल्या होत्या.

मावशींनी शांतपणे त्यांना खांद्याला धरून बसते केले. आपल्या रूमालाने त्यांचे डोळे पुसले, इतक्यात तान्ह्या बाळाला घेऊन शेवंता आली. तरूणच पोरसवदा होती ती. सावळीच होती, पण देखणी होती.

मावशींनी तिचे स्वागत केले. तिच्या हातातील बाळाला घेतले. तिला बसायला

सांगितले. तिच्या करता मध्यभागी आसन ठेवले होते.

शेवंता बसली. बाळाला तिच्याजवळ दिले.

मावशी म्हणाल्या,' काकू, तुम्हीच आजच्या मानकरी. तुम्ही लावा तिला हळदकुंकू आणि ही प्रेमाची भेट द्या.

आता तर काकूंना गहिवरून आले. मावशींचा अलिप्तपणा पूर्णपणे जाणवला. सर्वांनीच आग्रह केला.

काकूंनी तिचे पाय धुतले. आपल्या नेसूच्या ओच्यांनी पुसले. पाद्यपूजा केली. हळदकुंकू लावले. प्रियाने गुलाबाचे फूल आणले होते, ते तिला दिले. मावशींनी सुचवले, तो खण द्या व ओटी भरा. तिच्या हाती खण दिल्यावर तिचे गाल वर आले खूपच भारी, जरीच्या काठाचा खण. तिला भारी आवडला.

मावशी म्हणाल्या,'आता या भेटीचा स्वीकार कर. तू नुसता हात लाव, डबे जातील तुझ्या घरी.' काकूंनी तिच्यासह सर्वांना नमस्कार केला.

प्रिया म्हणालीच, ' ग्रंथराज दासबोध की जय !'

मावशी म्हणाल्या,'शेवंता, तू ओली बाळंतीण. बसण्याचा ताण घेऊ नकोस. तू परतलीस तरी चालेल.'

शेवंता घरी गेली. रिकामे डबे परतही आले.

काकू म्हणाल्या, 'अगोऽबाई, हे नेले कोणी ? आणले कोणी ? यंत्रच आहात कां ग तुम्ही दोघं !

मावशी म्हणाल्या, ' काकू समर्थ म्हणतात, या देहासारखे यंत्र नाही. आपले सगळ्यांचेच देहं यंत्रे आहेत. त्याला सांभाळणारा खूपच प्रेमळ आहे. तो रात्रंदिवस भक्ताचे व अभक्ताचे पण श्वास सांभाळतो. त्या दिव्य शक्तीला सदैव जाणायचे. त्याच्यासारखे आपले वर्तन ठेवायचे. समर्थ म्हणतात,

> आपण तैसेंचि वर्तावे । आपणासि तेचि आवडावे ।
> मनासारिखे होता स्वभावें । सख्य घडे नेमस्त ॥ ४ । ८ । ५ ॥

त्याच्या शक्तीचेच स्मरण म्हणून नवरात्र. त्या भगवंताला जे आवडते तेच त्याला द्यायचे. मनापासून घ्यायचे. समर्पण बुध्दीने द्यायचे, म्हणजे काय गंमत होते ?

सर्वत्र भगवंत पहाण्याची दृष्टी येते. भगवंतच भक्ताच्या सेवेसाठी मागेपुढे सदैव उभा असतो. म्हणजेच सेवेची संधी देतो. भक्त भगवंत सख्य जमते.

नीला म्हणाली, 'मावशी, आत्ता आपण शेवंताच्या जागी देवीच कल्पून तिची पूजा केली. ओटी भरली. ती वैयक्तिक झाली की सामुदायिक.'

मावशी म्हणाल्या,'छान विचारलेस ! एकाच व्यक्तीने कर्म करुन जो आनंद मिळतो त्यापेक्षा मोठा आनंद अलिप्तपणाचा असतो. अलिप्त राहून केलेल्या कर्मात निर्भेळ शुध्द समाधान लाभते.

समजा आज काकू हजर नसत्या तर शेवंताची पूजा तुम्ही कोणीही करू शकला असतात. पण तसे तुम्ही केले नसते. मलाच पुढाकार दिला असतात तर माझा आनंद द्विगुणित व्हायच्या ऐवजी कमी झाला असता. न कळत अहंकाराची लकेरही उठली असती.



अलिप्तपणांतल्या आनंदाला खो बसला असता. देही असून विदेही असे कर्म साधल्यासाठीच असे सामुदायिक प्रसंग घडवून आणायचे. यातूनच सख्य भक्ती घडते.

काकू म्हणाल्या,'खरं आहे बाई तुझं म्हणणं. मघाशी मी तुझ्याकडे पाहिलं न? तर मला अंतरंगात दुर्गाच माझ्याकडे पहात आहे असं वाटलं ग ! मला आज नवी दृष्टी दिलीस. '

मावशी म्हणाल्या, 'काकू हा आनंदाचा क्षण टिपलांत ना ? तो हिऱ्या माणकापेक्षाही जपून ठेवा. किती जपाल. आपल्या प्राणाला आपण जपतो ना ? हे पहा समर्थ काय सांगतात,

> देव म्हणिजे आपुला प्राण । प्राणासी न करावे निर्वाण
> परम प्रीतीचें लक्षण । तें हें ऐसें असे ॥ ४ । ८ । १० ॥

प्रिया, तुला सर्वांत जास्त प्रिय काय ? असं कोणी विचारलं तर काय सांगशील ?

प्रियंवदा म्हणाली, 'जो पर्यंत मी परदेशांत होते, अमेरिकेत होते, तोपर्यंत मम्मी डॅडीच मला प्रिय वाटत. हवी ती खेळणी, हवा तो खाऊ, हवी ती चैन पुरवणारे माझे देव तेच होते. मी पाच वर्षाची असताना भारतात आले. अमेरिकेतील वातावरण येथे नव्हते. मी वर्षभर रडून खूप त्रास दिला. तिकडेच घरी चल म्हणत होते.

हळूहळू रुळल्यावर माझ्या मैत्रिणी, कपडे, दागिने मला प्रिय वाटू लागले. दागिने कपडे यांना प्राणापेक्षाही अधिक जपू लागले. शोकेस सजवू लागले. त्याला कोणी हात लावलेलाही मला खपत नसे.

थोडी मोठी झाले. मराठी शिकले. गोष्टीची पुस्तके वाचू लागले. आजी बरोबर देवळांत जाऊ लागले. शंकराच्या नी मारूतीच्या देवळापेक्षा रामाचे कृष्णाचे देऊळ म्हणजे मूर्तीही आवडू लागल्या. प्राणापेक्षा प्रिय वाटू लागल्या.

पण प्राणच प्रिय असतो हे त्या माकडीणीच्या गोष्टीतून ध्यानांत आले. पण एकदा एक गोष्ट वाचली. मोठी नदी अरुंद पूल. समोरासमोरून दोन बकऱ्या आल्या. बेंऽबेंऽऽ दोघी म्हणाल्या. एक बकरी सावधपणे पाय दुमडून खाली बसली. दुसरी तिला धक्का न लावता पलीकडे गेली. बसलेली बकरी हळूच उठली व ती पण पूल पार करून गेली. दोघींनी मागे बघितले बें ऽ बें ऽऽ आनंदल्या. आपापल्या मार्गाला लागल्या. एकमेकींचा प्राण वाचवला. सामंजस्याने वागल्या. चातुर्याने संकटातून बाहेर पडल्या. प्राण प्रिय, पण प्राण घालतो कोण ? त्याला सांभाळतो कोण ? प्राण म्हणजे शरीरांत काय असते ? कुतुहल वाढलं. कांही कळतच नव्हतं. ते तुमच्याकडून दासबोधातून कळलं, म्हणून आता तुम्हीच प्रिय वाटू लागलांत. जीवनांत खरं काय प्रिय वाटायला हवे ?

सगळ्याच हसल्या.

मावशी पण हसूनच म्हणाल्या, 'अर्ध्या टप्प्यावर आलो आपण. माया निर्मित वस्तूवरचे प्रेम, प्रीती कशी असते ?

> आपुल्या मनासारिखें न घडे । तेंणें गुणें निष्ठा मोडे ।
> तरी गोष्टी आपणाकडे । सहजचि आली ॥ ४ । ८ । १५ ॥

ज्या व्यक्तीवर आपण प्रेम करतो, ज्या सगुणाला निष्ठेने मानतो, ज्या भगवंताला

श्रध्देने पुजतो, त्याच्याबद्दलचा प्रेमाचा भाव एका क्षणांत नष्ट होणे शक्य आहे ? कशामुळे ?

मनाच्या कह्यात जीव गुंतला, मनासारखे घडले नाही की आईवडीलच काय, मावशी काय, देव सुध्दां आवडत नाहीसा होतो. अर्थातच भगवंताकडून येणारा प्रेमाचा प्रवाह थांबतो. भगवंताची आपल्यावर होणारी कृपा खोटीच असे वाटू लागते. हा दोष आपल्या विचारांचा आहे. हे लक्षांत ठेवावे. तेच नेमके लक्षांत येत नाही. नश्वरासारखे प्रेम नश्वरच असणार.

मालती म्हणाली,'मावशी तसं होऊ नये म्हणून आधी निष्ठा पक्की राहील अशीच साधना करायला हवी. ती आम्हाला सांगा. म्हणजे धरसोड होणार नाही.

मावशी म्हणाल्या,'अग समर्थांचीच ओवी पहा -

मेघ चातकावरी वोळेना। तरी चातक पालटेना।
चंद्र वेळेसी उगवेना। तऱ्ही चकोर अनन्य ॥ ४ । ८ । १६ ॥

मेघाच्या पडणाऱ्या पाण्यावरच चातकाची तहान भागते. मेघवृष्टी झाली नाही तर चातक नदीतले, तलावातले, झऱ्याचे पाणी पीत नाही. इतकेच नव्हे तर त्याचे मेघावरील प्रेम कधीच कमी होत नाही. पाऊस पडण्याचीच वाट पहातो व तेच पाणी पितो. याला पक्की निष्ठा म्हणतात.

तसाच चकोर चांदण्याचा आस्वाद घेतो. ढग आड आले. चंद्र झाकळला. पावसाळ्यात चंद्रप्रकाश पडलाच नाही तर चकोर उपाशी राहील; पण चंद्रावरचे प्रेम कमी होणार नाही. तस्सेच भगवंतावरील प्रेम कमी होता उपयोगी नाही. म्हणून सगुणावर प्रेम करावे. सगुण म्हणजे फक्त देवांच्या मूर्ती किंवा अवतार नव्हे. तुम्ही आम्ही सर्व चराचर सगुणच.

भगवंत देहादेहात कसा नटला आहे. वस्तूमात्रांत कसा भरला आहे हे पाहावे. आपले आकुंचित मन विश्वमन करावे.

सुमित्रा म्हणाली,' मावशी, मघाशी शेवंताला गुलाबाचे फूल दिले ना, तेव्हा तिच्या गालावर गुलाब फुलले. लगेच अंबाड्यावर तिने फूल खोचले. आणि खण हातात आला न तेव्हा आमचं लक्ष होतं तिकडे. तिने तो खण छातीलाच लपेटला. खणाचा पोत पाहिला. ओठ विलग झाले. गाल उंचावले. आनंद ओसंडून निघत होता. तिने प्रेमभराने काकूंच्याकडे पाहिले.'

सुशीला म्हणाली,' मी काकूंच्याकडे पहात होते. त्यांच्या डोळ्यात अश्रू साठले होते. ओटी भरतांना बांध फुटलाच व दोन टपोरे थेंब श्रीफळांवर पडलेच. त्यांना वाईट वाटत होतं कां ? नाही. मोठेपणाचा मान मिळाला हा आनंद त्यांत होता.

मावशींच्या ठिकाणी त्यांना देवीचे दर्शन घडल्याचा आनंद होता. शेवंताची ओटी ही देवीचीच ओटी भरत आहे. हा आनंद ओसंडत होता. मधुरा भक्तीचा आनंद. सख्य भक्तीचा आनंद, परम प्रेमाचा आनंद. हृदयांत राहूच शकला नाही. अश्रूंना पूर आलाच. त्यांनाच काय आम्हा सर्वांनाच वेगळ्याच वातावरणांत गेल्याचे भासले.

शेवंताला आपण उपयुक्त वस्तू दिल्या हा विचार कोठल्या कोठेच गेला. ती जागा



आनंदाने घेतली, परम भक्तीने शेवंताच्या रूपाने भगवंताशी सख्य जोडले, हाच तो आनंद.

सुनीता म्हणाली,'पण मावशी, ही स्थिती कायम रहायला हवी ना?

पाटी कोरी नको रहायला, म्हणून काय करायचे ?

मावशी म्हणाल्या,'समर्थ सांगतात तसेच वागायचे.

देवाचे इच्छेने वर्तावे । देव करील ते मानावें ।
मग सहजचि स्वभावें । कृपाळु देव ॥ ४ । ८ । २३ ॥

एकदा का मनाला पटलं की, कर्ता करविता वासुदेव, बस्स

झालंच आपलं काम. भगवंत परम दयाळू , कृपेचा सागर, प्रेमाचा आगर, फक्त त्याला हवा शुध्द भाव शुध्द भक्ती.

पुन्हा गंमत अशी प्रपंचात राहूनच हे सारे करायचे. प्रपंच्यातली प्रत्येक कृती सख्य भक्तीची व्हावी.

देव प्रीती राखों जाणे । देवासी करावें साजणें ।
जिवलगें आवघीं पिसुणे । कामा न येती ॥ ४ । ८ । २९ ॥

नातलगांचा भरवसा न धरता देवावरचे शुध्द प्रेम वाढीस लावावे. याचा अर्थ नातेवाईकाशी तुसडेपणाने वागावे असे नव्हे. व्यवहार चोख ठेवावा. पण मनांत पक्की खूणगांठ बांधावी.

सख्य देवाचें तुटेना । प्रीती देवाची विटेना ।
देव कदा पालटेना । शरणागतांसी ॥ ४ । ८ । ३० ॥

देवाबद्दलचा अनन्यभाव दिवसानुदिवस वाढीस लागला की कळणारच -

सख्य हवे कोणाशी ? हेच जाण तू !
सखा हो तू देवाचा, देवचि की तू
देवचि की तू ! देवचि की तू !!

मग जीवन आनंदाचा डोहच. आनंदानेच आरती करू या. आनंदाने प्रसाद घेऊ या.

**। जय जय रघुवीर समर्थ ।**

卐 卐 卐

प्रकरण १०

## काय आणि कोणाला ?

सगळ्या उल्हसित मनाने जमल्या. आज नवीन काय बरं सांगतील ? सगळ्यांना मनापासून हेच वाटत होतं.

कालच्या किंचित दानाचा सद्उपयोग हेच सर्वांच्या आनंदाचे मूळ होते. काकूंना खट्टू वाटत होतं.

'मला यातली कांहीच कल्पना नव्हती. मी वाटीभर तरी साखर नसती कां आणली ? ' त्या तसं नीलाजवळ म्हणाल्या पण, त्यांचा खट्टू चेहरा मावशींच्या लक्षात आला, त्या बसल्या बरोबर म्हणाल्या, 'ज्ञानदेवे रचिला पाया . . . . आणि शेवटी तुका झालासे कळस !

तस्सच काल झालं. आपल्या अर्पण कार्याला काकूंनी घवघवीत साथ दिली. ही भगवंताचीच कृपा हं, त्याच्या कृपेचा प्रत्यय आला की कसा आनंद होतो हे आपले चेहेरेच सांगत आहेत.

सावित्री म्हणाली, 'काकूंची घवघवीत साथ म्हणजे ? माझ्या नाही लक्षांत आलं. मोघमच बोललांत.'

मावशी म्हणाल्या,'आपण देवीचे नवरात्र नव्या पद्धतीने साजरे केले, दासबोधातला चौथा नवविधा भक्तीचा दशक अभ्यासला. हे तरी सगळ्यांचे लक्षात आले ना ? काकूंनी आपल्या कार्याला कळसासारखा हातभार लावला. ओटीतला खण उत्तम आणला होता. सगळ्यांनाच आनंद झाला. शेवंता म्हणजे देवीच ना ? देवीचे सगुण रूप प्रसन्न झालेले आपण पाहिलेच. तेच प्रतिबिंब आपल्या मनाचा आरसा स्वच्छ असल्यामुळे आत्तापर्यंत आपल्या चेहऱ्यावर टिकले.

मी कापड काढून ठेवले होते. तिच्या निळ्या साडीला शोभेल असे पण साधेच होते. काकूंचा खण उत्तम भारी होता. शेवंता खण पाहून हरखली. काकूंनी पाद्यपूजा करून ओटी भरली. मला अलिप्त राहून आनंद भोगता आला. समर्पित भावनेने कार्य केले म्हणूनच हा निर्भेळ आनंद सर्वांना मिळाला.

प्रपंच्यात राहूनच परमार्थ साधायचा कसा ? हे अल्प स्वल्प कां होईना, पण प्रचितीला आले ना ?

आपण का केलं ? अगदी सूक्ष्मरीत्या विचार करू या. तांदूळ व साखर देऊन शेवंताची ओटी भरली. हे उत्तर असेल तर हा आनंद टिकलाच नसता. नव्हे आनंद झालाच नसता. अर्पण क्रियेत 'मी' चा अडसर आला की काम फसलेच.

आपण 'मी'ला बाजूला केले की 'मी पणाला' ?

सुनीता म्हणाली, 'मी' म्हणजे देह नव्हे. या विचाराला कायमचाच राम राम ठोकला



आहे. आता मी पणाच्या सूक्ष्म रूपांत तो आहेच. त्या मीपणाला हलकेच बाजूला सारायचा प्रयत्न केला. एकच कार्य पण अनेकांनी मिळून पार केले. त्यामुळे कोणालाच वरचढपणा वा मोठेपणा वाटला नाही. पुढाकारं काकूंना दिला. त्यामुळे अलिप्तता साधली. जे प्रपंचात नेहमी जड जाते ते सहज साधले.'

मावशी म्हणाल्या, 'आता काकूंच्या दृष्टिकोनातून पहा. बाकीच्या कांही नवल विशेष करणार नाहीत. असे समजून त्या खण देण्याचे काम करणार होत्या. सगळ्यांचे समर्पणाचे कार्य पाहून त्यांना त्यांच्या खोट्या मोठेपणाचा पडताळा आला. तो त्यांनी बोलून पण दाखवला. त्यामुळे वाढणारा अहंपणा किंचित उतरला. समर्पण कार्याचे मोठेपण त्यांना दिल्याने ती अहंपणाची जागा आनंदाने घेतली.

त्यांच्या खणाचा मला अव्हेर करता आला नसता. 'कोणाचे मन दुखवायचे नाही' या माझ्या व्रतात अव्हेरल्याने खंड पडला असता. खण स्वीकारून कोणाला तरी देतांना मला आनंद वाटलाच नसता. सगळंच कसं छान जमलं. याचं कारण एकच. आपण आता भक्तीचा शुद्ध सरळ मार्ग अवलंबितो आहोत.

बाह्य अवडंबरापेक्षा मन स्वच्छ नी शुद्ध कशाने होते ? हे आता आपल्या ध्यानांत आले. द्वैत न मोडता अद्वैतात हळूच शिरता आले. कशामुळे ? बुध्दीला सतेजता प्राप्त व्हावी हा प्रयत्न आहे म्हणूनच. रोज सत्संग साधतो तो स्वाध्यायच. रोजचा स्वाध्याय म्हणजे बुध्दीला स्नानच.

आपण स्नान रोजच करतो. पण ८/१० दिवसांनी न्हातो. केस स्वच्छ करून डोक्यावरून स्नान करतो. न्हाण्याने अंग सतेज होते. तशीच बुध्दी पण सतेज होते. केव्हा ? ऐकलेल्या स्वाध्यायाच्या परिणाम म्हणून बोलणे, आपले विचार प्रगट करणे, प्रवचन करणे, कीर्तन करणे हे न्हाणेच, कोणाचे ? बुध्दीचे. लेखन करणे वा काव्य रचणे हे बुध्दीचे स्नानच.

बुध्दी सतेज झाली कीं, तिच्या विरोधकांचा पराभव आपोआप होतो. ब्रम्हदेवाने या विरोधी ५ प्रवृत्ती मुद्दामच निर्माण करून ठेवल्या आहेत. त्यांची नावे काय बरं ?

शांता म्हणाली, 'मी सांगते. तम मोह महामोह तमिस्र अंधतामिस्र. यांच्या कचाट्यात बुध्दी सापडली की ती मलीन होते. नास्तिकतेकडे वळते. पांच अज्ञान प्रवृत्तींच्या विळख्यात सापडली नाही की ती अलिप्त राहू शकते. ती बुध्दी आस्तिक बनते.

मावशी म्हणाल्या,'आस्तिक बुध्दीचाच माणूस चिंतनशील असतो. चिंतनशीलता समाधान देते. समर्थ म्हणतात, 'असा निरंतर समाधानी असणाराच उत्कृष्ट भक्त होऊ शकतो.

भक्त म्हणिजे विभक्त नव्हे ! आणी विभक्त म्हणिजे भक्त नव्हे !
विचारेंविण कांहींच नव्हे । समाधान ॥ ४ । ९ । ६ ॥

आपण जो दासबोध अभ्यासतो तो उत्तम भक्त होण्यासाठीच. जो भगवंत व आपण वेगळे आहोत असे समजतो त्याला भक्त कसे म्हणावे ?

काल आपणा सर्वात ऐक्यभाव होता. म्हणून एकीने कार्य घडले. शेवंतात भगवत्‌भाव ठेवून एकता साधली. प्रपंच नेटका तो हाच. सार काय असार काय कळावे, नित्य अनित्य विचाराने समजून घ्यावे. शाश्वत अशाश्वत बुध्दीला पटावे. तरच आत्मा अनात्मा चित्तात ठसेल.

यासाठी विवेक क्षणभरापुरता असून चालत नाही. जो अखंड विवेकी त्याचा प्रपंचच काय परमार्थ सुध्दा नेटकाच की ! समर्थांचे वचन काय सांगते -

तत्वे तत्व जेव्हा सरे । तेव्हा आपण कैचा उरे ।
आत्मनिवेदन येणे प्रकारे । सहजचि जालें ॥ ४ । ९ । ९ ॥

सुशीला म्हणाली, 'आत्मनिवेदन शब्द ऐकला की स्वत:ला अर्पण करायचे. याचा बाऊ वाटतो. प्रपंच सोडावा लागेल हेच प्रथम मनांत येते. इतके त्याला घट्ट धरून ठेवलंय आपण.

मावशी म्हणाल्या, 'प्रपंचाला देहात्म बुध्दीने घट्ट धरलंय. आत्मनिवेदन बाऊ वाटण्याचे कारण नाही.

तत्वांचा अभ्यास केला की देहात्मबुध्दीला 'मी' खऱ्या 'मी' पुढे टिकत नाही. खोट्या 'मी' ला नाहीसा करणे हेच आत्मनिवेदन.

त्याला शस्त्राने तोडायला नको. देह व मन यालाच आपण 'मी' म्हणत आलो. देह ज्याच्या शक्तीने व सत्तेने चालतो, कार्य करतो त्या आत्म्याला विसरतो. त्या परब्रम्ह अंशाला विसरतो. म्हणून आत्मनिवेदनाचा बाऊ वाटतो. आत्मा हा खरा 'मी'. तो अनेक रुपे घेऊन नटतो. नाना कार्ये सहज करतो.

उदाहरणाकरिता सांगते. काकूंना वाटले, 'मावशीनाच उत्तम खण देईन. इतर भगिनी असं कांही करणार नाहीत. ते मी सर्वासमोर करीन. पण 'मीपणाचा' स्पर्श होऊ न देता येथील किंचित दान पाहिल्यावर देहात्मबुध्दीतला मी गळला.

गळला म्हणजे काय झाले ? मनोमनच आपले करणे योग्य की अयोग्य हे त्यांना समजले. म्हणून आनंद घेता आला. आपला खण आपण देण्याने जो आनंद वाटला तो दुसऱ्या कोणी देऊन वाटला नसता. म्हणून त्यांनाच ओटी भरायला सांगितली.

प्रियंवदा म्हणाली, ' त्यांचा खण मी दिल्याने आनंद का नसता वाटला ?'

मावशी म्हणाल्या, 'देहात्मबुध्दी एकाएकी गळेल कां ? ती क्षीण होणे म्हणजेच आसक्ती कमी होणे. त्यागाची वृत्ती वाढणे. त्यागामुळे स्वार्थबुध्दी नष्ट होते. सर्वात मिळून मिसळून वागता येते. तुम्हाला एक गंमत सांगते -

माझ्या सासरी आमच्या शेजारी एक दांपत्य रहात होते. साठे त्यांचे आडनांव. कमलाताई साठीच्या घरातल्या. साठेकाका असतील सत्तरीचे आसपास. एक मुलगा पुण्याला व दुसरा पुण्याजवळ खेडेगांवात शेती सांभाळून होता.

साठेकाकांकडे पाहुणे आले - २ दिवस होते. ते पुण्याला जाणार होते. काका कमलाताईना म्हणाले, 'केशव सारखा दोघांना या म्हणून बोलावतोय. मुलांचा अभ्यास



नको बुडायला. म्हणून वर्ग चालू म्हणून मी जात नाही. पण गोविंदरावांची अनायासे सोबत आहे. तू जातेस का पुण्याला ?'

लहानशा पिशवीत दोन पातळे घालून कमलाताई तयार झाल्या. गाडी देहूरोडच्या आसपास आली.

'आत्तां पुणं येईल नाही कां ?' कमलाताईनी विचारले. ठीकठाक ९ वार साडी नेसलेल्या कमलाताई. केसांचा अंबाडा साधा सुधाच घातलेला. अंगभर पदर त्यामुळे अंगात चोळी की ब्लाऊज कळायला मार्गच नाही. मंगळसूत्र सुध्दा झाकलेलं. गाडीत मुखाने रामनाम चालू होते.

गोविंदराव 'हो' म्हणाले. तेव्हा कमलताईनी लहानशी पिशवी हातात घेऊन जरा 'पाय धुवून येते' म्हणाल्या व उठल्या.

परतल्या तेव्हा साराच नूर बदललेला. अवघ्या ५ मिनीटांत. गोल साडी डाव्या खाद्यांवर पदर खालपर्यंत आलेला. पिनने पदर टाचला होता. नाहीतर पडायचाच खाली. अंबाड्याची जागा शेपट्याने घेतली. गोविंदराव बघतच राहिले.

काल वाटीत २/४ गुळाचे खडे व तांब्याभर पाणी देऊन वाकून नमस्कार करणाऱ्या याच कां कमलवहिनी ? हा बदल ? त्यांनी कुतुहलानेच विचारले.

कमलाताई हाताआडून पदर पुढ्यांत घेऊन बाकावर बसल्या व म्हणाल्या, 'देश तसा वेश. जेथे जाते तेथे तेथल्या प्रमाणे वागता आलं पाहिजे. म्हणजे मने दुखावत नाहीत. या वयांत पण हे शिकायला यांनीच लावले. पुणे आले.

घरी पोहोचल्यावर १० मिनीटांतच कमलताई चहाचा ट्रे घेऊन बाहेर आल्या. हॉलमध्ये सोफासेट, २ खुर्च्या, टी पॉय. सूनबाई पंजाबी कपड्यातील पाण्याचा ग्लास घेऊन आली.

ट्रे मध्ये चहाचे दोन कप. डिशमधे २/३ तऱ्हेची बिस्कीटे, कमलाताई खुर्चीवर बसल्या. कप पुढे करून घ्या म्हणाल्या व आपणही बिस्किटाचा आस्वाद घेऊ लागल्या. गोविंदराव थक्कच झाले. गेल्या २ दिवसांत स्वयंपाकघर सोडून बाहेर पण आल्या नव्हत्या.

पुढे दोन दिवसांनी काही काम काढून गोविंदराव पुन्हा तेथे गेले. सुनेने सांगितले, 'त्या शेतीच्या गावाला गेल्या आहेत. गोविंदरावांना कुतुहल म्हणून शेतीच्या गावाला जावेसे वाटले. तसे ते गेलेही. चांगली १० एकर जमीन होती. कापूस वेचणीचे काम चालू होते. कमलताईची चौकशी केली.

एक छोटेसे खोपटे बांधलेले. अंगण ऐसपैस. अंगणात चटई टाकून बाई कमलाताईना बोलवायला गेली. शेजारीच गोठा होता. गोठ्यांत २/४ गाई होत्या. त्यांच्याकडे पहात गोविंदराव बसलेले.

समोर कमलताई येऊन उभ्या राहिल्या. पण त्यांनी ओळखलेच नाही.

मराठमोळा पध्दतीचे विटके जाडे लुगडे. गुडघ्यावर येईल असे ओचे घेऊन दुकाष्टा गच खोवलेला. पदर घट्ट बांधलेला. साधाच अंबाडा पण शेपूट मोकळेच सोडलेले. केसावर

कापूस लागलेला.

'कापूस वेचत होतात की काय ? त्यांनी वर बघून विचारलेच.

हसतच कमलाताई म्हणाल्या , 'होय, मला आहे सवय.' त्यांनी जमिनीवरच बैठक ठोकली. तुरीच्या शेंगा खायला चटईवर टाकल्या. दोन चार सोलून गोविंदरावांचे हातात दाणे दिले. 'थोड्या शेंगा खा. मी धारोष्ण दूध देते. आमची गंगा गरीब आहे. केव्हाही कासेला हात घाला. धारभर दूध देणारच.'

असे म्हणत त्या भांडे घेऊन गेल्या देखील. गाईची पाठ थोपटली. पोळी खाजवली. थोडा कडबा पुढ्यात टाकला. धार काढली. फेसाळ धारोष्ण दूध घेऊन आल्या.

अरे वा 'ऽ गोविंदराव बघतच राहिले. देवीची तीन रूपे. महासरस्वती, महालक्ष्मी, महांकाली. तशी ही तीनही रूपे कमलताईंची विलोभनीय वाटली.

दुधाचा पेला गोविंदरावांच्या हातात देत त्या म्हणाल्या, 'सूनबाईला आजच सकाळी माहेरी पाठवलीय. रहा म्हटलं १५ दिवस. तिने तरी विश्रांती नको का घ्यायला. मी बघीन येथले सारं काम, हेही काम आवडते मला. घरी असले काय , पुण्यात असले काय, नी शेतावर असले काय ? त्या भगवंताला न विसरता त्याचेच काम करायचे.' गोविंदराव आनंदित झाले.

तात्पर्य काय ? ज्या प्रभूपासून आपण सुटे झाले त्याचे गुणांना स्मरून वागता आले पाहिजे. त्याचे पडेल ते कार्य उत्कट प्रेमाने, भक्तीने करून शुद्ध भाव समर्पित करावा. म्हणजे जमलीच आत्मनिवेदन भक्ती, ईश्वराच्या इच्छेत आपली इच्छा मिळवायची.'

मालती म्हणाली, 'आत्मनिवेदनाकरिता अनन्यभाव हवा ना ? ही अनन्यता कशी साधावी ?

मावशी म्हणाल्या,'मघाशी कमलताईंचे उदाहरण दिले ना ? तसे ईश्वराची इच्छा समजून प्रामाणिकपणे कर्म केले की आनंदच आनंद. ही दृष्टी गुरुकृपेने येते, वेश कोणताही असला तरी रूप बदलते कां ? तसे स्वस्वरूपाचे एकदा ज्ञान झाले की तेच रूप सर्वत्र दिसते. तसे पहाण्याचाच सतत अभ्यास सुरू होतो. मग मनाला पटते.

तूच माय तूच बाप तूच बंधू तू।
तूच सखा तूच गुरू तूच विश्व तू।
तूच गुरू माय बनुनी जगी येशी तू।
तूच अखिल जगत मी ही तूच तूच तू।

आत्म निवेदन भक्तीने हेच साधायचे. समर्थ म्हणतातच -

आत्मा निर्गुण निरंजन। तयासी असावें अनन्य।
अनन्य म्हणिजे नाही अन्य। आपण कैचा तेथे ॥ ४ । ९ । १७ ॥
आत्मा म्हणिजे तो अद्वैत। जेथे नाही द्वैताद्वैत।
तेथे मी पणाचा हेत। उरेल कैंचा ॥ ४ । ९ । १८ ॥

मालती म्हणाली, 'मावशी, व्यवहारात मी तू पणा म्हणजे द्वैत असतेच असते.



वेगळेपणाशिवाय मी तू असतच नाही. जेथे मी तू आहे तेथे अनन्यता कशी येईल ? असे मला म्हणायचं आहे.' मावशी म्हणाल्या, ' मी देह आहे ' हे म्हणणे खरे की खोटे ?

मालती म्हणाली, ' खरा मी म्हणजे आत्मा. तो देह कसा असू शकेल. देहाच्या आधाराने तोच देहाकडून काम करवून घ्यायला देहात प्रवेश करतो. घर जावयासारखा तेथेच माझे घर म्हणून रहातो. देह नाश पावतो. पण आत्मा नाश पावत नाही.

मावशी म्हणाल्या, ' म्हणजेच मी देह आहे हा भ्रम. तो दूर झाला की शांश्वत असणाऱ्या परमात्म्याशी ऐक्य साधते.

आपण मिथ्या साचा देव। देव भक्त अनन्य भाव।
या वचनाचा अभिप्राव। अनुभवी जाणती ॥ ४ । ९ । २२ ॥

प्रपंचात राहूनच सगुणभक्ती साधावी. अनेकांची अनेक रूपे नांवे, पण भाव एकच भक्तीचाच -

रामकृष्ण रामकृष्ण रामकृष्ण हरि
म्हणत म्हणत नाचतात प्रेमे वारकरी ॥१ ॥
अगडबंब अगडबंब डमरूचा बोल
शिवगण नाचतात सदाशिवास डोल ॥ २ ॥
दिगंबरा दिगंबरा दिगंबरा गुरूवरा
योगी मुनी सिद्ध गाती नित्य योगेश्वरा ॥ ३ ॥
सीताराम सीताराम सीताराम राम
भक्त जन ध्याती गाती हृदयी आत्माराम ॥ ४ ॥
राम गाऊ कृष्ण ध्याऊ नमू शिवदत्त
सद्गुरू पदांत सारे आशा अवलोकीत ॥ ५ ॥

सुमित्रा म्हणाली, ' अशी दृष्टी व्यापक झाली की पंथ वर्ण भेद रहाणारच नाहीत. द्वैत नाही. भेद नाही. मग अनन्यता साधेल का ?

मावशी म्हणाल्या, ' निश्चित साधेल, म्हणून अर्पण काय करायचे ?'

काकू म्हणाल्या, ' तांदूळ, कापड, साखर नाही. मी पणा अर्पण करायचा. निःसंकोचपणे अर्पण करायचा. शुद्ध भावाने अर्पण.

मावशी म्हणाल्या,'कोणाला ?'

काकू म्हणाल्या, 'लौकिक दृष्ट्या शेवंताला जरी अर्पण केले तरी मनांत भाव भगवंताला, दिव्यशक्तीला अर्पण केले हाच असावा.'

मावशींनी टाळ्या वाजवल्या. सर्वांनीच साथ दिली. मावशी म्हणाल्या,'आता आपली साधकांची संख्या एकाने वाढली हं ! बघा नव्या पध्दतीच्या नवरात्राचे फळ अंबामातेने हातोहात दिले हं ! माझं माहेर दासबोध आहेच तसं चांगलं. नव्यानव्या प्रेरणा मिळतात. काय नाही दासबोधात ? आपण उतू या नको, मातू या नको - घेतला वसा टाकू या नको. की कसं आयुष्य सार्थकी लागेल.

आता पुढच्या कामाची मुहुर्तमेढ उद्याच रोवायची. काकू म्हणाल्या, 'बुध्दी दाता नारायणू ! उदंड आयुष्य दे बाबा मावशींना. दहा साधकांचे शंभर झालेले पाहीन.

कडकडून टाळ्या वाजल्या. 'तुमच्या तोंडात साखर पडो.' प्रियंवदा म्हणाली, सगळ्या हसल्या.

मावशींनी निरांजन लावले. खोली बरोबरच सर्वांची हृदये पण उजळून निघाली. आनंदाने आरती झाली. प्रसाद घेतला. सगळ्यांनी म्हटले.

'अंबा माता की जय'

॥ जय जय रघुवीर समर्थ ॥

卐 卐 卐